नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष २८ * अंक ३६५ * * वर्धा * | सोमवार, दिनांक ३० जून २०२५ | ८ पाने • किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## चारधाम यात्रा पुढील २४ तासांसाठी स्थगित

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली,, दि. २९ :

उत्तराखंडमध्ये मुसळधार पावसामुळे चारधाम यात्रा पुढील २४ तासांसाठी थांबवण्यात आली आहे. गढवाल विभागीय आयुक्त विनय शंकर पांडे यांनी सांगितले की, हरिद्वार, ऋषिकेश, श्रीनगर, रुद्रप्रयाग, सोनप्रयाग आणि विकासनगर येथे प्रवाशांना थांबविण्याच्या सूचना पोलिस-प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. उत्तरकाशीतील यमुनोत्री रस्त्यावर ढगफुटीमुळे बांधकाम सुरू असलेल्या हॉटेलचे नुकसान झाले आहे. अपघातानंतर तेथे राहणारे ८-९ कामगार बेपत्ता आहेत. त्याच वेळी, बागेश्वरमध्ये शरयू नदीची पाण्याची पातळी वाढली आहे. नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. त्याच वेळी, अलकनंदा आणि सरस्वती नद्या देखील धोक्याची पातळी ओलांडत आहेत.

अग्राग्रलेख

खरीखरी..

# आधी मराठीचा पाया मग हिंदीची माया

आपल्या महाराष्ट्रात सध्या हिंदी भाषेबद्दल ज्या प्रकारच्या लोकभावना प्रदर्शित होत आहेत. त्यातील राजकारण बाजूला ठेवून त्या गोष्टीचा विचार केला पाहिजे. सत्ताधारी म्हणतात इलेक्शन आले म्हणून विरोधक या विषयावर विनाकारण गाजावाजा करत आहेत. एक वेळेला त्यांचे म्हणणे आपण मान्य करू. आतापर्यंत भारताला स्वातंत्र्य मिळाल्या पासूनच्या शिक्षण पद्धतीचा विचार केला. तर गेल्या दहा-पंधरा वर्षात शिक्षणातही वर्गीकरण झालेले आहे. पूर्वी श्रीमंतांच्या शाळा वेगळ्या आणि गरिबांच्या शाळा वेगळ्या असा प्रकार अजिबात नव्हता. एकाच वर्गात गावातील सर्वाधिक श्रीमंतांची मुले आणि त्या तुलनेत गरीब आणि मध्यमवर्गीयांची मुले एकत्रच शिकत असत. तेव्हा सरकारी शाळा खरोखरच चांगल्या होत्या. विद्यार्थ्यांना शिक्षक तळमळीने शिकवत असत. त्याचप्रमाणे विद्यार्थीही 'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुदेवौ महेश्वरा, गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरुवे नमः' या उक्तीप्रमाणे गुरुजनांचा मनापासून आदर करीत असत. त्या काळातही काही प्रमाणात काही गुरुजी आदरास पात्र नसत. पण तरीही बहुसंख्य शिक्षक कमी पगार असूनही विद्यार्थ्यांचे ज्ञानवर्धन करण्यात धन्यता मानत असत. आता प्रश्न उरला तो भाषेचा. सुरुवातीच्या काळात मुलांना वयाच्या दहा-अकरा वर्षापर्यंत मातृभाषेचे शिक्षण दिले पाहिजे, असा दंडक होता. त्या काळात महाराष्ट्रात बहुसंख्य शाळांमध्ये प्राथमिक शिक्षण मराठीतच दिले जायचे. राज्यातील काही महानगरे सोडली किंवा मोठी शहरे सोडली. तर इंग्रजी किंवा इतर भाषांच्या शाळा फारच कमी होत्या. काही शाळांमध्ये विशिष्ट समाजाकरता उर्दूचे शिक्षण दिले जात होते. प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतच झाले पाहिजे. कारण त्या काळात पाच-सहा वर्षांच्या बालकांना इतर भाषा शिकवणे, म्हणजे त्यांच्यावर भाषिक बलात्कार करण्यासारखेच आहे. आपण ज्या भाषेत घरी किंवा आपापसांत बोलतो. ती भाषा बालकांच्या डोक्यात फिट्ट बसली पाहिजे. कारण ती भाषा शिकावी लागत नाही. जन्मापासून ती भाषा बालक आत्मसात करत असते. आपल्या महाराष्ट्रात पाचवीपासून मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषा शिकवण्यात येत असत. त्यातील हिंदी भाषा विद्यार्थी शिकण्याचा प्रयत्न करीत असत. महाराष्ट्रात हिंदी भाषेला कधीच विरोध नव्हता. उलट वर्धा येथे राष्ट्रभाषा प्रचार समिती नावाचे अत्यंत व्यापक प्रसार असणारे शिक्षण विद्यापीठ अस्तित्वात होते. केवळ महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण देशातील हिंदी भाषिक राज्यातून यासाठी परीक्षा घेतली जाई. शाळांमधूनही राष्ट्रभाषा प्रचार समितीतर्फे हिंदीच्या परीक्षा होत असत. प्रारंभिक ते कोविद, रत्न, आणि साहित्यरत्न यासारख्या परीक्षांना विद्यार्थी भरभरून प्रतिसाद देत असत. महाराष्ट्रात महाराष्ट्र राज्य राष्ट्रभाषा सभा, पुणे यांच्याद्वारेही परीक्षा घेण्यात येत असत. सध्या बाजारीकरणाच्या या युगात शिक्षणाचा बाजार सुरू झालेला आहे. पहिलीपासून मुले इंग्रजाळलेली होत आहेत. शिक्षणातही आता श्रीमंतांच्या शाळा वेगळ्या आणि मध्यमवर्गीयांच्या व गरिबांच्या शाळा वेगळ्या असा प्रकार सुरू झालेला आहे. या सर्व शिक्षण प्रणालीच्या गोंधळात सरकारी, महानगरपालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषद यांच्या शाळा दिवसेंदिवस कमी होत आहेत. त्यातील विद्यार्थी संख्या रोडावत आहे. जगरहाटी प्रमाणे यापैकीही अनेक शाळांमध्ये आता इंग्रजीचा शिरकाव झालेला दिसतो. अशा वातावरणात बालकांना सुरुवातीच्या काळात मातृभाषेतूनच शिक्षण दिले जावे परंतु असे आता होत नाही. जे मातृभाषेत शिकतात. ते वेगळ्याच वर्गातले लोक आहेत असे समजले जाते. वयाच्या दहा ते बारा वर्षांपर्यंत मातृभाषेत शिक्षण न झाल्यामुळे घरची भाषा मराठी, शाळेची भाषा इंग्रजी आणि शिक्षणाची भाषा श्रीमंतीवर अवलंबून राहिलेली आहे. आज खाजगी शाळेतील शिक्षणाची फी ऐकूनच मध्यमवर्गियांच्या डोळ्यात पाणी येते. अशा परिस्थितीत पहिलीच्या वर्गापासून मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषा लादण्याचा प्रयत्न केला. तर किती भयानक परिस्थिती निर्माण होईल. याचा विचार कोणी तरी करणार आहे की नाही. सरकार आणि विरोधक या नाजूक बाबीचे विनाकारण राजकारण करून कारणपरत्वे आपली राजकीय पोळी भाजण्याचा अकारण किंवा सकारण प्रयत्न करताहेत, असे म्हटल्यास ते वावगे ठरू नये. तुम्ही लिहून ठेवा, पुढील काही वर्षात आपल्या महाराष्ट्रात शुद्ध मराठी बोलणारा आणि लिहिणारा वर्ग अत्यल्प असेल. या सर्व बाबींचा शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केला. तर लहान विद्यार्थ्यांवर बहुभाषा शिकण्याचा मोठाच अन्याय होईल. आजच विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवाच्या मानाने प्रचंड वजनाचे शाळेचे दप्तर सोबत न्यावे लागते. त्या दप्तरात आणखी किलोभर वजनाची भाषा वाढल्यावर विद्यार्थ्यांचे भाषिक वजन किती वाढेल. हे मात्र कुणालाच ठाऊक नाही. भारतातील अनेक राज्यात त्रिभाषा फॉर्म्युला लागू नाही. त्यात दक्षिणेतील राज्ये तर आघाडीवरच आहेत. मुंबई राज्यातून निघालेल्या गुजरात मध्येही प्राथमिक वर्गात तीन भाषा शिकवल्या जात नाहीत. हिंदी भाषिक प्रदेशात तर दुसरी कोणतीही भाषा शिकवली जात नाही. म्हणून शिक्षणाच्या पायाभूत काळात विद्यार्थ्यांच्या डोक्यात भाषेची मिसळ करण्याऐवजी, विद्यार्थ्यांनी सुरुवातीला मातृभाषा शिकून मगच इतर भाषेत मिसळून जावे. असे केले तर राज्यात आंदोलनाची वेळ येणार नाही. महाराष्ट्र सर्वभाषा समभाव मानणारा प्रांत आहे. महाराष्ट्राचा हा उदारपणा पुढेही कायम राहावा. अशा विचारानेच आम्ही आमच्या खरीखरी मधून हा खराखरा सल्ला देण्याचा मार्ग अवलंबलेला आहे. त्यासाठी आधी मराठीचा पाया, मग हिंदीची माया असे सूत्र ठेवले पाहिजे. सर्व संबंधितांनी याचा विचार करण्यास हरकत नाही.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# जगन्नाथ रथयात्रेदरम्यान चेंगराचेंगरी, 3 जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, भुवनेश्वर, दि. २९ :

ओडिशातील पुरी येथे जगन्नाथ रथयात्रेदरम्यान एक मोठा अपघात झाला. रविवारी पहाटे ४ वाजताच्या सुमारास गुंडीचा मंदिरासमोर भगवान जगन्नाथाच्या नंदीघोष रथाजवळ गर्दीत चेंगराचेंगरी झाली. यादरम्यान ३ भाविकांचा मृत्यू झाला. ५० जण जखमी झाले आहेत, त्यापैकी ६ जणांची प्रकृती गंभीर आहे.

बसंती साहू (३६), प्रेम कांती मोहंती (७८) आणि प्रभात दास अशी मृतांची ओळख पटली आहे. सर्व मृतदेह पुरी मेडिकल कॉलेजमध्ये ठेवण्यात आले आहेत.

रथ पाहण्यासाठी मोठी गर्दी जमली असताना हा अपघात झाला. यादरम्यान चेंगराचेंगरी झाली आणि पडल्याने लोक चिरडले गेले. ज्या ठिकाणी चेंगराचेंगरी झाली त्या ठिकाणी पुरेसे पोलिस किंवा सुरक्षा दल तैनात नव्हते, असे म्हटले जात आहे. भगवान बलभद्र आणि सुभद्रा यांचे रथ आधीच श्रद्धाबली (अंतिम बिंदू) येथे पोहोचले होते. नंतर, भगवान जगन्नाथांचा रथ त्यांच्या मावशीच्या ठिकाणी, गुंडीचा मंदिरात पोहोचला.

रविवारी पहाटे ४ वाजता पुरी येथील गुंडीचा मंदिरासमोर भगवान जगन्नाथाच्या नंदीघोष रथाजवळ गर्दीत चेंगराचेंगरी झाली.

जखमी आणि मृतांना पुरी मेडिकल कॉलेजमध्ये नेण्यात आले आहे. मोठ्या संख्येने नातेवाईक बाहेर जमले आहेत. जखमी आणि मृतांना पुरी मेडिकल कॉलेजमध्ये नेण्यात आले आहे. मोठ्या संख्येने नातेवाईक बाहेर जमले आहेत. चेंगराचेंगरीत आपल्या प्रियजनांना गमावल्यानंतर पुरी रुग्णालयाबाहेर नातेवाईक रडताना दिसले. चेंगराचेंगरीत आपल्या प्रियजनांना गमावल्यानंतर पुरी रुग्णालयाबाहेर नातेवाईक रडताना दिसले.



### हिंदी भाषेसंदर्भातील दोन्ही शासन जीआर रद्द

# देवेंद्र फडणवीसांची घोषणा



■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २९ :

पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला महायुती सरकारने पत्रकार परिषद घेत हिंदी भाषेसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा निर्णय घेतला आहे. हिंदी भाषेसंदभार्तील दोन्ही शासन जीआर रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नरेंद्र जाधव यांचे अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करून या समितीच्या अहवालानंतरच पुढील निर्णय घेणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र विधानमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू होणार आहे. महायुतीचे हे चौथे अधिवेशन आहे. बहुतांश भागांमध्ये पाऊस आहे, काही ठिकाणी अतिवृष्टी आहे. काही ठिकाणी पाऊस कमी आहे. सरकारचे निर्णय देखील अतिशय चांगल्या पद्धतीने घेतले जात आहेत. खतांच्या काही तक्रारी आल्या आहेत त्यावर देखील काम केले जात आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, विरोधी पक्षाला आम्ही चहापानाला बोलावले होते, परंतु नेहमीप्रमाणे विरोधकांनी बहिष्कार टाकला आहे. यावेळी त्यांनी एक भलेमोठे पत्र दिले आहे. पत्र मोठे असले तरी मजकूर मोठा नाही. गेल्यावेळी जे मुद्दे घेतले होते तेच पुन्हा टाकून दिले आहे. मराठीचा जो विषय आहे अतिशय गंभीर मुद्दा असला तरी त्यांच्या पत्रात २४ व्याकरणाच्या चुका दिसून आल्या. उबाठाच्या ३ सह्या आहेत, शरद पवार गटाच्या २ सह्या बघायला मिळाले. भास्कर जाधव यांची यावेळी सही दिसलेली नाही. आज वडेट्टीवार पत्रकार परिषदेत म्हणाले की अनेक कामांना स्थिगी मिळाली आहे.

# ३४५ पक्षांची नोंदणी रद्द होणार

■ वृत्तसंस्था,
नवी दिल्ली,, दि. २९ :

भारत निवडणूक आयोगाने मोठा निर्णय घेत, देशभरातील ३४५ नोंदणीकृत पण अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांची (नोंदणी रद्द करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. हे सर्व पक्ष गेल्या सहा वर्षांपासून एकाही निवडणुकीत सहभागी झालेले नाहीत, तसेच प्रत्यक्ष कार्यालय अस्तित्वात नसल्याचे आढळून आले आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली, निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. आयोगाच्या तपासणीत समोर आले की, २०१९ नंतर या ३४५ पक्षांनी कोणत्याही निवडणुकीत सहभाग घेतलेला नाही.

देशभरात २८०० हून अधिक नोंदणीकृत पण अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष अस्तित्वात आहेत. परंतु यातील अनेक पक्षांनी नोंदणीसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे व अटी पूर्ण केलेल्या नाहीत.

आयोगाने या पार्श्वभूमीवर देशव्यापी पडताळणी मोहीम सुरू केली असून, पहिल्या टप्प्यात ३४५ पक्षांवर कारवाईचा बडगा उचलण्यात आला आहे.

या पक्षांना संबंधित राज्ये व केंद्रशासित प्रदेशातील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांमार्फत "कारणे दाखवा" नोटीस पाठवण्यात येणार आहे. त्यानंतर त्यांना आपली बाजू मांडण्याची संधी दिली जाईल आणि त्यानंतर अंतिम निर्णय घेण्यात येईल.

राजकीय पक्षांची नोंदणी ही लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम २९ अ अंतर्गत होते. मात्र निवडणूक प्रक्रियेत सहभागी न होता या सवलतींचा गैरवापर केला जात असल्याचे निदर्शनास आल्याने आयोगाने ही मोहीम राबवली आहे. ३४५ पक्षांपुरती ही कारवाई मर्यादित न राहता टप्प्याटप्प्याने पुढील कारवाई सुरूच राहणार असल्याचेही आयोगाने स्पष्ट केले आहे.

### हिंदी सक्तीविरोधात ठाकरेंची शिवसेना आक्रमक

# हिंदी जीआरची होळी

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २९ :

हिंदी सक्तीला विरोध आणि मराठी भाषेच्या अस्मितेसाठी ठाकरेंची शिवसेना आणि मनसेकडून ५ जुलै रोजी मुंबई भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर, शिवसेना ठाकरे गटाने रविवारी मुंबईतील आझाद मैदानावर हिंदी जीआरची प्रतिकात्मक होळी करत सरकारच्या निर्णयाचा निषेध केला. या आंदोलनात उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्यासह ठाकरे गटाचे प्रमुख नेते उपस्थित होते. या आंदोलनाला शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने गर्दी केल्याचे पाहायला मिळाले.



शालेय शिक्षण विभागाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंतर्गत इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंत हिंदी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे मराठी भाषेच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला असल्याचं विरोधकांचं मत आहे. याच निषेधार्थ शिवसेना ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी ५ जुलै रोजी मुंबईत विराट मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. त्याआधी राज्यभरात तालुकास्तरावर हिंदी सक्तीच्या जीआरची होळी करून लोकांनी रोष व्यक्त केला आहे.






# सरकारने यापूर्वीही फसवणूक केली : संदीप देशपांडे



**मुंबई :** राज्यातील शाळांमध्ये हिंदी भाषा सक्तीने शिकवण्याच्या निर्णयाच्या विरोधात उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि मनसेच्या वतीने 5 जुलै रोजी मोर्चा काढण्यात येणार आहे. तर चर्चेच्या माध्यमातून या प्रश्नावर तोडगा निघू शकतो, असे विधान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. अजित पवारांच्या या विधानावर मनसे नेते संदीप देशपांडे यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. सरकार खडबडून जागे केल्याशिवाय आम्ही मोर्चा मागे घेणार नाही. हिंदीच्या मुद्द्यावरून सरकारने यापूर्वी फसवणूक केली आहे. त्यामुळे शासन निर्णय आल्याशिवाय आम्ही मागे हटणार नाही, असे संदीप देशपांडे यांनी स्पष्ट केले आहे. राज्यातील शाळांमध्ये हिंदी भाषा सक्तीने शिकवण्याच्या प्रस्तावित निर्णयावरून आता हिंदी विरुद्ध मराठी असा वाद चांगलाच पेटला आहे. या निर्णयाला राज्यभरातून तीव्र विरोध होत असून, अनेक मराठीभाषिक संघटना, राजकीय पक्ष आणि नागरिकांनी आपली नाराजी व्यक्त केली आहे. शिवसेना (ठाकरे गट) आणि मनसेने या निर्णयाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. येत्या 5 जुलैला मुंबईत भव्य मोर्चा काढण्यात येणार असून, या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. ज्या पद्धतीने महाराष्ट्राचे वातावरण तयार झाले आहे. तेव्हा सरकार जागे होऊ लागले आहे. पण खडबडून जागे केल्याशिवाय आम्ही मोर्चा मागे घेणार नाही, असे संदीप देशपांडे म्हणालेत. तसेच मोर्चा मागे घ्यायचा की नाही घ्यायचा, याबाबत सर्व निर्णय राज ठाकरे घेतील, असेही त्यांनी सांगितले. याआधी सरकारने फसवणूक केलेली आहे.

# रावणांना रामराज्याचा तिटकारा येणारच

## उद्धव-राज ठाकरेंच्या मोर्च्यावरून राऊतांचा सरकारला टोला



**मुंबई :** शिवसेना (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी हिंदी सक्तीच्या विरोधात ठाम भूमिका घेत, ठाकरे बंधूंनी मराठीसाठी एकत्र येण्याचा निर्णय घेतल्याचे स्वागत केले आहे. "हेच खरे संकेत आहेत. याला 'बिटवीन द लाईन्स' म्हणतात," असं राऊत म्हणाले. त्यांनी सरकारला इशारा दिला की, जर सरकारने लोकभावना ओळखून हिंदी सक्तीचा निर्णय मागे घेतला, तर त्याचे स्वागत होईल. राऊत यांनी जोरदार टीका करत म्हटले की, सरकारने जर महाराष्ट्रातील जनतेच्या मनातील गोष्ट स्वीकारत हिंदी सक्तीचा निर्णय रद्द केला तर आम्ही त्यांचे स्वागत करु. लोकभावनेपुढे सरकारला झुकावेच लागते, असेही त्यांनी अजित पवारांच्या प्रतिक्रियेवर बोलताना म्हटले आहे.

संजय राऊत म्हणाले की, माझी किती भाकीत खरे झाले आणि त्यामुळे ते मंत्री झाले 3 वर्षांपूर्वी हे त्यांना पक्के माहिती आहे. हा विषय राजकीय भाकिताचा नसून राजकीय अकलनाचा आहे. मिंदे गटात जाणारे लोकं हे बालबुद्धीचे लोकं आहेत.हिंदीची सक्ती जशी होत आहे तशी पक्ष सोडण्याची सक्ती त्यांच्यावर अमित शहांनी केली आणि त्याविरोधात ते उभे राहू शकले नाही. महाराष्ट्राच्या हितासाठी आम्ही एकत्र येत असताना या लोकांना पोट दुखण्याचे कारण नाही. तुम्ही महाराष्ट्र द्वेषापोटी एकत्र आले आहात, मराठी द्वेषातून एकत्र आले आहात. आम्ही मराठी अन महाराष्ट्रासाठी एकत्र येत आहोत. रावणांना रामराज्याचा तिटकारा येणारच.उदय सामंत यांनी कमीत कमी बोलावे यातच त्यांचे हित आहे. हा डामराचा व्यवहार नाही मराठी भाषेचा व्यवहार आहे.

# आई एकविरा देवी मंदिरात ड्रेसकोड लागू

## ७ जुलैपासून अंमलबजावणी

**लोनावळा :** लोनावळा येथील प्रसिद्ध आई एकविरा देवी मंदिरात येणाऱ्या भाविकांसाठी ड्रेस कोड बंधनकारक करण्यात आला आहे. ठाकरे कुटुंबाचे कुलदैवत असलेल्या आणि कोळी समाजाच्या श्रद्धास्थानी असलेल्या या मंदिरात भाविकांनी पारंपरिक वेशभूषेतच दर्शनासाठी यावे, असे स्पष्ट निर्देश संस्थानकडून देण्यात आले आहेत. ७ जुलै २०२५ पासून या नियमांची अंमलबजावणी होणार असून, मंदिराच्या पावित्र्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. आई एकविरा देवी संस्थानने यासंदर्भात एक अधिकृत पत्रक जारी केले असून, त्यात मंदिरात येणाऱ्या कोणत्याही भक्ताने तोकडे अथवा अंगप्रदर्शन करणारे कपडे परिधान केल्यास त्यांना मंदिरात प्रवेश नाकारण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. या नियमाचा अवलंब केवळ भाविकांवरच नव्हे तर स्थानिक दुकानदार आणि रहिवाशांवरही होणार आहे. महिलांनी मंदिरात प्रवेश करताना साडी, सलवार-कुर्ता, चूडीदार अथवा इतर पारंपरिक भारतीय पोशाख परिधान करावा लागेल. त्यांच्या वेशात कोणतेही अंगप्रदर्शन होऊ नये, याची काळजी घ्यावी लागणार आहे. पुरुषांनी धोतर-कुर्ता, पायजमा-कुर्ता, पॅन्ट-शर्ट, टी-शर्ट यांसारख्या सुशोभित आणि अंग झाकणाऱ्या पोशाखात यावे. तरुण-तरुणींनी शॉर्ट्स, मिनी स्कर्ट, फाटलेली जीन्स, हाफ पॅन्ट यांसारखे पश्चिमी पोशाख किंवा अंगप्रदर्शन करणारे कपडे परिधान करू नयेत. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना मंदिरात प्रवेश नाकारण्यात येणार आहे. त्यामुळे भाविकांनी ड्रेस कोडचे पालन करून मंदिराच्या शुचितेला साथ द्यावी, असे आवाहन संस्थानने केले आहे. मंदिर परिसरात यासंदर्भात सूचनाफलक लावण्यात येणार असून, सुरक्षिततेच्या दृष्टीने अतिरिक्त कर्मचारी तैनात करण्यात येणार आहेत.मंदिर प्रशासनाने हा निर्णय भाविकांच्या श्रद्धेचा आदर राखत, परंतु पारंपरिकता व शिस्त यांची जोड जपण्यासाठी घेतला असून, सर्वांनी यास सहकार्य करावे.

# वाद्यांच्या गजरात संत तुकोबांच्या पालखीचे इंदापुरात स्वागत

■ **महासागर प्रतिनिधी**
**इंदापूर, दि. २९ :**

आषाढी वारी अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली असून, महाराष्ट्राच्या विविध भागांतून संतांच्या पालख्या पंढरपूरकडे मार्गक्रमण करत आहेत. यंदाची आषाढी एकादशी 6 जुलै रोजी साजरी होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर आज जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे दुसरे गोल रिंगण इंदापूरमधील कस्तुराबाई श्रीपती कदम विद्यालयाच्या प्रांगणात संपन्न झाले. सकाळी इंदापुरात पोहोचलेल्या पालखीचे पारंपरिक वाद्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. या प्रसंगी शेकडो वारकरी आणि भाविकांनी रिंगण सोहळा पाहण्यासाठी मोठ्या संख्येने गर्दी केली होती.



हजारो वर्षांपासून चालत येणाऱ्या वारीचा पालखी सोहळ्यात झालेला परिवर्तित रूप आणि त्यातून निर्माण झालेली रिंगणाची परंपरा आजही भक्तिभावाने जपली जात आहे. आजच्या गोल रिंगणात टाळ, मृदुंग, पताका आणि विठ्ठलनामाच्या जयघोषात संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. या नयनरम्य सोहळ्याचे दृश्य ड्रोनच्या माध्यमातून टिपण्यात आले आहे.

दरम्यान, बेलवाडी येथे संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे पहिले रिंगण झाले होते. शनिवारी पहाटेपासूनच येथील भक्तांनी गर्दी केली होती. सनई-चौघड्यांच्या तसेच टाळ मृदुंगाच्या गजरात माऊलींच्या जयजयकारात पालखी बेलवाडी येथे पोहोचली होती. त्यानंतर ठरलेल्या ठिकाणी रिंगणाची तयारी झाली व भाव्या मैदानात पहिले रिंगण बनवण्यात आले. यावेळी वारकऱ्यांचा उत्साह पाहण्यासारखा होता.

संत तुकाराम महाराजांची पालखी रिंगणात येताच वातावरण भारावून गेले. टाळ-मृदंगाच्या गजरात वारकरी जोशात आले. त्यांच्या मुखात ज्ञानोबा-तुकाराम, राम कृष्ण हरीचा अखंड जप सुरूच होता. एकीकडे अभंग गायन, तर दुसरीकडे ढोल-ताशांचे सूर, आणि त्याच वेळी रिंगणात वारकऱ्यांची परिक्रमा हे सर्व दृश्य पाहणाऱ्यांच्या डोळ्यांत पाणी आले.

बेलवाडी ग्रामस्थ आणि स्थानिक संस्थांच्या कुशल नियोजनामुळे हा सोहळा अत्यंत सुरळीतपणे पार पडला. रिंगणासाठी स्वतंत्र मैदानाची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सुविधा, वैद्यकीय मदत केंद्र, सुरक्षा यंत्रणा आणि स्वयंसेवकांची तैनाती या सर्व बाबी काटेकोरपणे राबवण्यात आल्या. त्यामुळे कोणताही अडथळा न होता रिंगण उत्साहात पार पडले. हजारो वारकऱ्यांनी स्वच्छता आणि शिस्त पाळत अत्यंत संयम दाखवला. 'जय जय राम कृष्ण हरी'च्या जयघोषात आसमंत दुमदुमला होता.

# गजानन महाराज पालखीचे सोलापूर जिल्ह्यात आगमन

■ **महासागर प्रतिनिधी**
**सोलापूर, दि. २९ :**



माझे जीवाचे आवडी, पंढरपुरा नेईन गुढी... या संतोक्ती प्रमाणे ऊन, वारा, पाऊस अंगावर झेलत टाळ-मृदंगांचा निनाद, ज्ञानोबा-तुकारामांचा अखंड नामघोष, गजानन महाराजांचा जयघोष, भजनांची मांदियाळी अशा भक्तिमय आणि मंगलमय वातावरणात शेगावच्या श्री गजानन महाराजांचा पालखी सोहळा शनिवारी सायंकाळी तुळजापूर मार्गे श्रींच्या पालखीचे तामलवाडी गाव ओलांडून सोलापूर जिल्ह्यात कसेगावाच्या शिवारात आगमन झाले.

आमदार सचिन कल्याणशेट्टी, भाजपचे प्रदेश नेते शहाजी पवार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, त्यांच्या पत्नी सौ. जंगम, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका ठाकूर, तहसीलदार किरण जमदाडे, गटविकास अधिकारी कवितके, कासेगावचे सरपंच यशपाल वाडकर, उळे गावचे सरपंच अंबिका कोळी यांच्यासह इतर मान्यवर व अधिकाऱ्यांनी पालखीचे स्वागत केले.

या पालखी सोहळ्यात शिस्तीचे व भक्तीचे वातावरण पाहावयास मिळाले. २६ दिवसांचा पायी प्रवास करीत सोलापूर जिल्ह्यात आगमन झालेल्या या पालखी सोहळ्यात पांढऱ्याशुभ्र पोशाखातील ६५० भगव्या पताकाधारी वारकरी एका रांगेत चालत होते. यात तरुणांचा सहभाग उल्लेखनीय आहे. दिनांक 2 जून 2025 रोजी श्री गजानन महाराज पालखी शेगाव येथून पंढरपूर वारीसाठी प्रस्थान केले आहे. या वारीदरम्यान, दिनांक 28 जून 2025 रोजी 27 वा मुक्काम श्री क्षेत्र तुळजापूर होता. हे ठिकाण आई तुळजाभवानीच्या चरणी महाराजांची भावपूर्ण भेट घडवणारे एक अत्यंत महत्त्वाचे व पवित्र स्थान मानले जाते. त्यानंतर श्रींच्या पालखीचे शनिवारी तामलवाडी गाव ओलांडून सोलापूर जिल्ह्यात कसेगावाच्या शिवारात आगमन झाले. दक्षिण सोलापूर तालुक्यातील उळे या गावी पालखी सोहळ्याचा मुक्काम आहे. रविवारी सकाळी पालखी सोहळा सोलापूर शहरात दाखल होणार आहे.

# हिंदीसक्तीला समाजवादी पक्षाचाही विरोध

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :**

महायुती सरकारने यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून पहिलीपासून तिसऱ्या भाषेची केलेली सक्ती आणि त्यातही हिंदीची सक्ती गैर असल्याची भूमिका समाजवादी पक्षाचे भिवंडी पूर्वचे आमदार रईस शेख यांनी घेतली आहे. या निर्णयाला विरोध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. मात्र ५ जुलै रोजी मराठीसाठी मुंबईत आयोजित केलेल्या मोर्चात सहभागी होण्याबाबत पक्षाच्या वरिष्ठांशी चर्चा करून निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी सांगितले.

राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी सक्तीविरोधात ठाकरे बंधूनी मोर्चाची हाक दिली असून त्याला राष्ट्रवादी (शरद पवार) आणि काँग्रेसने देखील पाठिंबा दिलेला आहे. मात्र मोर्चात सहभागी व्हायचे की नाही याबाबत अजून समाजवादी पक्षाचा निर्णय झालेला नाही. महायुती सरकारने यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून पहिलीपासून हिंदी या तिसऱ्या भाषेची केलेली सक्ती गैर असल्याचे मत रईस शेख यांनी व्यक्त केले आहे.

यासंदर्भात आमदार रईस शेख म्हणाले, हिंदी भाषेला समाजवादी पक्षाचा विरोधी नाही. राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांमध्ये मराठी व इंग्रजी या पहिलीपासूनच्या सक्तीच्या दोन भाषा आहेत. आता हिंदी ही तिसरी भाषा म्हणून महायुती सरकारने सक्ती लादली आहे. पहिलीपासून हिंदी सक्ती करण्याला आमचा विरोध आहे. मात्र जर सरकारला हिंदी भाषा शिक्षणात आणायची असल्यास ती इयत्ता पाचवी पासून करण्यात यावी, अशी मागणी रईस शेख यांनी केली आहे.

ते पुढे म्हणाले की, यासंदर्भात समाजवादी पक्षाची भूमिका स्पष्ट आहे. तिसरी भाषा लादण्याचा संघ आणि भाजपचा अजेंडा आहे. विरोधी पक्षांनी राज्यात हिंदीची पहिलीपासून सक्ती करण्याच्या विरोधात ठाम भूमिका घेतली आहे. त्याला आपला पाठिंबा आहे. त्यामुळे ५ जुलै रोजी होणाऱ्या मराठी भाषेसाठीच्या मोर्चात सहभागी होण्यासाठी पक्षातील वरिष्ठांशी चर्चा करून निर्णय घेतला जाईल, असे आमदार रईस शेख यांनी सांगितले.

दरम्यान, हिंदी सक्तीविरोधातील मोर्चात काँग्रेस सहभागी होणार असल्याचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी नुकतेच स्पष्ट केले. या मुद्यावर सर्व पक्ष, संस्था, साहित्यिक आणि मराठी प्रेमींचा एकच मोर्चा निघावा अशीच काँग्रेसची भूमिका असल्याचे ते म्हणाले. तर राष्ट्रवादीच्या शरद पवार गटानेही मोर्चाला पाठिंबा दिला असून प्रत्येक मराठी माणसाने या मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनीही केले आहे.

# माळेगाव शिवारात वाळू वाहतूक करणारे ट्रॅक्टर पकडले

■ **महासागर प्रतिनिधी**
**हिंगोली, दि. २९ :**



कळमनुरी तालुक्यातील माळेगाव शिवारामध्ये महसूल विभागाच्या पथकाने वाळू वाहतूक करणारे ट्रॅक्टर शनिवारी तारीख 28 रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास पकडले आहे

कळमनुरी तालुक्यामध्ये अवैध वाळू येथे वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाईची मोहीम हाती घेण्यात आली आहे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी प्रतीक्षा भुते, तहसीलदार जीवककुमार कांबळे यांनी वाळूघाटावरून अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्या तसेच वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी महसूल विभागाचे स्वतंत्र पथक नियुक्त केले आहे. या पथकामध्ये मंडळ अधिकारी व तलाठी यांचा समावेश आहे.

कळमनुरी तालुक्यातील कयाधू नदी काठी असलेल्या गावांच्या वाळू घाटांवर या पथकाकडून विशेष लक्ष दिले जात आहे. रात्रीच्या वेळी अचानक पथकाकडून वाळू घाटावरील मार्गावरून येणाऱ्या वाहनांची तपासणी केली जात आहे.

दरम्यान कोंढुर शिवारातून कयाधू नदी मधून वाळू वाहतूक करणारे ट्रॅक्टर कळमनुरी कडे निघाल्याची माहिती पथकाला मिळाली होती. त्यावरून मंडळ अधिकारी पावडे, शिल्पा सरकटे, ग्राम महसूल अधिकारी अशोक केंद्रेकर, पंजाब होडबे, कमलकुमार यादव, सुनील भुक्तर, गणेश धाडवे, अमोल गंगावणे, विशाल पतंगे, मेघा राऊत, नागेश कांबळे यांच्या पथकाने वाहनांची तपासणी सुरू केली होती. यामध्ये माळेगाव शिवारामध्ये रात्री साडेअकरा वाजता एका ट्रॅक्टरची तपासणी केली असता त्यामध्ये वाळू आढळून आली. या पथकाने ट्रॅक्टर चालकाकडे विचारणा केली असता त्याला समाधानकारक उत्तरे देता आली नाही. त्यामुळे या पथकाने सदर ट्रॅक्टर पकडून कळमनुरी पोलीस ठाण्यात आणले आहे. याप्रकरणी पुढील कारवाई सुरू असल्याचे महसूल विभागाच्या पथकाने सांगितले.

## दक्षिण आफ्रिकेतून कॉपर स्क्रॅप पाठवण्याच्या नावाखाली

# ८४ लाखांची फसवणूक

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २९ :**

पुण्यातील एका व्यावसायिकाला परदेशातून २५ टन कॉपर स्क्रॅप कमी दरात देतो असे सांगून सायबर चोरट्यांनी तब्बल ४८ लाख ७२ हजार रुपयांची ऑनलाइन आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी हरीओम मंगेश उणेचा (वय-३०,रा. पर्वती,पुणे) यांनी पर्वती पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपी विरोधात तक्रार दाखल केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सदरचा प्रकार हा २२/४/२०२५ ते २७/५/२०२५ यादरम्यान घडलेला आहे. तक्रारदार हरीओम उणेचा हा व्यावसायिक असून त्यांची ऑनलाइन ॲन्टीनिओ ग्रॅबीन याच्यासोबत ओळख झाली होती. ग्रॅबीन याने साऊथ आफ्रिकेत जोन्हासबर्ग येथे फ्रू ॲन्ड सन्स होल्डिंग ग्रुप प्रायव्हेट लिमिटेड ही त्याची कंपनी असल्याचे सांगितले. तसेच एम. एस. टी शिपिंग लॉजिस्टिक्स कंपनी देखील असल्याचे भासवले. सदर कंपनी मार्फत २५ टन कॉपर स्क्रॅप कमी किंमतीत मिळवून देतो असे सांगून त्याबाबत बनावट कागदपत्रे तयार करुन ती तक्रारदार यांना ऑनलाइन पाठवून देत सदर ऑनलाइन आर्थिक व्यवहार देखील ठरवला.

# इंडोनेशियातील दोन नागरिकांना अटक

## २१ कोटींचा हायड्रो गांजा जप्त

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २९ :**

ओशिवरा पोलिसांनी जोगेश्वरी येथील एका हॉटेलमध्ये छापा टाकून २१ कोटी रुपयांचा हायड्रो गांजा जप्त केला. या प्रकरणी इंडोनेशियातील दोन नागरिकांना अटक करण्यात आली. जोगेश्वरीमधील एका हॉटेलमध्ये दोन परदेशी नागरिक अमली पदार्थांची विक्री करण्यासाठी आल्याची माहिती ओशिवरा पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विकास कदम यांना मिळाली होती. या माहितीची खातरजमा केल्यानंतर हॉटेल अलिबाबामध्ये छापा टाकला. हॉटेलमध्ये असलेल्या इंडोनेशियातील दोन नागरिकांकडे २१ किलो ५२२ ग्रॅम हायड्रो गांजा सापडला. या अमली पदार्थाची किंमत आंतरराष्ट्रीय बाजारात २१ कोटी ५५ लाख आहे. या प्रकरणी इंडोनेशियातील नागरिक बुडी वीयाने (४४) आणि रहमद हिदायत (३९) यांना अटक करण्यात आली.

# पहिल्या यादीत ६ लाख ३२ हजार विद्यार्थ्यांना अकरावीत प्रवेश



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :**

इयत्ता अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची गुणवत्ता यादी जाहीर झाली असून पहिल्या प्रवेश यादीत राज्यातील 6 लाख 32 हजार 194 विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाले आहेत. यामध्ये कला शाखेच्या 1 लाख 49 हजार 791 विद्यार्थ्यांचा, वाणिज्य शाखेच्या 1 लाख 39 हजार 602 विद्यार्थ्यांचा तर विज्ञान शाखेच्या 3 लाख 42 हजार 801 विद्यार्थ्यांचा समावेश आहे. सोमवारपासून ते 7 जुलैपर्यंत प्रवेश मिळालेल्या महाविद्यालयात प्रत्यक्ष जाऊन प्रवेश घ्यावा लागणार आहे.

दहावीचा निकाल जाहीर होऊन दीड महिना उलटला तरीही राज्यातील विद्यार्थ्यांना अकरावीला प्रवेश मिळाला नव्हता. यामुळे राज्यातील विद्यार्थी व पालकांकडून संताप व्यक्त केला जात होता. राज्याच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्यावतीने राबवली जात असलेली ही अकरावी प्रवेश प्रक्रिया तांत्रिक कारणांमुळे पुढे ढकलली जात होती. ढकलेल्या वेळापत्रकानुसार सोमवारी ही यादी जाहीर होणार होती. अखेर काम पूर्ण झाल्याने ही यादी शनिवारी सायंकाळी जाहीर करण्यात आली.

या यादीत सर्वाधिक पहिल्या पसंतीच्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक असून 4 लाख 57 हजार 841 विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले आहे. दुसऱ्या पसंतीचे 77 हजार 099, तिसऱ्या पसंतीचे 36 हजार 901 मिळाले आहेत. तर अर्ज केलेल्या 10 लाख 66 हजार विद्यार्थ्यांच्यापैकी अजूनही तब्बल 4 लाख 33 हजार 811 विद्यार्थी प्रवेशाच्या प्रतिक्षेत आहेत. या विद्यार्थ्यांना दुसऱ्या फेरीची वाट पहावी लागणार आहे.

12 लाख 71 हजार विद्यार्थ्यांनी अर्ज केल्याचे जाहीर केले असले तरी या यादीत 10 लाख 66 हजार 5 विद्यार्थ्यांचा समावेश केला आहे. यामध्ये सर्वाधिक 6 लाख 9 हजार 718 विद्यार्थ्यांचे अर्ज विज्ञान शाखेसाठी आले आहेत. तर कला शाखेसाठी 2 लाख 31 हजार 356 आणि वाणिज्य शाखेसाठी 2 लाख 24 हजार 931 विद्यार्थ्यांनी अर्ज केला होता. या अर्जांपैकी एकूण 6 लाख 32 हजार 194 विद्यार्थ्यांना पहिल्या यादीत प्रवेश मिळाला आहे.

विज्ञान शाखेतून 3 लाख 42 हजार 801, कला शाखेमध्ये 1 लाख 49 हजार 791, तर वाणिज्यमध्ये 1 लाख 39 हजार 602 विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला आहे. अजूनही राज्यातील 4 लाख 33 हजार 811 विद्यार्थी प्रतीक्षेत आहेत.

विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी दहा महाविद्यालयांची पसंतीक्रम निवडण्याची संधी होती. यामध्ये 4 लाख 57 हजार 841 विद्यार्थ्यांना त्यांनी दिलेल्या पहिल्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळाले आहे. 77 हजार 99 विद्यार्थ्यांना त्यांनी दिलेल्या दुसरा पसंतीक्रमांचे महविद्यालय मिळाले आहे. ज्या विद्यार्थ्यांना पहिले महाविद्यालय मिळाले आहे. त्यांनी प्रवेश घेतला नाही, त्यांना दुसऱ्या फेरीतून तो बाहेर पडेल आणि त्याचा विचार आता थेट तिसऱ्या फेरीपासूनच केला जाणार आहे. ही तिसरी फेरी रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश घ्यावा लागणार आहे.

# कल्याणमधून अग्निशस्त्रांसह सराईत गुंड जेरबंद

■ **महासागर प्रतिनिधी, डोंबिवली, दि. २९ :**

७ गुन्हे अन्वेषण विभागाच्या खंडणी विरोधी पथकाने कल्याण-मोहने रोडला असलेल्या बंदर पाड्यातून फळ विक्रेत्याचा मुखवटा धारण करणाऱ्या सराईत गुंडाला अटक केली आहे. सचिन गोपी उर्फ गोकुळ शिंदे (30) असे अटक करण्यात आलेल्या गुंडाचे नाव असून या बदमाशाकडून एक जिवंत काडतूसासह 2 देशी बनावटीची पिस्तूले हस्तगत करण्यात आली आहेत.

कल्याण-मोहने रोडला असलेल्या बंदर पाड्यात राहणाऱ्या एका सराईत गुन्हेगारीकडे अग्निशस्त्रे असल्याची खबर खंडणी विरोधी पथकाचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सुनील तारमळे यांना खासगी गुप्तहेराकडून मिळाली होती. त्यानुसार सहाय्यक पोलिस आयुक्त शेखर बागडे आणि सहाय्यक पोलिस आयुक्त विनायक घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सुनिल तारमळे, सपोनि श्रीकृष्ण गोरे, सपोनि भूषण कापडणीस, पोउपनि सुहास तावडे, सपोउपनि संदीप भोसले आदींच्या पथकाने बुधवारी पावणे पाचच्या सुमारास बंदर पाड्यातील रोशन किराणा दुकानाजवळ सापळा लावला होता.

व्यवसायाने फळांची विक्री करणाऱ्या सचिन गोपी उर्फ गोकुळ शिंदे याला पथकाने ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याच्याकडे 1 लाख 500 रुपए किंमतीची जिवंत काडतूसासह दोन देशी बनावटीची पिस्तूले सापडली. कोणतेतरी दखलपात्र गुन्हे करण्याच्या इराद्याने या अग्नीशस्त्रांचा वापर करण्यापूर्वीच खंडणी विरोधी पथकाने सचिन गोपी उर्फ गोकुळ याच्या मुसक्या आवळल्या. या बदमाशाच्या विरोधात खडकपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कल्याण कोर्टात हजर केले असता कोटार्ने त्याला अधिक चौकशीसाठी सोमवार पर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

अग्निशस्त्रांच्या साठ्यासह अटक करण्यात आलेला सराईत गुन्हेगार सचिन गोपी उर्फ गोकुळ याच्या विरोधात खडकपाडा पोलिस ठाण्यात यापूर्वी सशस्त्र हाणामारीसह अंमली पदार्थ विरोधी कायद्यानुसार दोन गुन्हे दाखल असल्याचे चौकशी दरम्यान उघडकीस आले आहे. या गुंडाने त्याच्याकडे सापडलेली अग्निशस्त्रे कुठून व कुणाकडून आणली ? या अग्निशस्त्रांची तो विक्री करणार होता की त्यांचा वापर कुणाचा तरी खात्मा करणार होता का ? याचा चौकस तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक सुनील तारमळे करत आहेत.

# विरोधकांचा सरकारच्या चहापानावर बहिष्कार

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २९ :**



विरोधकांनी सरकारच्या चहापानावर बहिष्कार टाकत सत्ताधाऱ्यांवर टीकेची झोड उठवली आहे. यावर बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले की, सरकारमधील तिघांची तोंडं तीन वेगवेगळ्या दिशांना आहेत. राज्यकारभाराचा समन्वयच हरवला असून जनतेचे प्रश्न बाजूला पडले आहेत.

आदित्य ठाकरे म्हणाले की, सरकारच्या चहापानाच्या कार्यक्रमाला जायचे म्हणजे पाप तर आहेच. पण ज्या पद्धतीने महायुती ज्या पद्धतीने सरकार चालवण्याचा प्रयत्न करत आहे.3 दिशेला 3 तोंडं आहेत. अनेक विषयावरुन भांडण सुरू आहेत. पालकमंत्री-मालकमंत्री पदावरुन वाद सुरू आहे. भ्रष्टाचारी लोकं आज भाजपसोबत असून त्यांची टॅगलाईन ही दाग अच्छे आहे अशी झाली आहे. कदाचित मुख्यमंत्र्यांना आठवेल की मी यांच्यावर आरोप केले होते.

आदित्य ठाकरे म्हणाले की, 11 वी प्रवेशाच्या यादी तयार करण्यामध्ये मंत्री दादा भुसे यांनी पैसे खाल्ले आहेत का हा प्रश्न आमच्यासमोर आहे. त्यांनी मुलांवर हिंदी सक्ती लादली आहे.समृद्धी महामार्गावर नदी वाहते, खड्डे पडले आहेत, त्यांना हे लक्षात यायला हवे की त्या महामार्गाला बाळासाहेब ठाकरेंचे नाव दिले आहे. अंबादास दानवे म्हणाले की, विरोधकांची आज बैठक झाली या मविआचे सर्व नेते हजर होतो. उद्यापासून सुरू होणाऱ्या अधिवेशनाच्या पार्श्वभुमीवर मुख्यमंत्र्यांनी चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला असून आम्हाला निमंत्रण दिले आहे. चहापानाचे निमंत्रण दिलेले असताना राज्यातील सगळी परिस्थिती आता पाहिली तर कायदा सुव्यवस्थेची स्थिती, वाढलेला भ्रष्टाचार असेल किंवा शेतकऱ्यांच्या समस्या असतील याचा विचार केला तर तिघांचे 3 बाजूला तोंडं झाले आहेत. एक मंत्री नारायण राणेंबद्दल म्हणतात की त्यांनी अनेक मर्डर केले आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी ठेवलेल्या चहापानावर आम्ही बहिष्कार टाकला आहे. अंबादास दानवे म्हणाले की, सत्ताधारी पक्षाचे बबनराव लोणीकर सारखे आमदार हे जनतेला म्हणतात तुमच्या पायातील चप्पल, अंगावरील कपडे हे सरकारने दिले आहे. म्हणजे ही ब्रिटीशांची सुधारित औलाद आहे. असे वक्तव्य करणारे भ्रष्टाचारात गुंतलेले सरकारमध्ये संजय शिरसाट असो संदीपान भुमरे यांचे प्रकरण समोर येत आहे. हिंदी सक्तीचा विषयानंतर तर सरकारच्या चहापानाला जाने आम्हाला संयुक्तिक वाटत नाही. एकीकडे मुख्यमंत्री भ्रष्टाचार मुक्तीच्या घोषणा करत आहे. तर दुसरीकडे राज्यात 3 हजार कोटींचा भ्रष्टाचार झाला आहे. यावर आम्ही अधिवेशनात आवाज उठवणार आहे.

अंबादास दानवे म्हणाले की, सरकार कायदा सुव्यवस्था पाळू शकलेले नाही. सत्ताधारी पक्षाचे लोकं वेगवेगळ्या गुन्ह्यात सहभागी आहेत. पुण्यातील हगवणे प्रकरण आपण पाहिले. ठाण्यात खुनाचे प्रकरण आपण पाहिले. सत्ताधारी लोकं गुन्ह्यात सहभागी होत आहे पोलिसांचे त्यांना संरक्षण आहे. मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री एक प्रकारे या सर्व गोष्टीला प्रोत्साहन देत आहे.

## कानगावच्या शेतक-याची आत्महत्या

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. २९ जून**

नापिकी व कर्जबाजारी, त्यातच दुबार पेरणीचे संकट ओढावल्याने हताश झालेल्या कानगाव येथील शेतक-याने कीटकनाशक प्राशन केले, रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांनी शेवटचा श्वास घेतला,

अल्लीपूर पोलीस स्टेशनअंतर्गत कानगाव येथील सतिश वैद्य (45) यांच्याकडे कानगाव शिवारात 1.80 हेक्टर जमीन आहे, कानगाव विविध कार्यकारी सोसायटीचे 60 हजार आणि खासगी सावकाराचे कर्ज होते, कर्जाचा वाढल्याने ते चिंतेत होते,

त्यांनी खरीप हंगाम सुरू होताच पेरणी केली, ती पेरणी वाया गेल्याने सतीश हा पुर्णपणे खचला, यातच सतीश यांनी कानगाव येथील राहत्या घरी मंगळवार, 24 जून रोजी विष प्राशन केले, तेव्हापासून ते सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात दाखल झाले होते, अखेर त्यांचा मृत्यू झाला, त्यांच्या मागे पत्नी, मुले आणि बराच मोठा आप्त परिवार आहे.

## संत्रा मृग बहाराचे फळगळ होत असल्यामुळे तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई द्या

### सर्व पक्षीय शेतकरी संघर्ष समिती कारंजातर्फे तहसीलदार गिरी यांना निवेदन



**महासागर प्रतिनिधी**
**कारंजा (घा), दि. २९ जून**

सर्व पक्षीय शेतकरी संघर्ष समिती कारंजा तर्फ कारंजा तालुक्यातील सर्व संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी तहसील कार्यालय कारंजा येथे तहसीलदार ऐश्वर्या गिरी यांना सामुहिक रित्या संत्रा मृग बहाराचे फळगळ होत असल्यामुळे तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई या निवेदनातून शासनास मागणी केली आहे.

यावेळी शेतकऱ्यांनी निवेदनात म्हटले की मे २०२५ महिण्यात जास्त पाऊस पडल्यामुळे संत्रा झाडाला मृग बहार फुटला. त्याकरिता शेतकऱ्यांनी जमीनीतून खते देणे, तसेच संत्रा मृग बहारावर दोन ते तीन फवारण्या सुद्धा केल्या. यामध्ये शेतकऱ्यांचे आर्थीक खर्च झालेला असून त्यानंतर १८ मे २०२५ पासुन ते ८ जुन २०२५ पर्यंत पावसाने खंड दिला व ४० डिग्री च्यावर तापमान असल्यामुळे आलेला मृग बहार गळायला सुरवात झाली तसेच संत्रा झाडाला पुरेसे पाऊस न झाल्यामुळे व तापमानामुळे मृग बहार गळला. या पावसाच्या खंडामुळे संपूर्ण आलेला मृग बहार गळल्यामुळे शेतकऱ्यांचे खुप मोठे आर्थीक नुकसान झाले. सन २०२३ २०२४ मध्ये अशाच प्रकारे संत्रा फळबागांवर नैसर्गिक आपत्ती आलेली होती त्यावेळी सरकारने विशेष नैसर्गिक बाब नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन मधुन शेतकऱ्यांना आर्थीक स्वरूपात मदत जाहीर केलेली होती.

त्याच निकषानुसार याही वर्षी संत्रा व मौसंबी मृग बहार गळाल्यामुळे शेतकऱ्यांचे खुप मोठे आर्थीक नुकसान झालेले असून महसुल विभाग व कृषी विभाग तसेच ग्रामसेवक यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या संत्रा बागेत जावून प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे तयार करावे व तो अहवाला शासनाला दयावा, जेणेकरून कारंजा तालुक्यातील शेतकऱ्यांना मागल्या वर्षीच्या प्रमाणे शासनाची आर्थीक मदत जाहीर होईल व शेतकऱ्यांचे झालेले नुकसान भरपाई मिळेल.


सन २०२४-२०२५ मध्ये काही राहिलेल्या शेतकऱ्यांची नुकसान भरपाईचे रक्कम अजून पर्यंत मिळालेली नाही ती त्यांना त्वरीत देण्यात यावी. आपण आपल्या विभागाला आदेश देवून तात्काळ शेतकऱ्यांचे मृग बहाराचे पंचनामे करायला लावून शेतकऱ्यांना शासनाकडून मदत मिळेल अशी तरतुद करावी.

अन्यथा शेतकऱ्यांना जर न्याय मिळाला नाही तर सर्व संत्रा उत्पादक शेतकरी तिव्र आंदोलन करतील असा इशारा सर्व पक्षीय शेतकरी संघर्ष समिती कारंजातर्फ निवेदनतुन शासनास देण्यात आला. निवेदन देतेवेळी कारंजा तालुक्यातील बहुसंख्य संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला होता.

## शेतात पेरलेले बियाणे उगवलेच नाही

### बियानें व कंपनीच्या गुणवत्तेवर प्रश्न चिन्ह ;आष्टी तालुक्यातील प्रकार






**महासागर प्रतिनिधी**
**आष्टी, दि. २९ जून**

आष्टी तालुक्यात पहिला पाऊस पडताच पेरणीला सुरवात झाली. पेरणी करण्यासाठी आष्टी, तळेगाव (शा. प.)येथील कृषी केंद्रातून शेतकऱ्यांनी सोयाबीन बियाणे खरेदी केले. सोयाबीन बियाणे पेरणी केल्यावर पाच दिवसानंतर ही बियाणे उगवले नाही अश्या तक्रारी आता समोर आल्या आहेत.

सविस्तर असे कि,आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांनी आष्टी, तळेगाव (शा. प.)येथील कृषी केंद्रातून सोयाबीन बियाणे खरेदी केले. खरेदी केलेले बियाणे शेतात पेरणी केले. पाच दिवस लोटले तरी बियाणे उगवले नाही. बियाणे उगवले नाही म्हणून शेतकऱ्यांनी कृषी केंद्रातील दुकान मालक यांना सांगितले. कृषी केंद्र चालकांनी या बाबतीत अधिक ति चौकशी केली तेव्हा तेव्हा बियाणे पुरवठा करणाऱ्या कंपनीच्या डीलर सोबत चर्चा केली तेव्हा त्यांनी शेत कऱ्याच्या शेतात जाऊन पाहणी केल्यावर सांगता येईल असे सांगितले.

बोरखेडी येथील शेतकरी श्रीकुष्ण चांदीवले व थार येथील मारोती बिटणे व इतर शेतकऱ्याच्या शेतात ही सोयाबीन बियाणे उगवण झालेच नाही अश्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. बोगस बियाणे देऊन शेतकरी यांचे नुकसान झाले आहे तर कृषी केंद्र चालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. शेतकऱ्यांनी दिलेल्या माहिती प्रमाणे सिद्धा कंपनी २०९८सोयाबीन याच कंपनी चे बियाणे उगवले नाही अशी माहिती देण्यात आली आहे.

## जात पडताळणी प्रमाणपत्राच्या पुर्ततेसाठी विशेष शिबिराचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. २९ जून**

सन २०२५-२६ शैक्षणिक सत्रात जे विद्यार्थी १२ विज्ञान शाखेला, व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेशित आहे. तसेच जात प्रमाणपत्र पडताळणीचे अर्ज सादर केले आहेत व त्यांचे प्रकरण त्रुटीत आहे.

अशा प्रकरणाच्या आक्षेपाची पुर्तता करण्यासाठी राजर्षी शाहू महाराज जयंती पर्वा अंतर्गत २६ जुन ते ४ जुलै या कालावधीत विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. प्रकरणात त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांनी शिबिरात उपस्थित राहून त्रुटीची पुर्तत करुन घ्यावी, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त तथा सदस्य यांनी केले आहे.

## कानगाव मंडळात भाजप पक्षात खिंडार

**महासागर प्रतिनिधी**
**गाडेगाव, दि. २९ जून**

हिंगणघाट तालुक्यातील कानगाव मंडळात अंतर्गत कलह वाढत असून भाजप उपजिल्हा अध्यक्षांसह अनेक कार्यकर्त्यांनी दिनांक २८ जून रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे उपस्थितीत भंडारा येथील कार्यक्रमात भाजप उपाध्यक्ष संजय गिरी,गाडेगाव, भगवंत भोयर कानगाव, दिलीप खराबे,कडूकर,यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेत



प्रवेश घेतला,

यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणूक जोमाने कामाला लागण्याचे आदेश दिले,सोबतच भरघोस निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे सांगून कार्यकर्त्यांचे पक्षप्रवेशाबदल अभिनंदन केले.

ऐन निवडणुकीच्या तोंडावर कानगाव मंडळात पक्ष फुटल्याने येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणूकवर याचा गंभीर परिणाम होणार आहे,कानगाव येथील मंडळ अध्यक्ष निलेश किटकुले यांचेकडून कार्यकर्त्यांना विश्वासात घेतले जात नसुन ते हुकूमशाही पध्दतीने वागत असल्याचा आरोप कार्यकर्त्यांकडून केला जात आहे.

> मी गेल्या दहा वर्षांपासून कानगाव, अल्लीपूर मंडळात पक्षाचे काम करीत होतो पक्ष नेतृत्वाने दिलेले काम निष्ठेने केले,माञ गाडेगाव ते कानगाव या रस्त्यासाठी वारंवार मागणी करुन सुध्दा पक्षातील लोकप्रतिनिधींकडून दखल घेतली गेली नाही,निवडणुकीपूर्वी दिलेले आश्वासन पाळले गेले नाही,परिणामी कार्यकर्त्यांत प्रचंड नाराजी असल्याने मला हा निर्णय घ्यावा लागला.

## वर्धा नदी काठावर असलेले ते घर जमीनदोस्त होण्याच्या मार्गावर

### रस्त्याला पडल्या भेगा, जीव मुठीत घेउन काढावी लागते रात्र डॉ. राजेंद्र पन्नासे यांची दहा वर्षांपासून पायपीट

**महासागर प्रतिनिधी**
**आष्टी , दि. २९ जून**

आष्टी तालुक्यातील वर्धा नदी काठावर वसलेल्या भारसवाडा येथील डॉ. राजेंद्र फॅन्नासे यांच्या घराजवळ असलेली नदीची भूषभूशीत माती खचू लागली असून राहते घराजवळ रस्त्यावर तडा निर्माण होऊन घर जमीनदोस्त होण्याच्या मार्गावर आहे. माळीण घटनेची पुनःराऊत्ती होईल काय? अशी भीती व्यक्त होत आहे.



सविस्तर असे कि,आष्टी तालुक्यातील भारसवाडा गावाजवळ वर्धा नदी अगदी लागून आहे. वर्धानदीकाठावर नागरीवस्ती असून त्या वस्तीच्या शेजारी डॉ. राजेंद्र फॅन्नासे यांचे घर आहे. घरात जायचे झाल्यावर नदीच्या काठाने जाऊन घरात प्रवेश करावा लागतो. वर्धा नदीच्या पात्रात सरांक्ष्ण भिंत बांधावी म्हणून गेल्या दहा वर्षांपासून कागदोपत्री पाठपुरावा सुरूच आहे. ग्रामपंचायत ला वेळोवेळी सूचना केल्या, जिल्हाधिकारी, तहसीलदार, आमदार, खासदार यांना निवेदन वर्धा नदीच्या काठावर स्वरांक्षण भिंत निर्माण करावी म्हणून मागणी केली. गेल्या दहा वर्षांपासून पाठपुरावा सुरूच असला तरी नदीच्या काठावर आता पाऊस पडताच एक फूट जागा तेवढी शिल्लक आहे. या जागेवर तडा गेल्या असून निर्माण केलेले घर केव्हा जमीन दोस्त होईल अशी भीती व्यक्त होत आहे.

मागील वर्षी अधिकारी व कर्मचारी वर्धा नदीच्या काठावर डॉ. राजेंद्र फॅन्नासे यांच्या घरी आले होते. स्वराक्षण भिंत बांधन्यात येणार आहे असे आश्वासन देण्यात आले होते. एका वर्षाचा कालावधी लोटला तरी बांधकाम करण्यात आले नाही. आष्टी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी फॅन्नासे यांना लेखी पत्र देऊन तोंडाची पाने पुसण्याचा प्रकार केला. माळीण घटनेची पुन्हाराउत्ती होईल कि काय अशी भीती व्यक्त होत आहे. जिल्हा प्रशासनाने येथील घटनेची तात्काळ पाहणी करून संभाव्य घटना टाळावी आशी मागणी करण्यात आली.

## श्री संत मायबाई महाराज याच्या चरण पादुकाचे आर्वी वरून पंढरपूर कडे प्रस्थान

**महासागर प्रतिनिधी**
**आवी , दि. २९ जून**

दिनांक २८ जुन रोज शनिवार ला सकाळी नित्य पुजाअर्चा करून श्री संत मायबाई महाराज तसेच श्री संत आडकुजी महाराज, श्री संत तुकडोजी महाराज, श्री संत लहानुजी महाराज ,श्री सत्यदेव महाराज यांच्या मठातील चरण पादुका सकाळी १०.३० वाजता पंढरपूर कडे प्रस्थान केले

श्री संत शंकर महाराज संस्थान, पिंपळखुटा ता.धामणगाव रेल्वे येथे मुक्कामी राहणार आहे.तसेच उद्या सकाळी



सर्व चरण पादुकाचा रुद्र चा अभिषेक नित्य- उपहार ,भजन - आरती- प्रसाद होवून दुपारी १२.वाजता प्रवास करिता निघेल रात्री चा विसावा अमरावती असणार आहे.

यावेळी श्री संत मायबाई देवस्थान मध्ये कृष्णा गिरधर यांनी पादुका चे सपत्नीक पुजा केली यावेळी पालखी सोहळा प्रमुख रामदास दांगट ,पुणे,सुमतिबाई गिरधर , अंगद गिरधर, एकनाथ गिरधर , शिला गिरधर , मंदा देशमुख ,गहूकर काकु, श्रेयस गिरधर , समिक्षा गिरधर,चित्र गिरधर, विशाखा गिरधर , निमकर काकु , ज्ञानेश्वर भोयर , लता भोयर ,ठाकरे बाबु, प्रकाश पाचघरे, संदीप पोकळे, बिट्टू मुल्ला, इरफान भाई , सोनू महाजन , मंगेश कांडलकर , रुदु तायडे तसेच कसबातील नागरिक,तसेच पिंपळखुटा येथील वारकरी मंडळी उपस्थित होती.

## अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश आमंत्रित

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. २९ जून**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत जिल्ह्यात अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी वर्धा प्रकल्पांतर्गत ७ मुलांचे व ५ मुलींचे असे एकुण १२ वसतीगृहे कार्यरत आहे. यात जिल्हास्तरावरील ४ तर तालुकास्तरावरील ८ वसतीगृहाचा समावेश आहे. या वसतीगृहामध्ये रिक्त असलेल्या प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे.प्रवेश प्रक्रिये संबंधी अधिक माहिती एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात उपलब्ध आहे, तसेच संबंधीत वसतीगृहाचे गृहपाल यांचेशी संपर्क साधावा, असे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी दिपक हेडाऊ यांनी कळविले आहे.

**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ**
मध्यवर्ती कार्यालय: हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,
सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्थानकाजवळ, प्रभादेवी, मुंबई-४०००१३.
दूरध्वनी क्र. ०२२ - ६९३२८१११/ ६९३२८१८१
E-mail: mlwbconteeg@gmail.com, संकेतस्थळ: www.public.mlwb.in

**नोटीस**

महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६-अ (३) अन्वये नोटीस देण्यात येते की, खाली दर्शविलेल्या आस्थापना/ संस्थेमधील कामगार/ कर्मचाऱ्यांच्या **दिनांक ३१ डिसेंबर २०२१** पर्यंतच्या पगार, बोनस वगैरेसारख्या अवितरीत संचयनाच्या रकमा त्यांना न दिल्या गेल्याने मंडळाकडे **दिनांक ३१ मार्च २०२५** पर्यंत जमा झालेल्या आहेत. अशा व्यक्तींच्या नावांची यादी इत्यादी तपशील महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६-अ (३)(अ) अन्वये संबंधित आस्थापनेच्या/संस्थेच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात यावा. संबंधित व्यक्तींना सदर रकमेचा परतावा मिळण्यासाठी त्यांचे संपूर्ण नाव व पत्ता, आस्थापना/संस्थेचे नाव व पत्ता, तिकीट नंबर, हुद्दा व कोणत्या महिन्याची व वर्षाची रक्कम आहे इत्यादी तपशील देऊन आपल्या आस्थापनेच्या शिफारस पत्रासह कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांच्याकडे वरील पत्यावर दोन प्रतीमध्ये अर्ज सादर करावा.

| आस्थापनेचे नाव | रक्कम |
|---|---|
| NAGPUR/WARDHA/CHANDRAPUR | |
| NAGPUR | |
| AUTOMOTIVE MANUFACTURERS PVT LTD (BR-1) | 73869.00 |
| M S R T CORPN NAGPUR DIVISIONAL OFFICE | 165600.00 |
| HNI OFFICE INDIA LTD | 18962.00 |
| AUTOMOTIVE MANUFACTURERS | 687995.00 |
| INDIAN HUME PIPE CO. LTD. | 16822.00 |
| NOTRA LTD | 4.00 |
| WARDHA | |
| WHEELS INDIA LTD | 3538.00 |
| CHANDRAPUR | |
| M S R T CORPN CHANDRAPUR | 13704.00 |

स्वाक्षरीत/-
कल्याण आयुक्त
महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

उपरोक्त जाहीर केलेल्या अवितरीत संचयनाच्या न दिल्या गेलेल्या पगार वगैरे सारख्या रकमांमध्ये मंडळाकडे **दिनांक ३१ मार्च २०२२** पर्यंत जमा झालेल्या आणि मागील सलग तीन वर्ष नोटीसीद्वारे जाहीर केलेल्या रकमांचा महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६-अ (३) अन्वये समावेश करण्यात आलेला नाही. तसेच या रकमांमध्ये **दिनांक १.०४.२०२२ ते ३१.०३.२०२५** या तीन वर्षाच्या कालावधीत मंडळाकडे जमा झालेल्या सर्व रकमांचा समावेश करण्यात आलेला आहे.

## राज्यात सर्वांच्या सामूहिक प्रयत्नातून शिक्षण क्षेत्रात चांगले वातावरण निर्माण करणे गरजेचे : खासदार काळे

### प्राचार्य सतीश जगताप यांना खासदारकाळे यांनी सेवापूर्ती सत्कारार्थ सन्मानित केले



**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. २९ जून**

चांगली संधी जेव्हा मिळते त्या संधीच सोन करण्याचं काम त्या निमित्ताने केलं पाहिजे,शिक्षण क्षेत्रात काम करत असतांना समर्पक भावनेतून शिक्षण क्षेत्रामध्ये काम केलं पाहिजे अस मला वाटते,राज्यात सर्वांच्या सामूहिक प्रायत्नातून शिक्षण क्षेत्रात चांगल वातावरण निर्माण निर्माण करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन खासदार अमर काळे यांनी यावेळी केले.

साने गुरुजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय वडदचे प्राचार्य व मुख्यधापक संघाचे जिल्हाध्यक्ष सतीश जगताप यांचा अधिकारी कर्मचाऱ्यांना मुख्याध्यापक व समस्त शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंद,साने गुरुजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय वडद आणि साने गुरुजी विद्यालय नांदुरा यांच्या वतीने सेवापूर्ती सत्कार समारोहाचे आयोजन महात्मा लॉन नालवाडी येथे करण्यात आले होते.त्यावेळी ते बोलत होते,

यावेळी खासदार अमर काळे यांची प्रमुख उपस्थिती होती,यावेळी खासदार अमर काळे यांच्या हस्ते सेवानिवृत्त प्राचार्य सतीश जगताप यांचा सेवानिवृत्त सत्कार करण्यात आला,यावेळी नालवाडी ग्रामपंचायतचे माजी सरपंच प्रतिभाताई माऊसकर ,महादेवराव सबाने शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सागर सबाने,प्राचार्य मंगेश घोगरे,वरीष्ठ पत्रकार प्रशांत देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी मोठ्या संखेने मुख्यधापक,शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संखेने उपस्थित होते.

## पंढरपूर यात्रेकरीता भाविकांसाठी विशेष बस

### वर्धा विभागातून ७५ बसेस सोडन्यात येणार

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. २९ जून**

श्री. क्षेत्र पंढरपुर येथे आषाढी एकादशी यात्रेनिमित्त जाणाऱ्या भाविकांसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन विभागाच्यावतीने १ जुलै पासून जादा बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. या बसचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन राज्य परिवहन विभागाच्या विभाग नियंत्रकांनी केले आहे.

वर्धा, आवी, व हिंगणघाट आगारातून प्रत्येकी २० बसेस,तळेगाव ६ व पुलगाव आगारातून ९ अशा ७५ जादा बसेस सोडण्यात येणार आहे. वर्धा ते पंढरपूर करीता पूर्ण तिकीट १ हजार ५१ रुपये तर जेष्ठ नागरिक व महिलांसाठी ५२६ रुपये आहे. आर्वी ते पंढरपूर पुर्ण तिकीट १ हजार ५१ रुपये तर जेष्ठ नागरिक व महिलांसाठी ५२६ रुपये, हिंगणघाट ते आजनसरा पंढरपूर पुर्ण तिकीट १ हजार २०२ रुपये तर जेष्ठ नागरिक व महिलांसाठी ६२१ रुपये, हिंगणघाट ते पंढरपूर पुर्ण तिकीट १ हजार १६२ रुपये तर जेष्ठ नागरिक व महिलांसाठी ५८१ रुपये, तळेगाव ते पंढरपूर पुर्ण तिकीट १ हजार ४१ रुपये तर जेष्ठ नागरिक व महिलांसाठी ५२१ रुपये व पुलगाव ते पंढरपूर पुर्ण तिकीट १ हजार ३१ रुपये तर जेष्ठ नागरिक व महिलांसाठी ५१६रुपये आकारण्यात येणार आहे.गावकरी समुह, वारकरी समुह, भजनी मंडळ व मंदीर समिती यासारख्या समुहास एकत्रित थेट प्रवासाची सोय मिळावी याकरीता सर्वच बसस्थानकावरुन बसेस उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

तसेच राज्य परिवहनच्या सर्व सवलती यामध्ये जेष्ठ नागरिक, अमृत जेष्ठ नागरिक योजना, महिला सन्मान योजनेंतर्गत देय असलेल्या तिकिट दरात सवलत देण्यात येणार आहे. भाविकांनी या जादा बसेसचा लाभ घेण्यासाठी संबंधित आगार प्रमुखाशी संपर्क साधावा, असे महाराष्ट्र राज्यमार्ग परिवहन विभागाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

# आणीबाणीचा धडा...

तत्कालीन पंतप्रधान व काँग्रेस पक्षाच्या सर्वोच्च नेत्या इंदिरा गांधींनी देशावर लादलेल्या आणीबाणीला यंदा पन्नास वर्षे पूर्ण झाली. दि. २५ जून १९७५ च्या मध्यरात्रीपासून देशात आणीबाणी जारी झाली आणि एकवीस महिने देशावर केंद्र सरकारची दहशत होती. या काळात निवडणुका रद्द झाल्या, व्यक्तिस्वातंत्र्य व विचार स्वातंत्र्यावर घाला घालण्यात आला, वृत्तपत्रांना सेन्सॉरचा गळफास लावण्यात आला आणि देशभरातील विरोधी पक्षांचे हजारो नेते व प्रमुख कार्यकर्ते तुरुंगात डांबण्यात आले. आणीबाणीचे एकवीस महिने हा देशाच्या इतिहासात काळा चॅप्टर होता. जनभावना व जनप्रक्षोभ लक्षात घेऊन काँग्रेस पक्षालाही आणीबाणीबद्दल नंतर जाहीरपणे माफी मागावी लागली. गेली अकरा वर्षे केंद्रात व देशातील वीस राज्यांत सत्तेवर असलेल्या भारतीय जनता पक्षाने आणीबाणीला पन्नास वर्षे पूर्ण झाली म्हणून २५ जून हा संविधान हत्या दिवस म्हणून देशभर साजरा केला.

१९७१ च्या लोकसभा निवडणुकीत इंदिरा गांधी व काँग्रेस पक्षाला चांगले यश मिळाले होते. मात्र केंद्रात सत्ता मिळाल्यानंतर केंद्र सरकार वेगवेगळ्या कारणांमुळे संकटात सापडले. १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धाने देशावर खर्चाचा बोजा खूप वाढला. १९७३ मध्ये जगभरातील इंधन टंचाईचा फटका भारताला मोठा बसला. महागाई खूप वाढली. भ्रष्टाचारही शिगेला पोहोचला आणि अर्थव्यवस्थेवरही परिणाम झाला. त्याचवेळी म्हणजे १९७४ मध्ये गुजरातमध्ये काँग्रेसचे मुख्यमंत्री चिमणभाई पटेल यांच्या भ्रष्ट कारभाराच्या विरोधात विद्यार्थ्यांनी नवनिर्माण आंदोलन तीव्र केले. गुजरातमध्ये नवनिर्माण आंदोलनाचा भडका उडाल्याने चिमणभाई सरकारला राजीनामा देणे भाग पडले. त्यातून बिहारमध्ये विद्यार्थी आंदोलनाला स्फूर्ती मिळाली. बिहारमध्ये समाजवादी व उजव्या विचारसरणीच्या संघटनांनी एकत्र येऊन तेथील काँग्रेस सरकारच्या विरोधात छात्र संघर्ष समिती स्थापन केली. भ्रष्टाचार विरोधी आंदोलनाचे नेतृत्व लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्याकडे आले व आंदोलनाला आणखी धार चढली. जयप्रकाश नारायण हे गांधीवादी व चले जाव चळवळीत आघाडीवर होते. दि. ५ जून रोजी पाटणा येथे गांधी मैदानावर झालेल्या विराट जनसभेत त्यांनी संपूर्ण क्रांतीचा नारा दिला. छात्र संघर्ष समितीच्या आंदोलनाने संपूर्ण बिहारमधील जनजीवन ठप्प झाले होते. त्याच वर्षी, मे १९७४ मध्ये कामगार नेते जॉर्ज फर्नांडिस यांनी देशभर रेल्वे कर्मचारी संप पुकारून रेल्वेचा चक्का जाम केला. १९७४ व १९७५ मध्ये सर्व देशात असंतोष, अस्वस्थता व केंद्र सरकारविरोधात संताप प्रकट होऊ लागला. सारा देश जयप्रकाश नारायण यांच्याकडे मोठ्या आशेने बघू लागला. दि. १२ जून १९७५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधी यांना दोषी ठरवले व १९७१ मध्ये त्यांनी लढवलेल्या निवडणुकीत भ्रष्टाचार व सत्तेचा दुरुपयोग केल्याचा ठपका ठेवला. तसेच त्यांना सहा वर्षांकरिता निवडणूक लढवण्यास बंदी घालण्याचाही आदेश दिला. मात्र या निकालाविरोधात त्यांना सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यास मुभा देण्यात आली. न्यायालयाने त्यांना पंतप्रधानपदावर राहण्यास मुभा दिली पण संसदीय कामकाजात भाग घेता येणार नाही, असे बजावले. या निकालाने सर्व देशभर इंदिरा गांधींच्या विरोधात वातावरण तप्त झाले.

दि. २५ जून १९७५ रोजी दिल्लीतील ऐतिहासिक रामलीला मैदानावर विरोधी पक्षांची विराट सभा झाली. देशातील दिग्गजांनी सरकार विरोधी भाषणे करून इंदिराजींच्या सत्तेला हादरे दिले. या सभेला अलोट व अफाट गर्दी जमली होती. याच सभेत इंदिरा हटावचा निर्धार विरोधी नेत्यांनी बोलून दाखवला. दिल्लीचे पूर्वाश्रमीचे जनसंघाचे स्थानिक नेते मदनलाल खुराणा यांनी या सभेचे आयोजन करण्यात पुढाकार घेतला होता. काँग्रेस (ओल्ड)चे शांती देसाई, विद्यार्थी परिषदेचे अरुण जेटली, आदी युवा नेते हजर होते. मदनलाल खुराणा यांनी तर खचाखच गर्दीने भरलेल्या सभेत जेव्हा, हम सें जो टकराये गा, अशी घोषणा दिली तेव्हा प्रतिसाद म्हणून उपस्थित असलेल्या हजारोंनी, चूर चूर हो जाएगा असा एक सुरात बुलंद आवाज दिला. प्रकाश सिंह बादल यांनी पंजाबीतून भाषण करून इंदिरा गांधींनी आता राजीनामा द्यावा अशी थेट मागणी केली. लालकृष्ण अडवाणी, आचार्य कृपलानी, राज नारायण, विजयालक्ष्मी पंडित, चरणसिंग, चंद्रशेखर अशा ताकदवान नेत्यांनी सभा गाजवली. अटलबिहारी वाजपेयी यांचे नाव पुकारताच टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. रामलीला मैदानावरील अभूतपूर्व गर्दी पाहून १ सफदरजंग रोडवर राहणारे अस्वस्थ झाले असतील असे ते म्हणाले. वाजपेयी म्हणाले - सभेची अफाट गर्दी पाहूनच सरकारने जनतेचा विश्वास गमावला आहे, हे त्यांना (इंदिरा गांधींना) कळून चुकले आहे... वाजपेयींचे भाषण संपल्यावर गर्दीतून देश को बचाना है, इंदिरा को हटाना है, अशा बुलंद घोषणा दिल्या गेल्या. याच सभेत जयप्रकाश नारायण यांचे ८५ मिनिटे भाषण झाले. इंदिरा गांधींनी राजीनामा दिलाच पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट बजावले. सिंहासन खाली करो, की देश की जनता आती है... असा इशारा याच सभेत देण्यात आला. सैन्य दलाने, पोलिसांनी आणि सरकारी कर्मचाऱ्यांनी सरकारचे बेकायदेशीर व नियमबाह्य आदेश पाळू नयेत असे आवाहन याच सभेत जयप्रकाश नारायण यांनी केले. देशात लोकशाही वाचविण्यासाठी जेलमध्ये जाण्याची तयारी आहे का, असे त्यांनी लोकांना विचारताच हजारोंच्या जनसमुदायाने हात उंचावून प्रतिसाद दिला... जयप्रकाशजींच्या भाषणानंतर काही तासांतच मध्यरात्रीनंतर देशात आणीबाणी जारी झाली आणि विरोधी नेत्यांची देशभर धरपकड सुरू झाली. दि. २१ जून १९७५ ते २१ मार्च १९७७ या आणीबाणीच्या काळात सर्व घटनात्मक व प्रशासकीय अधिकार केंद्र सरकारकडे एकवटलेले होते. देशातील राज्य सरकारे बरखास्त झाली नाहीत पण सर्व राज्यांवर केंद्र सरकारचे कठोर नियंत्रण होते. विरोधी पक्षांचे प्रमुख नेते व १ लाख १२ हजारांहून अधिक कार्यकर्ते यांना आणीबाणीच्या काळात जेलमध्ये डांबण्यात आले होते. मिसा (अंतर्गत सुरक्षा कायदा), डिफेन्स ऑफ इंडिया रूल (डीआयएसआयआर), कॉन्झर्व्हेशन ऑफ फॉरेन एक्स्चेंज अँड प्रिव्हेन्शन ऑफ स्मगलिंग अ‍ॅक्टिव्हिटीज अ‍ॅक्ट (कॉफेपोसा) अशा कायद्यांचा वापर करून विरोधी पक्षांच्या नेत्यांना जेरबंद करण्यात आले. बहुसंख्य विरोधी नेते व कार्यकर्ते यांना मिसाखाली जेलमध्ये टाकण्यात आले होते. आणीबाणीत स्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकारावरच गदा आली होती. रामनाथ गोयंका यांच्या मालकीच्या इंडियन एक्स्प्रेसने आणीबाणीला उघड विरोध दर्शविण्याची हिम्मत केली होती. आणीबाणी लादली गेल्यावर या वृत्तपत्राने निषेध म्हणून अग्रलेखाची जागा कोरी सोडली होती. आमची भूमिका मांडायला सरकारने बंदी घातली आहे, हाच संदेश इंडियन एक्स्प्रेसने देशाला दिला. वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य काढून सेन्सॉरशिप लादली जाणार असेल, तर इंडियन एक्स्प्रेस केवळ पत्र राहील, वृत्तपत्र नाही... अशी खंत रामनाथ गोयंका यांनी व्यक्त केली होती.

आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधींचे पुत्र संजय गांधी यांनी पाच कलमी कार्यक्रम जाहीर केला. कुटुंब नियोजन व झोपडपट्टी निर्मूलन याचा त्यात समावेश होता. एप्रिल १९७६ मध्ये दिल्लीतील तुर्कमान गेट येथे बुलडोझर चालवून झोपडपट्टी हटविण्याचा प्रयत्न झाला तेव्हा झालेला विरोध मोडून काढण्यासाठी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात अनेकांचा मृत्यू झाला. सरकारी कर्मचाऱ्यांची मदत घेऊन कुटुंब नियोजनाचा धडक कार्यक्रम राबवला गेला. विशेषत: उत्तरेतील हिंदी भाषिक राज्यात पुरुषांना नसबंदी करण्याची सक्ती करण्यात येत होती. नसबंदी प्रमाणपत्र नसेल, तर ट्रक चालकांना वाहन चालविण्याचा परवाना मिळणार नाही असेही अनेक ठिकाणी घडले. नसबंदीला होणारा विरोध मोडून काढण्यासाठी उत्तर प्रदेशमधील मुजफ्फरनगर येथे गोळीबार झाला. त्यातही बरेच लोक मरण पावले. १९७६ मध्ये लोकसभा निवडणूक होणे अपेक्षित होते, पण आणीबाणीच्या काळात लोकसभेची मुदत एक वर्षाने वाढविण्यात आली.

देशात काँग्रेसला अनुकूल वातावरण आहे, असा समज झाल्याने इंदिराजींनी १९७७ मध्ये मार्च महिन्यात आणीबाणी उठवली. प्रत्यक्षात लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे पानीपत झाले व विरोधी पक्षांची मोट बांधलेल्या जनता पार्टीचे केंद्रात सरकार स्थापन झाले. काँग्रेस (ओल्ड), समाजवादी, भारतीय लोकदल व जनसंघ, या पक्षांनी एकत्र येऊन स्थापन झालेल्या जनता पार्टीचे सरकार आले व मोरारजी देसाई हे पहिले बिगर काँग्रेसचे पंतप्रधान झाले. जनता पार्टी सरकारने आणीबाणीची न्यायालयीन चौकशी नेमली. आणीबाणीने काँग्रेसची मोठी घसरण झाली. स्वातंत्र्यानंतर देशावर काँग्रेसची असलेली मक्तेदारी आणीबाणीने संपवली. प्रमुख विरोधी पक्ष एकत्र आले तर काँग्रेसचा पराभव होतो हे सिद्ध झाले. इंदिरा इज इंडिया म्हणण्याऱ्यांना आणीबाणीने चपराक दिली. पन्नास वर्षानंतरही काँग्रेसला संविधानाची हत्या केल्याचे टोमणे सहन करावे लागत आहेत.

आणीबाणीनंतरचा जनता पार्टीचा प्रयोग फसला. जनसंघी व समाजवाद्यांचे फार काळ एकत्र राहणे जमले नाही. पूर्वाश्रमीच्या जनसंघीयांनी वाजपेयी - अडवाणींच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीची स्थापना केली. दुसरीकडे जनता पार्टीचे अनेक शकले झाली. आणीबाणीत जेलमध्ये राहिलेले चंद्रशेखर, जॉर्ज फर्नांडिस, प्रमोद महाजन, वेंकय्या नायडू, लालू प्रसाद यादव, मुलायमसिंह यादव, शरद यादव, नितीश कुमार, अरुण जेटली, राम विलास पासवान, अनंतकुमार, जयपाल रेड्डी असे त्यावेळचे अनेक युवा नेते राष्ट्रपातळीवर पोहोचले. देशात निर्माण होत असलेल्या अराजकाला रोखण्यासाठी इंदिरा गांधींनी आणीबाणी आणली, असा युक्तिवाद काँग्रेस आजही करीत आहे. गेल्या अकरा वर्षांपासून देशात अघोषित आणीबाणी आहे असे राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे, जयराम रमेश आदी काँग्रेस नेते रोज मोदी सरकारवर आरोप करीत आहेत.

**राष्ट्रनामा**



**सुकृत खांडेकर**
०९५९४२२४०००
sukritforyou@gmail.com

# जी ७ परिषदेचे मर्यादित यश

जी सेवन म्हणजे ग्रुप ऑफ सेव्हन. सात प्रमुख औद्योगिक विकसीत राष्ट्रांचा गट. या गटात फ्रान्स, संयुक्त अमेरिका, ब्रिटन, जर्मनी, जपान, इटली, व कॅनडा आणि सदस्य नसलेला युरोपियन युनियन (युरोप मधील २७ देशांचा समुह)हे आहेत. या सात राष्ट्रांचा अनौपचारिक रित्या चर्चा करण्याचा हा मंच आहे.

स्थापना

१९७० मध्ये आलेले ऊर्जा संकट, त्यानंतर आलेला विनिमय दरातील चढ उतार, जागतीक मंदी, अविकसित देशांच्या समस्या, या सर्व समस्यांवर विचारविनिमय व उपाययोजना म्हणून १९७३ साली फ्रान्स, संयुक्त अमेरिका, ब्रिटन, जर्मनी, जपान व इटली या सहा राष्ट्रांच्या या गटाची स्थापना करण्यात आली. व जी ६ या नावाने तो ओळखला जाऊ लागला. १९७६ मध्ये कॅनडाला सदस्यत्व दिल्याने जी ७ झाले. पुढील वर्षी रशियाचा समावेश झाला म्हणून जी८ झाले. २०१४ मध्ये क्रिमीयावर केलेल्या आक्रमणामुळे रशियाचे सदस्यत्व स्थगित करण्यात आले व रशिया शिवाय सात राष्ट्रांची बैठक घेण्याचे ठरले. त्यामुळे ग्रुप पुन्हा जी ७ झाला. १९९९ मध्ये जी ट्वेंटी या गटाची स्थापना झाली. त्यात विस राष्ट्रांचा समावेश असल्यामुळे जी ७ चे महत्व थोडे कमी झाले त्यामुळे काही संस्था अथवा राष्ट्रांना परिषदेत आमंत्रित करण्याचे ठरले.

उद्दिष्ट

सदस्य राष्ट्रांच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक बाबतीत स्थैर्य, तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्या साठी उपाययोजना, लोकशाही तत्वाचे पालन व मानवा अधिकारा ची जपणूक, जागतीक शांतता ,सदस्या राष्ट्रा मधील परस्पर सहकार्य समन्वय वाढवणे, गरीब व विकसनशील राष्ट्रांच्या प्रगतीचा विचार,सदस्य राष्ट्रांच्या विकासासाठी मदत करणे, आरोग्य समस्या, शिक्षण, तंत्रज्ञान, विकास आदी विषयावर चर्चा करून प्रगतीच्या दृष्टिकोनातून उपाययोजना करणे,आदी उद्दिष्टे आहेत.

कार्यपद्धती

या परिषदेचे स्वतःचे कायम स्वरूपाचे सचिवालय कोठेही नाही. अध्यक्ष पद दरवर्षी फिरते असून त्याचा क्रम फ्रान्स, संयुक्त राष्ट्र, इंग्लंड, जर्मनी, जपान, इटली, कॅनडा असा आहे, ज्याच्याकडे अध्यक्ष पदाची जबाबदारी असते, तोच आयोजन करतो. परिषदेचे आयोजन दर वर्षातून एकदा केले जाते. निर्णय एकमताने घेतल्या जातो, बहुमताने नाही. घेतलेले निर्णय कायदेशीररित्या बंधनकारक नसले तरी जगाच्या राजकारणात आर्थिक ,सामाजिक व राजकीय क्षेत्रात प्रभाव पाडतात.

कॅनडातील ५१ वी परिषद

जी सेवन ची २०२५ मधील ५१ वी परिषद कॅनडाच्या अल्बर्टा राज्यातील कनानास्किस मध्ये संपन्न झाली. यासाठी सहभागी राष्ट्रांच्या तसेच आमंत्रित राष्ट्रांच्या प्रमुखासह नाटो चे प्रमुख मार्क रूट्टे उपस्थित होते. यात जागतीक शांतता, जागतिक सुरक्षा, मजबूत अर्थव्यवस्था, डिजिटल पद्धतीतील बदल, आदी वर विषयावर चर्चा झाली. या चर्चेत जी सात राष्ट्रा शिवाय, आमंत्रित म्हणून ऑस्ट्रेलिया, मेक्सिको, ब्राझील, दक्षिण आफ्रिका, युक्रेन, भारत, आदींनी भाग घेतला २०१८ पासून भारत सतत या परिषदेत आमंत्रित म्हणून हजर राहत आहे.

परिषदेतील भारताची स्पष्ट भूमिका

दहशतवाद हा जागतिक धोका असून त्या विरोधात सर्वांनी एकत्र येऊन कारवाई करणे आवश्यक आहे. दहशतवादी कारवाया करणारा देश व त्याला त्याचे समर्थन करणारा देश या दोन्ही देशांना त्याची किंमत मोजावी लागेल. असे मोदीने स्पष्ट सांगितले. तसेच जागतिक शांती व समृद्धीसाठी आपल्या विचार व धोरणात स्पष्टता असावी एका बाजूला दहशतवादाविरुद्ध बंदी घालणे व दुसऱ्या बाजूला दहशतवादाला उघडपणे समर्थन करणे अशी धोरणे बंद व्हायला हवीत.

आर्थिक दृष्ट्या अल्पविकसित असलेल्या देशांचा म्हणजे ग्लोबल साऊथ देशांचा (यात दक्षिण अमेरिका व कॅरेबियन तसेच अनेक आफ्रीकन व आशियाई देशांच्या समावेश आहे) आवाज जागतिक व्यासपीठावर पोहोचविणे ही भारत आपली जबाबदारी समजतो. तसेच यांच्या चिंता व गरजा यावर लक्ष देण्याचे त्यांनी आवाहन केले. गेल्या काही वर्षापासून बिघडलेले भारत व कॅनडांचे संबंध व व्यापार सुरळीत करण्यावर भर देण्याचे दोघांनीही ठरविले. व नवीन उच्चायुक्तांची नेमणूक करण्यावर दोघांचीही सहमती झाली ही एक भारताच्या दृष्टिकोनातून बरी उपलब्ध म्हणावी लागेल.

परिषदेतील चर्चीत विषय

परिषदेने काढलेल्या निवेदनात इस्त्राइलला स्वसंरक्षणाचा हक्क असल्याचे मान्य करून त्याला पाठिंबा देण्यात आला. इराणला अण्वस्त्रधारी न होऊ देण्यावर भर् देण्यात आला. रशिया युक्रेन वादात सहाही राष्ट्रांनी युक्रेनला पाठिंबा दर्शविला आहे.तसेच युक्रेनला अधिक मदत करण्याचाही निर्णय घेण्यात आला. मिडल ईस्ट मध्ये शांतता ठेवणे, भारत व कॅनडा मधील परस्पर व्यापार संबंध सुरळीत करण्याच्या हेतुने वाटचाल, तसेच दोन्ही राष्ट्रातील उच्चायुक्तांच्या नेमणुकीवर भर देण्यात आला.हवामानातील बदल,जागतीक अर्थव्यवस्था, चीनच्या वाढत्या प्रभावा बाबत सावध चर्चा झाली.हरित ऊर्जा, तंत्रज्ञान क्षेत्रातील गुंतवणूक वाढविण्यावर भर देण्यात आला.

इजराइल इराण, युक्रेन रशिया, यांच्या मधील संघर्षावर चर्चा झाली. मात्र गाजा हमास यावर चर्चा झाली नाही. तसेच विकसनशील राष्ट्रासाठी ठोस आर्थिक मदत, हवामान बदला मधील स्पष्ट कृती योजना, जागतिक दारिद्र्य निर्मूलनासाठी उपाययोजना,आरोग्य, मानवाधिकार याबाबतही कोणतेही ठोस निर्णय झाले नाहीत. याशिवाय अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे मधूनच निघून जाणे आणि त्यांनी सुरू केलेले टेरीफ युद्धा चाही प्रभाव जी ७ वर पडल्याचे जाणवत होते.

त्यामुळे कॅनडात झालेल्या जी सेवन राष्ट्राच्या परिषदेला मर्यादित यश मिळाले असे म्हणावे लागेल.

जी ७ या परिषदे च्या यशस्वीते बाबत मत भिन्नता असली तरी भारताच्या दृष्टीने भारत व कॅनडाशी बिघडलेले संबंध सुरळीत होण्याच्या दृष्टीने बोलणी झाली आहे ही भारतासाठी एक उपलब्धी म्हणावी लागेल.

**भालचंद्र ठोंबरे**
९८३४३५०८९५

# सांख्यिकी: आधुनिक भारताची दिशा ठरवणारे विज्ञान



२९ जून आधुनिक भारतीय संख्याशास्त्राचे जनक, इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटचे संस्थापक प्रो. प्रशांतचंद्र महालनोबिस यांचा जन्मदिवस. हा दिवस राष्ट्रीय सांख्यिकी दिन म्हणून साजरा केला जातो. त्यांच्या कार्याचा आणि आजच्या काळात आकडेवारीने व्यापलेल्या जगाचा आढावा घेणे आजच्या घडीला अत्यंत महत्त्वाचे आहे.

प्रो. महालानोबिस यांचे योगदान:

१९१२ मध्ये कोलकात्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमधून भौतिकशास्त्रात पदवी घेतल्यानंतर इंग्लंडमध्ये शिक्षण घेत असताना त्यांना संख्याशास्त्राची गोडी लागली. यानंतर त्यांनी आपले संपूर्ण जीवन संख्याशास्त्राच्या अध्ययन अध्यापनासाठी वाहून घेतलं. भारतात परतल्यावर त्यांनी भारतातील विद्यापीठामध्ये संख्याशास्त्र विषय सुरु केला. त्यांच्या प्रयत्नाने आणि पुढाकाराने आपल्या देशात अल्पावधीतच जागतिक दर्जाचे काम सुरु झाले आणि अन्य देशांच्या तुलनेत भारत हा संख्याशास्त्र विषयात प्रगत झाला. महालानोबिस यांनी केवळ शिक्षण आणि संशोधनात नव्हे, तर शासकीय धोरणनिर्मितीतही आकडेवारीचे स्थान प्रस्थापित केले. त्यांनी स्थापलेली इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट संस्था आजही संख्याशास्त्र क्षेत्रात जागतिक मान्यता प्राप्त आहे. 'महालानोबिस अंतर' या त्यांच्या संशोधनामुळे विविध क्षेत्रात गटांमधील अंतर मोजण्याची प्रभावी पद्धत मिळाली.हवामानशास्त्र, पर्जन्यमान, पूरनियंत्रण, धरण बांधणी यामध्ये आकडेवारीचा वापर त्यांनी करून दाखवला. 'राष्ट्रीय नमुना पाहणी संघटना' आणि 'केंद्रीय संख्याशास्त्रीय संघटना' यांच्या स्थापनेमागे त्यांचा मोलाचा वाटा होता.भारतातील पहिला संगणक १९५६ मध्ये इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट मध्ये बसवण्याचे श्रेयही त्यांच्याकडे जाते.

आजचा संदर्भ: कृत्रिम बुद्धिमत्ता, बिग डेटा आणि संख्याशास्त्र

आज आपण कृत्रिम बुद्धिमत्ता, मशिन लर्निंग, बिग डेटा या शब्दांनी परिचित झालो आहोत. पण यामागील मुळ संकल्पना म्हणजे आकडेवारी आणि संख्याशास्त्रच !आरोग्यसेवा, औषधांची परिणामकारकता, अर्थव्यवस्था, हवामान अंदाज, कृषी, जलव्यवस्थापन, शिक्षण आणि अगदी इंटरनेटवरील वर्तन (युजर बिहेवियर) समजून घेणे हे सर्व आकडेवारीशिवाय अशक्य आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता व डेटा सायन्समध्ये संख्याशास्त्राच्या संकल्पना जसे की प्रायिकता, रिग्रेशन, सॅम्पलिंग, क्लस्टरिंग यांचा मोठा वापर होतो.धोरण आखताना सरकार किंवा कंपन्या 'डेटा ड्रिव्हन डिसिजन' घेतात त्यामागे आहे संख्याशास्त्र.

सांख्यिकीची वाढती गरज आणि भविष्य

केंद्रीय लोकसेवा आयोग अंतर्गत इंडियन स्टॅटिस्टिकल सर्विसेस ही परीक्षा घेतली जाते.उद्योग, बँकिंग, विमा, माहिती तंत्रज्ञान, उत्पादन, वाहतूक, पर्यावरण, जैवविज्ञान इत्यादी क्षेत्रात डेटा ॲनालिस्ट्स आणि स्टॅटिस्टिशियन (संख्याशास्त्रज्ञ )ची गरज झपाट्याने वाढते आहे.संख्याशास्त्र हे फक्त सूत्रांचे किंवा आकड्यांचे नव्हे, तर अचूक निर्णय घेण्याचे विज्ञान आहे.

तरुणांसाठी संदेश

हल्ली अनेक युवा आकडेवारीकडे कोरडा विषय म्हणून पाहतात. पण हेच शास्त्र जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राशी निगडीत आहे. संख्याशास्त्र स्वीकारा कारण भविष्य हे डेटा आणि बुद्धिमत्तेचे आहे.प्रो. महालानोबिस यांनी दाखवलेला मार्ग आज भारताला आत्मनिर्भर आणि वैज्ञानिक दृष्ट्या सक्षम बनवतो आहे. आजचा 'राष्ट्रीय सांख्यिकी दिन' हा केवळ गौरवाचा नाही, तर नव्या संधींचा विचार करण्याचा दिवस आहे. राष्ट्रीय सांख्यिकी दिनाच्या सर्वांना शुभेच्छा !

**प्रा. विजय कोष्टी,**
**कवठे महांकाळ (जि. सांगली).**

## राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने

# विधिमंडळाचे अधिवेशन फलदायी ठरो!

राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन आजपासून सुरु होत आहे. नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर पार पडणाऱ्या या पावसाळी अधिवेशनात सरकारवर आरोपांचाच पाऊस पडण्याची अधिक शक्यता आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफी, अवकाळी पावसामुळे वाया गेलेल्या शेतपिकांची नुकसानभरपाई, शक्तिपीठ महामार्गाला ठिकठिकाणी होत असलेला विरोध, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लांबल्यामुळे पावसाच्या आरंभी शहरांची झालेली दुर्दशा, रस्त्यांवरील खड्डे, पुण्यातील वैष्णवी हगवणे यांचा हुंडाबळी, राज्यातील स्त्री अत्याचाराचा वाढत आलेख, लाडक्या बहिणींना वाढीव पैसे केव्हा मिळणार ?, पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रासह देशातील २६ पर्यटकांची झालेली हत्या, पुण्यातील इंद्रायणी नदीवरील पूल कोसळण्याची घटना आणि सध्या गाजत असलेला विषय म्हणजे शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषेची सक्ती या सर्व प्रश्नांवर विद्यमान मंत्र्यांना घेरण्याची पुरती तयारी विरोधी पक्षांनी केली आहे. अर्थात हे सर्व अपेक्षितच असल्याने सरकारमधील संबंधित मंत्री आणि मुख्यमंत्री यांनीही या सर्व प्रश्नांना उत्तरे देण्याची तयारी केली असेलच.



**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई**
**मो.क्र. ९६६४५५९७८०**

राज्यातील सामान्य जनतेच्या प्रश्नांवर आणि समस्यांवर सत्ताधारी आणि विरोधी पक्ष यांनी एकत्रितपणे सारासार चर्चा करून त्यावर ठोस उपाययोजना काढण्याच्या दृष्टीने भरवण्यात येणाऱ्या अधिवेशनांच्या एकूण कालखंडात साधक-बाधक चर्चा नेमकी किती काळ होते ? अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासूनच विरोधी पक्षाची मंडळी अधिवेशन चालू न देण्याच्याच तयारीत असतात. जनतेचे कोणते प्रश्न सभागृहात मांडायचे यापेक्षा सरकारला कोंडीत कसे पकडायचे यामध्येच यांना अधिक स्वारस्य असते. सभागृहाच्या प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन करणे, अधूनमधून सभात्याग करणे, चर्चेच्या कालावधीत आरडाओरड आणि घोषणाबाजी करत गोंधळ घालणे यांसारख्या प्रकारांमुळे अधिवेशन काळात सभागृहाला रणांगणाचे स्वरूप आलेले असते. यामध्ये गैरवरणुकीमुळे अनेकदा काही आमदारांचे निलंबन करावे लागते. मग पुन्हा निलंबन कसे नियमबाह्य आहे, विरोधी आमदारांचे निलंबन करून सरकार कसा जनतेचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहे, यासाठी पुन्हा सरकारविरोधात निदर्शने, घोषणाबाजी केली जाते. जनतेचे प्रश्न राहिले बाजूला एकमेकांची उणीधुणी काढण्यातच अधिवेशनाचे सूप वाजते.

अधिवेशनाच्या काळात सभागृहाला आलेले आखाड्याचे स्वरूप पाहता असा गोंधळ घालण्यासाठी आमदारांना आपण निवडून देतो का हा प्रश्न कोणत्याही सामान्य मतदाराला पडल्यावाचून राहात नाही. वर्षातून तीन वेळा ही अधिवेशने भरवली जातात. प्रत्येक अधिवेशनासाठी सरकार कोट्यवधी रुपये खर्च करते. कष्टकरी सामान्य जनतेच्या घामाच्या मिळकतीतून कररूपाने सरकार दरबारी जमा होणारा हा पैसा असतो. त्याचा विनियोग व्हायला नको का ? सामान्य नागरिकांवर ओढवलेल्या नैसर्गिक आणि कृत्रिम संकटांवर सरकारने योग्य तो मार्ग काढावा, सामान्य जनतेच्या मूलभूत गरजा पुरवण्यात येणाऱ्या अडथळ्यांवर उपाययोजना काढाव्यात, विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा मिळाव्यात, युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, राज्यात कायदा आणि सुव्यवस्था यांचे पालन व्हावे. स्त्रियांचे रक्षण व्हावे, सरकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचाव्यात, आरोग्य व्यवस्थेबाबत सुसूत्रता असावी , एखाद्या गंभीर मुद्याबाबत स्वतंत्र कायदा करण्याची आवश्यकता असल्यास त्याबाबत विचारविनिमय घडवून आणणे, प्रचलित कायद्यात काही सुधारणा करायची असल्यास त्यावर सविस्तर अभ्यास करणे आणि या सर्वांच्या सुयोग्य नियोजनासाठी एकमेकांची मते जाणून घेणे यासाठी अधिवेशन ही संधी असते; मात्र या संधीकडे सरकारला नामोहरम करण्याची पर्वणी म्हणून पहिले जात आहे. हे केवळ राज्यात घडते असे नव्हे. संसदेच्या प्रत्येक अधिवेशन काळातही हीच प्रथा राबवली जाते. गेल्या काही वर्षांतील या अधिवेशनांची फलश्रुती पाहता ती नगण्यच आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सभागृहातील गोंधळ थांबवताना आणि आमदारांना शिस्तीचे धडे देताना सभागृहाच्या अध्यक्षांचा कस लागतो, त्यांना नाहक मनस्ताप सहन करावा लागतो, काहीवेळा तर गोंधळ थांबवण्यासाठी पोलिसांनाही पाचारण करावे लागते. यापुढेही अधिवेशन काळात हेच घडणार असेल तर ही खर्चिक अधिवेशने हवीत तरी कशाला ?

# राज्यकर्त्यांनी व पालकवर्गांनी आपली मानसिकता बदलली पाहिजे !

नुकत्याच शाळा सुरू झाल्या आहेत.मुलांचे प्रवेश सोशल मिडीयावर धुमाकूळ घालीत आहेत. मुलांचे प्रवेश उत्सव कसे आकर्षक, भारदस्त आणि नाविन्यपूर्ण होतील याकडे शाळा व्यवस्थापन लक्ष देते आहे.मराठी माध्यमांच्या शाळा यात मागे नाहीत.प्रवेश उत्सव हा खरा तर आनंदोत्सवच आहे.लहान मुलांना शाळेची ओढ असते.चारचौघे समवयस्क मिळतात याचा मुलांना आनंद होत असतो.यात पालकांची भुमिका ही महत्वाची असते.मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये ड्रेस,पुस्तके आणि दुपारचे भोजन हे मुफ्त असते. याचा संपुर्ण खर्च राज्य सरकार करते. या सर्व सुविधा वेळेवर मिळाल्या तरच मुलांचा व पालकांचा आनंद व्दिगुणीत होत असतो.परंतु असे होत नसल्याने ती एक औपचारीकता ठरत असते. याचा विचार सरकारने केला पाहिजे.

मराठी माध्यमांच्या शाळेचे महत्व राज्य सरकारने आणि पालकांनी समजून घेतले पाहिजे.महाराष्ट्राची राजभाषा ही मराठी असून तीचे महत्व कुठल्याही परिस्थितीत कमी लेखता कामा नये. आज मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे.मराठी भाषा ही महाराष्ट्राची मातृभाषा (बोलीभाषा)असल्याने तिचा वापर सर्वत्र व्हायला पाहिजे.तिचे महाराष्ट्रातील महत्व दुय्यम ठरता कामा नये.परंतु असे होत नसल्याने मराठी माध्यमांच्या शाळा आज ओस पडतांना दिसून येत आहेत.यात मुख्यत्वे चुक ही राज्य सरकारचीच आहे.कारण राज्य सरकारने मराठी भाषेला गांभिर्याने घेतलेले नाही.तीचे पालनं पोषणं योग्य पध्दतीने केले जात नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.याचे कारण इंग्रजी भाषेचा प्रभाव हा दिवसेंदिवस वाढतच चाललेला आहे.यांस खतपाणी पुरविण्याचे काम राज्य सरकार करते आहे.राजकारणी व ख्रिश्चन मिशनरीजच्या लोकांनी संगणमत करून इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे प्रस्थ वाढविण्याचे काम केलेले आहे.जे निषेधार्य ठरते आहे.याचा वाईट परिणाम मराठी भाषिक लोकांवर झालेला पहावयास मिळतो आहे.

इंग्रजी ही इतर देशांमध्ये प्रामुख्याने बोलली जाते.ती व्यवहारात आणली जाते.याचा अर्थ आपणं तिच्या आहारी जाता कामा नये. चीन, जपान, कोरीया इ. देशांकडून बरेचकाही शिकण्यासारखे आहे. त्यांनी आपली भाषा व संस्कृती ही सोडलेली नाही.त्यांनी आपल्या भाषेला कमी लेखून इंग्रजी भाषेचे महत्व वाढविलेले नाही किंवा तीचे उद्दात्तीकरण सुध्दा केलेले नाही. भारतातच हे कां व्हावे ? यासाठी आपले राज्यकर्ते सर्वस्वी जवाबदार ठरतात आहेत.त्यांनी आपली मुलें उच्च शिक्षणासाठी परदेशात पाठवून भारतीय भाषेचे,ज्ञानाचे महत्व हे कमी केले आहे.स्वातंत्र्यपुर्व भारतातील शिक्षण हे उच्च दर्जाचे होते. नालंदा, तक्षशिला सारख्या शिक्षण संस्था नावरूपाला आल्या होत्या.याचे कारणं आपणं आपले अस्तित्व कुणाकडे गहाणं ठेवले नव्हते.ते स्वसामर्थ्यावर टिकवून ठेवले होते. आज राज्य सरकारे परकीय शिक्षण संस्थांसमोर पायघड्या घालीत आहेत. आपल्या संस्कृतीला, ज्ञानाला कमी लेखत आहेत. जे सर्वस्वी चुकीचे चालले आहे.पालक वर्गाला काय चांगले,काय वाईट हे कळेनासे झाले आहे.विद्यार्जन हे केवळ पैसे कमविण्याचे साधन आहे. असे मनावर बिंबवले जात आहे. यामुळे पालकांवर इंग्रजीचे भूत सवार झाले आहे. जो तो मम्मी-पप्पा शिवाय पुढे जायला तयार नाही. परदेशी लोकांवर आपली भाषा हावी झालेली नाही.तर आपणांवर ती हावी कां व्हावी ? यासाठी केंद्र व राज्य सरकारचे धोरणं कारणीभूत ठरते आहे.

भारत हा कृषीप्रधान देश आहे.असे पुस्तकातून सांगितले जाते. परंतु आजची वास्तविकता काय दर्शविते आहे ? कृषीप्रधान देशात पुस्तकी ज्ञानापेक्षा,प्रत्यक्ष प्रयोग,कृती करण्याला जास्त महत्व शिक्षणात दिले गेले पाहिजे.परंतु आज शिक्षणातून प्रत्यक्ष प्रयोगाला वगळले गेले आहे. शेतीत कुठल्याही प्रकारचे प्रयोग करून दाखविले जात नाहीत. शाळांमधून तर प्रयोगशाळा बादच झालेल्या आहेत. शारिरीक शिक्षणाला शिक्षणात कुठलेही स्थान राहिलेले नाही. बागकाम,व्यवसाय काम याला शिक्षणातून हद्दपार केले गेलेले आहे. निव्वळ पुस्तकी शिक्षण दिले जात असल्याने पुस्तकी गुणांना अवास्तव महत्व प्राप्त झाले आहे. यामुळे दुस-यांवरील परावलंबीत्व वाढत चालले आहे.कुठलेही साधे काम करण्यासाठी बाहेरची व्यक्ती शोधून आणावी लागते आहे.यामुळे वैयक्तीक खर्चात वाढ झालेली असून स्वतः काम करण्याची वृत्ती लोप पावत चालली आहे.कष्टाची कामें नकोशी झालेली आहेत.यामुळे शेतक-यांची मुलें शेती करण्यास धजावत नाही आहेत.ते शेतीमधील आधुनिक तंत्रज्ञान अवगत करण्यात मागे पडलेले आहेत. त्यांना मातीत काम करण्याची लाज वाटते आहे. निसर्गाशी जुळवून घेतांना त्यांची दमछाक होते आहे.कारणं आपल्या पोराला इंग्रजी बोलता आल म्हणजे सर्वकाही आल अशी त्यांची समज करून देण्यात आलेली आहे.येथेच त्यांची फसगत झालेली आहे.इंग्रजी भाषेचा आणि शेती तंत्रज्ञानाचा, व्यवसायाचा काय संबंध ? इंग्रजी भाषा येत नव्हती तेंव्हाही आपले पुर्वज उत्तम पध्दतीने शेती,व्यवसाय करीत होते.मग आजच इंग्रजी भाषेला एवढे महत्व कां दिले जात आहे ? कारणं स्थानिक भाषेचा विस्तार करण्यात राज्य सरकारे कमी पडलेली आहेत.सर्व प्रकारचे शिक्षण हे स्थानिक भाषेतून उपलब्ध करून देणे हे कुणाचे काम आहे ? केंद्र व राज्य सरकारे आपली जवाबदारी झटकून यातून मोकळे होऊ पहात आहेत.जे चुकीचे चालले आहे.आज महाराष्ट्रात मराठी भाषेतून सर्व प्रकारचे शिक्षण उपलब्ध नाही.यासाठी इंग्रजी भाषेचा सहारा घ्यावा लागतो आहे.यामुळे पालकांना इंग्रजी भाषेचे आकर्षण वाटते आहे.इंग्रजी भाषेशिवाय कुठलेही काम होवू शकत नाही असा गैरसमज करून देण्यात राज्य सरकारे यशस्वी झालेले आहेत.

आज गरज नसतांना महाराष्ट्रातील सर्व कार्यालयांमध्ये मराठी भाषे ऐवजी इंग्रजी भाषा वापरली जाते आहे.यामुळे जनतेला वीनाकारणचा त्रास सहन करावा लागतो आहे. आपल्या कार्यालयीन कामांसाठी दुस-यांची मदत घ्यावी लागते आहे. यामुळे पदोपदी दलालांचे प्रस्थ वाढलेले आहे.मग ते बँक असो, आरटीओ कार्यालय असो,कोर्ट असो वा इतर संस्था वा कार्यालये असोत इंग्रजी भाषेशिवाय कामें चालतच नाहीत. यात जोपर्यंत बदल होणार नाही.तोपर्यंत देशातील भ्रष्टाचार कमी होणार नाही. देशात आमुलाग्र परिवर्तन शक्य होणार नाही. चीनने, जपानने आपल्या भाषेच्या बळावर स्वत:ची प्रगती साधलेली आहे.मग भारतानेच यात मागे कां रहावे ?

यासाठी पालक वर्गांनी,जनतेनी आपली मानसिकता बदलली पाहिजे. केंद्र व राज्य सरकारला स्थानिक भाषेवर आधारीत अभ्यासक्रम सुरू करण्यास भाग पाडले पाहिजे.तरच संपुर्ण देशाची सर्वांगीण प्रगती ही वेगाने होवू शकते.यामुळे इंग्रजी भाषेच्या नावाखाली स्थानिक रोजगार कुणीही हिरावून घेऊ शकणार नाहीत.

याची जाण पालक वर्गांनी ठेवली पाहिजे. यासाठी राज्य सरकारला बाध्य केले गेले पाहिजे.उगीचच आंतरराष्ट्रीय भाषा आहे म्हणून इंग्रजी भाषेचा बाऊ करून चालणार नाही. इंग्रजी भाषा यायला हवी परंतु ती आपल्या मानगुटीवर बसता कामा नये. याची काळजी राज्यकर्त्यांनी व भारतीय नागरिकांनी घेतली पाहिजे. यासाठी देशातील नागरिकांनी केंद्र व राज्य सरकारला आपले धोरणं बदलविण्यास भाग पाडले पाहिजे. तरच भारत देश तिसरी महाशक्ती म्हणून संपुर्ण जगासमोर आपले स्थान घट्ट करू शकणार आहे.

**मिलिंद गड्डमवार**
तह.राजुरा, जिल्हा चंद्रपूर(म.रा.)
(सामाजिक कार्यकर्ते व मुक्त पत्रकार)
मो.क्र.९५११२१५२००

## अशोकायन...

### हे वरुणराजा

उशीरा का बरस पण
मधात पाडू नको खंड
नाहीतर बळीराजाला
विकावा लागेल भूखंड ..!

मारावे की तारावे
आहे तुझ्या हाती
एवढी कृपा कर
दयाधना आमच्या वरती ..!

समतोल बरसून
येऊ दे पिके बहरून
बळीच्या मनोकामना
पूर्ण कर तुझ्या हातून .. !



**प्रा.अशोक सारडा मेहकर**
**(९४२२३९४३३९)**

## वाढलेल्या मतदारसंख्येने काँग्रेसचे ढोंगही सपशेल फेल जाईल : रविंद्र चव्हाण यांचा काँग्रेस मविआवर प्रहार

**मुंबई, २९ जून :** राहुल गांधी आणि महाविकास आघाडीवाले वारंवार वाढलेल्या मतदारसंख्येबाबत बोलत आहेत. पण जसे भाजपाच्या विजयी मतदारसंघात मतदार संख्या वाढली, तशीच ती महाविकास आघाडीच्या विजयी मतदारसंघात सुद्धा वाढली, असे असतानाही राहुल गांधींसह विरोधक वाढलेल्या मतदानाची टूम लावून धरत आहेत. विरोधकांनी अशा कितीही वावड्या उठवल्या, तरीही यापूर्वी जसे संविधान बचाव आणि ईव्हीएम हटाव सारखे मविआचे ढोंगी प्रयोग दणदणीत आपटले, तसेच वाढलेल्या मतदारसंख्येचे ढोंगही सपशेल फेल जाईल कारण काँग्रेसच्या या भूलथापांना महाराष्ट्र आता भुलणार नाही, अशा शब्दात भाजपचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष व आमदार रविंद्र चव्हाण यांनी विरोधकांना जोरदार प्रत्युत्तर दिले. विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात लाखो, करोडो मते वाढल्याचा दावा काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि अन्य नेते वारंवार करत आहेत. त्या पार्श्वभूमीवर आमदार रविंद्र चव्हाण यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली.

रविंद्र चव्हाण पुढे म्हणाले, गेल्या ११ वर्षांत देशवासीयांना दहशतवाद, नक्षलवाद, घराणेशाही, भ्रष्टाचार आणि लांगुलचालनापासून सुटका मिळाली आहे. देशाचा अभूतपूर्व विकास होत आहे. वन्दे भारतसारख्या आधुनिक रेल्वे धावत आहेत. मेट्रो नेटवर्क दिवसागणिक वाढतं आहे. उत्तम रस्त्यांचं जाळं उभारलं जातंय, उत्तम शैक्षणिक सुविधाही उभारल्या जात आहेत. औद्योगिक विकासातून रोजगार निर्मितीला मोठी चालना मिळाली आहे. एकीकडे विकास चालू असतानाच दुसरीकडे वारसा आणि संस्कृती जपली जात आहे. प्रत्येक संकल्प सिद्धीस नेत भारतीय जनता पार्टीने जनतेचा अतूट विश्वास कमावला आहे. म्हणूनच जनतेने राष्ट्र आणि महाराष्ट्र सांभाळण्याची धुरा 'नरेंद्र-देवेंद्र' या जोडीवर सोपवली आहे. परंतु इतक्या वेळा पराभव पत्करायला लागूनही विरोधकांनी अजूनही आत्मपरिक्षण केलेले दिसतं नाही. पूर्वी आपल्या पराभवाचे खापर ईव्हीएमवर फोडण्यात विरोधकांनी धन्यता मानली. मात्र कर्नाटक आणि तेलंगणासारख्या राज्यांमध्ये जेव्हा काँग्रेस आणि मविआ जिंकले, तेव्हा महाविकास आघाडीवाल्यांनी त्याचे श्रेय ईव्हीएमला दिले नाही. काँग्रेसचा हा ढोंगीपणा जनतेच्या लक्षात आला आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला दणका बसला. त्यानंतर राहुल गांधींसह विरोधकांनी वाढलेल्या मतदानाची टूम काढली. पण जिथे महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी झाले, अशा पश्चिम नागपूर, उत्तर नागपूर, पुण्यातील वडगाव-शेरी, मुंबईतील मालाड पश्चिम, मुंब्रा, अशा विधानसभा मतदारसंघांमध्ये मतदार संख्या वाढलीच होती. मग अशा मतदारसंघांबाबत राहुल गांधी कधीच काहीही बोलताना दिसत नाहीत. कारण त्यांना लोकांची दिशाभूल करूनच स्वत:चा राजकीय स्वार्थ साधण्यात स्वारस्य आहे. वाढलेल्या मतदानावरून काँग्रेस आणि महाविकास आघाडीवाल्यांनी रान उठवण्याचा कितीही प्रयत्न केला, तरीही जनतेला त्यांचे ढोंग कळून चुकलंय. म्हणूनच काँग्रेसच्या भूलथापांना महाराष्ट्र आता भूलणार नाही, महाराष्ट्र आता थांबणार नाही, असा निर्धारही चव्हाण यांनी या निमित्ताने व्यक्त केला.

राहुल गांधींच्या संविधान बचावच्या फेक नॅरिटीव्हवरही आमदार रविंद्र चव्हाण यांनी भाष्य केले आहे. ते म्हणाले, लोकसभा निवडणूक काळात राहुल गांधींनी संविधान बचावच्या नावाखाली फेक नॅरिटीव्ह पसरवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. ते ठिकठिकाणी एकच खोटं नाणं सारखं सारखं खणखणवत राहिले. मात्र राहुल गांधी 'मोहब्बत की दुकान' नसून 'नफरत की मकान' आहेत, हे साऱ्या जगाला आता कळलं आहे. लोकसभेच्या वेळी हिंदूविरोधी शक्ती एकत्र आल्या आणि जिहादी फतव्यांमधून एकगठ्ठा मतदान झाले. धर्मांध समाजघटकांचे लांगूलचालन आणि देशद्रोह्यांना पाठीशी घालणं, या काँग्रेस वृत्तीमुळे हिंदुस्थानात जिहादी विचार फोफावू लागले आणि महाराष्ट्रातील मतदाराला 'बटेंगे तो कटेंगे' हे भविष्यातील संकट दिसू लागले. लोकसभा निवडणुकीत भाजपाच्या जागा कमी झाल्या आणि भाजपा कार्यकर्ते जोमाने कामाला लागले. अहोरात्र मेहनत करून प्रत्येक कार्यकर्त्याने आपला बूथ मजबूत केला. संघटन, कार्यकर्ते आणि समर्थकांचे विशाल नेटवर्क यासोबतच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे खंबीर पाठबळ भाजपाला मिळाले. त्यामुळेच मतदार राजा जागृत झाला. 'जागो तो एक बार, हिंदू जागो तो', हे सर्वांपर्यंत वाऱ्यासारखे पसरले. 'एक है तो सेफ है', हे सगळ्यांनाच कळले. याचाच परिणाम महाराष्ट्रातच नव्हे, तर हरियाणा आणि दिल्लीतही भगवी लाट उसळली. महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तर प्रदेशात योगी आदित्यनाथ, दक्षिणेत अण्णा मलाई, तेजस्वी सूर्या, पूर्वांचलमध्ये हेमंत बिस्वा शर्मा, केंद्रात नितीन गडकरी, आश्विनी वैष्णव, एस. जयशंकर, ज्योतिरादित्य सिंधिया, शिवराजसिंह चौहान अशी भाजपा परिवारातील समर्थ नेतृत्वाची फळी आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि आदरणीय अमितभाई शाह यांच्या नेतृत्वात 'विकसित भारत' घडवण्यासाठी झटत आहे. या उलट काँग्रेस पार्टी गांधी घराण्याची गुलाम बनून राहिली आहे, तर पवार गट, उबाठा गट, तृणमूल हे इंडी आघाडीतून आलेले पक्ष म्हणजे घराणेशाहीतून आलेले 'फॅमिली बिझनेस' बनून राहिले आहेत. या घराणेशाहीला भारत आता पुरता वैतागला असल्याचेही रवींद्र चव्हाण म्हणाले.

## सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारोसाठी अर्ज करण्याचे अंतिम आवाहन

**गुरूग्राम, २९ जून :** नवी दिल्लीपासून ते थेट कोल्हापूरपर्यंत विविध शहरे व क्लासरूम्समधील हजारो विद्यार्थ्यांनी मी भविष्यासाठी समस्यांचे निराकरण करू शकतो' या साहसी विश्वासासह पुढाकार घेतला आहे. आता, सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारो रोडशोज समाप्त होण्याच्या अंतिम टप्प्यात असताना भारतातील तरूण चेंजमेकर्सकरिता त्यांच्या संकल्पनांना कृती आणण्याच्या संधीचा फायदा घेण्याचे काऊंटडाऊन सुरू झाले आहे.

१४ ते २२ वर्षांच्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय इनोव्हेशन स्पर्धा सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारोसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ३० जून २०२५ आहे. या स्पर्धेने देशभरात आधीच उत्सुकता निर्माण केली आहे. २९ एप्रिल २०२५ रोजी सुरू करण्यात आलेला हा उपक्रम भारतभरातील विद्यार्थ्यांना डिझाइन थिंकिंग टूल्स, सॅमसंग व आयआयटी दिल्ली तज्ञांकडून मार्गदर्शन, गुंतवणूकदारांसोबत संपर्क, प्रोटाटाइपिंग सपोर्ट आणि १ कोटी रूपये जिंकण्याची संधी यांसह सक्षम करतो.




पण बक्षीसापेक्षा या उपक्रमाला नव्या उंचीवर घेऊन जाणारी बाब म्हणजे उपक्रमाचा उद्देश.

गेल्या काही आठवड्यांपासून ओपन हाऊसेस आणि रोडशोने असाधारण दूरदृष्टी असलेल्या विद्यार्थ्यांना एकत्र आणले आहे. दिल्ली-एनसीआरमध्ये विद्यार्थ्यांनी प्रदूषणासाठी मानसिक आरोग्य ॲप्स आणि एआय-संचालित सोल्यूशन्सचे स्वप्न पाहिले. गुजरात आणि महाराष्ट्रामध्ये शाश्वत पॅकेजिंग, वारसाला उजाळा आणि सर्वसमावेशक शिक्षणासंदर्भातील संकल्पनांना व्यासपीठ मिळाले. प्रत्येक शहरात एक संदेश स्पष्टपणे पसरला भारतातील तरूण वास्तविक विश्वातील समस्यांसाठी वास्तविक सोल्यूशन्स तयार करण्यास सज्ज आहेत.

आता, तुमची वेळ आहे.

तुम्हाला विश्वामध्ये एखादी समस्या दिसली असेल आणि तुम्ही विचार करत असाल की या समस्येचे निराकरण का केले जात नाही?', तर यासाठी उत्तर कदाचित असेल की तुम्हालाच त्या समस्येचे निराकरण करायचे आहे.

शेतकऱ्यांना स्मार्ट सिंचन पद्धतींसह मदत करायची असेल, ऑनलाइन असलेल्या किशोरवयीनांसाठी सुरक्षितता निर्माण करायची असेल किंवा शहराला अधिक उत्तम बनवायचे असेल तर तुमची संकल्पना उपयुक्त ठरू शकते.

गाझियाबादमधील विद्यार्थीनी इशिता म्हणाली, पहिल्यांदाच मला कोणीतरी विचारले की, मला कोणत्या समस्येचे निराकरण करायचे आहे. या प्रश्नाने सर्वकाही बदलले.''

पुण्यामधील विद्यार्थी आकाश म्हणाला, मी योग्य वेळेची' वाट बघत न राहता प्रत्यक्ष सोल्यूशन निर्माण करायला सुरूवात केली. सॉल्व्ह फॉर टूमारोने मला विश्वास दिला की, माझी संकल्पना महत्त्वाची आहे.''

## वक्फचे लाड बंद करा, वक्फ आणि मंदिरे यांसाठी वेगवेगळे कायदे का ?



**नागपूर, २९ जून :** वक्फ बोर्डाकडे नोंदणी झालेल्या वक्फच्या इमारतींवरील अतिक्रमण काढण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वापर करण्याची मुभा काँग्रेस सरकारने दिली आहे. त्यासाठी वर्ष २००८ मध्ये महाराष्ट्र शासकीय इमारती (उदकासन) कायदा (Maharashtra Government Premises (Eviction) Act, 1956) या कायद्यात दुरुस्ती करण्यात आली. मंदिरे आणि वक्फ हे दोन्ही धार्मिक स्थळे असूनही वक्फ बोर्डाच्या जमिनीवरील अतिक्रमण हटवण्यासाठी सरकारी यंत्रणा दिली जाते; मात्र मंदिरांवरील अतिक्रमणासाठी विश्वस्तांना न्यायालयाच्या पायऱ्या झिजवाव्या लागतात. अशा प्रकारे मंदिरे आणि वक्फ बोर्ड यांसाठी वेगवेगळा कायदा आहे. हे संविधानाच्या विरोधात आहे. वक्फ बोर्डाला जो लाभ दिला जातो, त्याप्रमाणे मंदिरालाही देण्यात यावा अन्यथा मंदिरांप्रमाणे वक्फ बोर्डाला देण्यात आलेला विशेष लाभ बंद करण्यात यावा, असे पत्र हिंदु विधिज्ञ परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष अधिवक्ता वीरेंद्र इचलकरंजीकर यांनी महाराष्ट्र शासनाला लिहून यावर कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

या पत्रामध्ये हिंदु विधिज्ञ परिषदेकडून पुढील प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत...

सरकारी इमारती अथवा जागेमध्ये कुणी अनधिकृतरित्या रहात असेल, तर त्याला तिथून बाहेर काढण्यासाठी त्याच्याकडून भाडे अथवा तत्सम खर्च वसूल करण्यासाठी शासनाने वर्ष १९५६ मध्ये महाराष्ट्र शासकीय इमारती (उदकासन) कायदा पारित केला. त्याच्यात वेळोवेळी बदल झालेले आहेत.

काँग्रेस काळातील महत्त्वाचा बदल म्हणजे वर्ष २००८ मध्ये सरकारी जमिनीचा नियम वक्फच्या जमिनीलाही कायदा लागू करण्यात आला. याचा अर्थ असा की, वक्फच्या जमिनीवर जर अतिक्रमण झाले असेल, तर तर हटवण्यासाठी वक्फला न्यायालयात धाव घेण्याची आवश्यकता नाही तर शासकीय यंत्रणेने ते अतिक्रमण हटवण्यासाठी पावले उचलायची आहेत याउलट मंदिरांना दिवाणी न्यायालयांत धाव घ्यावी लागेल.

तसेच वक्फला स्वत:ची मालमत्ता अन्य कोणत्या कामासाठी वापरायची असेल, तर वक्फला दिवाणी न्यायालयात धाव घेण्याची आवश्यकता नाही. त्यांनी शासनाकडे तक्रार करायची आहे आणि त्या तक्रारीवर शासकीय यंत्रणा कारवाई करते आणि सदर जमीन/इमारत वक्फला रिकामी करून मिळवून देते. वक्फचे काही भाडे थकले असेल, तर तेही जमीनसाऱ्याच्या वसुली पद्धतीनेच वसूल करून मिळेल, अशी या कायद्यात तरतूद आहे.

सरकारी जमिनीप्रमाणे वक्फच्या जमिनींसाठी जी सुविधा सरकारने लागू केली, तशीच सुविधा सरकारने मंदिरांना मात्र दिली नाही. धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी असलेल्या मंदिरांच्या जमिनीवर कुणी आक्रमण केले, तर मंदिरांच्या ट्रस्टीना स्वत:ची जमीन मिळवण्यासाठी सरकारकडे नव्हे, तर न्यायालयात धाव घ्यावी लागते. वक्फ आणि मंदिरे यांच्यासाठी असा वेगळा नियम का ? वक्फप्रमाणे मंदिरांना लाभ का मिळत नाही ? एकतर सदर कायद्यामध्ये कलम मध्ये वक्फसारखाच मंदिरांच्या जमिनी व इमारती यांचा समावेश करण्यात यावा किंवा वक्फला यातून वगळण्यात यावे, अशी मागणी हिंदु विधिज्ञ परिषदेने केली आहे.

## पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत आत्मा आहे आणि मला या मालिकेत काम करण्याचे भाग्य लाभले : गौरव चोप्रा



**मुंबई, २९ जून :** सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत प्रोफेसर राजवीर शास्त्रीच्या भूमिकेत आपल्या प्रभावी परफॉर्मन्सने गौरव चोप्राने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. आधीपासून लोकप्रिय असलेल्या या मालिकेत अलीकडेच पदार्पण करणारा गौरव आपल्या व्यक्तिरेखेत एक गहिरेपण, संयम आणि मूक ताकद घेऊन आला आहे. तो पुष्पाला जितके आव्हान देतो तितकीच तिला मदत देखील करतो. या मनमोकळ्या गप्पांमध्ये, ही भूमिका स्वीकारण्याचे कारण, आपल्या व्यक्तिरेखेची वैशिष्ट्ये आणि सह-कलाकारांशी असलेले नाते याविषयी सांगत आहे-

**तू इतक्या वर्षांत अनेक प्रकारच्या भूमिका केल्या आहेस. तुझ्या या आधीच्या भूमिकांपेक्षा राजवीर शास्त्री कसा वेगळा आहे?**

मी या पूर्वी केलेल्या व्यक्तिरेखांपेक्षा राजवीर शास्त्री बराच वेगळा आहे. त्याचा पुष्पावर विश्वास आहे आणि तिची क्षमता तो ओळखतो. परंतु, तिच्या पार्श्वभूमीमुळे तिला कोणकोणत्या आव्हानांना तोंड द्यावे लागू शकते, ते देखील तो जाणतो. त्याला हे कळले आहे की, तिच्या पुढील मार्गक्रमणासाठी तिला मार्गदर्शनाची आणि आधाराची गरज आहे. आणि तो तिला मदतही करत आहे. मला राजवीरमधला हा गुण विशेष वाटतो की, आपण तिला मदत देऊ करत असल्याचा गाजावाजा तो करत नाही. त्याला जेव्हा लक्षात येते की, पुष्पा विचलित झाली आहे किंवा उत्तम कामगिरी करू शकत नाहीये, तेव्हा तो पुढे येतो, गोष्टी व्यवस्थित करतो आणि त्याचा साधा उल्लेख देखील करत नाही. कौतुकाचीही अपेक्षा न ठेवता मदत करणे ही गोष्ट खूपच कौतुकास्पद आहे. त्याच्यातील ही मूक ताकद आणि नि:स्वार्थ भावना यामुळे तो इतरांपेक्षा वेगळा ठरतो.

**पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत तुझी एंट्री झाली त्याला एखाददोन महीने उलटले आहेत. आत्तापर्यंतचा तुझा पडद्यावरचा आणि पडद्यामागचा अनुभव कसा आहे?**

मी शूटिंग करण्यास सुरुवात केली, त्याला सुमारे दीड महिना झाला. यमध्ये ही गोष्ट रोचक आहे की, या प्रत्येक क्षणात सखोलपणा आहे. आणि यातील काही दृश्ये तर इतकी दमदार आहेत की, त्यांच्यातील तीव्रता पुरस्कार मिळवण्यास पात्र आहे! व्यक्तिरेखा ज्या पद्धतीने रेखाटल्या आहेत आणि त्यांचे दिग्दर्शन जशा पद्धतीने होत आहे, ते खूप छान आहे. त्यात सह कलाकार खूप गुणी असल्यामुळे आणखीनच मजा येते. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे या पात्राला प्रेक्षकांकडून उदंड प्रतिसाद मिळत आहे. लोकांना ही व्यक्तिरेखा खूप भावली आहे आणि आपलीशी वाटते आहे. त्यांनी मला आधी जसे पाहिले आहे, त्यापेक्षा मी या मालिकेत खूप वेगळा आहे. लोकांनी मला या भूमिकेत स्वीकारले आहे.

**तुला तुझ्यात आणि प्रोफेसर राजवीर शास्त्रीमध्ये काही साम्य दिसते का? की तो तुझ्यापेक्षा अगदी वेगळा आहे?**

मला आजवर वेगवेगळ्या प्रकारच्या, वेगवेगळ्या पेशातील आणि परिस्थितीतील भूमिका करण्याची संधी मिळाली आहे. कधी कधी मला त्यांच्यात स्वतःचे साम्य दिसते तर कधीकधी त्या माझ्यापेक्षा अगदी वेगळ्या असतात. पण अभिनेता असण्याची हीच तर मजा आहे. म्हणूनच आम्ही या क्षेत्रात आहोत! आत्ता मी जी व्यक्तिरेखा साकारत आहे, तो राजवीर शास्त्री आणि माझे काही भावनिक अनुभव एकसारखे आहेत. मी त्या गोष्टी अलीकडेच अनुभवल्या आहेत. हा भावनिक बंध हा आमच्यातील दुवा आहे. बाकी, तो माझ्यापेक्षा खूप वेगळा आहे. एक अभिनेता म्हणून तुम्ही याच दुव्याच्या भोवती बाकीची व्यक्तिरेखा गुंफत असता. त्याला तुम्ही देह बोली, पोशाख, हावभाव, टोन आणि दृष्टिकोन यांची जोड देता. मला आनंद वाटतो, की प्रेक्षकांना हे थर जाणवले आहेत आणि त्यांनी ते वाखाणले आहेत. त्यांचा सकारात्मक प्रतिसाद माझ्यासाठी फार महत्त्वाचा आहे.

**बरीचशी पात्रे पुष्पाला साथ देतात, पण राजवीर सतत तिला आव्हान देत असतो. त्याला पुष्पाच्या क्षमतेविषयी शंका वाटते का? की तो तिला कायद्याच्या जगातील कठोर वास्तवाचा सामना करण्यासाठी तयार करत आहे?**

राजवीरला पुष्पाच्या क्षमतेबाबत अजिबात शंका नाही. किंबहुना त्याने तिला बरोबर जोखले आहे. पण त्याला ही जाणीव आहे की, कायद्याचे विश्व खूप कठोर आहे. आणि तो वास्तव गोड मुलाम्यात लपवणाऱ्यातला नाही. तो तिला उद्युक्त करून, परिस्थितीच्या वर उठण्याचे आव्हान देऊन आणि कसून तयारी करण्यास भाग पाडून तिला मदत करत आहे. राजवीरच्या स्वभावात अनेक छटा आहेत आणि प्रत्येक दृश्यागणिक ही गुंतागुंत अधिकाधिक उलगडण्याचा मी प्रयत्न करेन. या मालिकेत काम करण्याची ही मजा आहे की, त्या गहनतेस वर आणण्याची मुभा ही मालिका देते. माझ्या व्यक्तिरेखेचा गाभा केवळ संवाद बोलण्यात नाही, तर मौनात, अव्यक्त भावनांमध्ये आणि नि:शब्द ऊर्जेत आहे.

**करुणा पांडे आणि इतर कलाकारांसोबत काम करण्याचा अनुभव कसा आहे?**

करुणा सोबत काम करायला फारच मजा येते. ती पुष्पा आहे आणि तिच्यामुळे बऱ्याच गोष्टी सोप्या होतात. जेव्हा समोरचा अभिनेता आपल्या व्यक्तिरेखेत एकरूप झालेला असतो, तेव्हा स्वाभाविकपणे तुमची प्रतिक्रिया देखील अस्सल येते. मला वाटते, राजवीरला प्रेक्षकांचे जे प्रेम मिळत आहे, त्याचे मोठे श्रेय करुणा पुष्पाची भूमिका कशी करते यात दडलेले आहे. राजवीर एक गुंतागुंतीची आणि अनेक पदर असलेली व्यक्तिरेखा आहे. कधीकधी तो फार कठोर आणि अप्रिय वाटू शकतो.

**राजवीर म्हणून तू मालिकेत दाखल झाल्यानंतर तुला चाहत्यांकडून काय प्रतिक्रिया मिळाली?**

प्रतिसाद जबरदस्त होता सुस्पष्ट, बुलंद आणि प्रेमाने भरलेला. प्रेक्षकांना राजवीर आवडला आहे. ते पाहून बरे वाटते कारण सुरुवातीला मी जरा साशंक होतो की लोक कशी प्रतिक्रिया देतील. तो कडक स्वभावाचा आहे, कधीकधी तर तुसडा देखील वाटतो. त्यामुळे लोकांना तो आवडेल की नाही अशी शंका माझ्या मनात होती. पण प्रेक्षकांनी त्याला समजून घेतले, त्याच्या भावना, त्याचा भूतकाळ समजून घेतला. तो असा का आहे हे जाणून घेतले. ही मला विशेष गोष्ट वाटते की, एक पिता म्हणून लोकांची सहानुभूती त्याला मिळाली आहे. हा या व्यक्तिरेखेचा विजय आहे.

## संविधानाच्या रक्षणासाठी बसप कटिबद्ध : डॉ. हुलगेश चलवादी

**पुणे, २९ जून :** संविधानाच्या प्रस्तावनेतून 'समाजवादी' आणि 'धर्मनिरपेक्ष' शब्द हटवण्यासंदर्भात विचार करावा, असं सूचक वक्तव्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून करण्यात आले होते.परंतु, संघांच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आलेले हे वक्तव्य संविधानाच्या आत्म्यावर आघात करणारे आहे. घटनेत कुठल्याही प्रकारचा बदल करून त्याची दिशा आणि तत्व बदलण्याचा प्रयत्न बहुजन समाज सहन करणार नाही, असा इशारा पक्षाचे प्रदेश महासचिव,पश्चिम महाराष्ट्र झोन मुख्य प्रभारी, माजी नगरसेवक डॉ.हुलगेश चलवादी यांनी रविवारी दिला. घटना बदलण्याची भाषा करणाऱ्यांना वैचारिक, सामाजिक आणि राजकीय लढ्यातून चोख प्रत्युत्तर देण्याची वेळ आली आहे. आरक्षण, समानता, सामाजिक न्याय आणि घटनात्मक मूल्यांचा पुरस्कर्ता हा आमचा संघर्ष असून तो अखेरच्या श्वासापर्यंत चालू राहील, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत बसप संविधान व बहुजन हितार्थ ठोस कार्यक्रम घेऊन जनतेसमोर जाईल, असे डॉ.चलवादी म्हणाले.बहुजन समाजाने देखील भारतरत्न, संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा खऱ्या अर्थाने चालवणाऱ्या बसप च्या मागे उभे राहावे,असे आवाहन देखील त्यांनी केले.

संविधानामुळेच देशातील कोट्यवधी शोषित, पीडित, उपेक्षित, वंचितांना आत्मसन्मानाने जगण्याचा आणि जीवनात अग्रेसर होत स्वतःच्या पायावर उभं राहण्याचा अधिकार मिळाला आहे.परंतु,आरक्षणासह त्यांच्या घटनादत्त अधिकार हिरावून घेतले जात असतील तर सर्वसामान्य गप्प बसणार नाही, शिवाय त्यांच्या अधिकारांच्या संरक्षणासाठी बसप देखील रस्त्यावर उतरेल, असे पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा, उत्तर प्रदेश च्या माजी मुख्यमंत्री सुश्री बहन मायावती जी यांनी स्पष्ट केल्याचे डॉ.चलवादी म्हणाले.भारतीय संविधानाचे रक्षण व त्याच्या मूळ तत्त्वांची अंमलबजावणी हे पक्षाचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे सुश्री बहन जी यांनी स्पष्ट केले.

देशातील बहुजन समाज विशेषतः गरीब, मजूर, शेतकरी, महिला, छोटे व्यापारी, अनुसूचित जाती-जमाती आणि अन्य मागासवर्ग यांच्यावर सत्ताधारी पक्षांनी चालवलेली चुकीची धोरणे, भेदभावपूर्वक वर्तन ही गंभीर बाब आहे. या वर्गांच्या अधिकारांचे आणि संविधान रक्षणासाठी बसपा कटिबद्ध आहे, असे डॉ.चलवादी म्हणाले.

केंद्र सरकार ने घटनात्मक संस्थांचा गैरवापर करत अल्पसंख्याक आणि दलित समाजांवर अन्याय केला आहे. देशात धार्मिक कार्यक्रमांच्या नावाखाली जातीय तेढ आणि हिंसाचाराला खतपाणी घालण्याचे प्रकार वाढले आहेत.महिलांवरील अत्याचार, अल्पसंख्याकांवरील हल्ले, आणि बेरोजगारी-महागाईमुळे सर्वसामान्य जनता त्रस्त आहे, अशा शब्दात सुश्री मायावती जी यांनी सत्ताधाऱ्यांवर टिका केल्याचे डॉ.चलवादी म्हणाले.

## वी बिझनेसचे रेडी फॉर नेक्स्ट : भारतातील सर्वात मोठ्या डिजिटल अॅड्वायजरीने एमएसएमई दिनाच्या निमित्ताने वृद्धीचा सन्मान

**मुंबई, २९ जून :** आघाडीची टेलिकॉम कंपनी वी चा एंटरप्राइज विभाग, वी बिझनेसने जागतिक एमएसएमई (सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग) दिनानिमित्त, 'रेडी फॉर नेक्स्ट एमएसएमई ग्रोथ इन्साईट्स स्टडी २०२५' या आपल्या महत्त्वाच्या अहवालाची तिसरी आवृत्ती प्रकाशित केली आहे. डिजिटल इंडिया, भारत नेट आणि मोबाईल ब्रॉडबँडचा वापर यामुळे भारताची डिजिटल अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे, सूक्ष्म, लघु व मध्यम व्यवसाय आपली संचालन क्षमता आणि बाजारपेठेतील विस्तार वाढवण्यासाठी नवनवीन डिजिटल साधने वापरत आहेत.

'रेडी फॉर नेक्स्ट एमएसएमई ग्रोथ इन्साईट्स स्टडी २०२५' हे सकारात्मक परिवर्तन, देशाच्या डिजिटल मॅच्युरिटी इंडेक्समध्ये (डीएमआय) होत असलेली वाढ दर्शवत आहे. पण तरीही डिजिटल स्वीकार प्रत्येक क्षेत्रात वेगवेगळ्या प्रकारे होत आहे. भक्कम निर्धार, योग्य आर्थिक साहाय्य आणि योग्य सल्ला सेवांची उपलब्धता यांच्यासह भारतातील लघु व्यवसाय त्यांच्या डिजिटल प्रवासाला वेगवान बनवण्यासाठी सज्ज आहेत.

'रेडी फॉर नेक्स्ट एमएसएमई ग्रोथ इन्साईट्स स्टडी २०२५' च्या प्रकाशनाच्या निमित्ताने, वोडाफोन आयडिया लिमिटेडचे चीफ एंटरप्राइज बिझनेस ऑफिसर श्री अरविंद नेवतिया म्हणाले, भारतातील एमएसएमई डिजिटल जिज्ञासेपासून डिजिटल वचनबद्धतेकडे जात असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे आणि हे परिवर्तन खूप उत्साहवर्धक आहे. क्लाऊड, सायबर सुरक्षा आणि ऑटोमेशन इत्यादींमध्ये गुंतवणूक करण्याच्या प्रमाणात होत असलेली वाढ दर्शवते की, लघु व्यवसाय हे तंत्रज्ञानाकडे फक्त एक सुविधा म्हणून नाही तर वृद्धी सक्षम करणारा घटक म्हणून पाहत आहेत. रेडी फॉर नेक्स्ट प्रोग्राममार्फत आम्ही भारतातील एमएसएमईच्या अतुलनीय वृद्धी वाटचालीचा सन्मान करू इच्छितो - छोट्या नगरांपासून ते जागतिक बाजारपेठांपर्यंत, मानवी हातांनी करावयाच्या प्रक्रियांपासून ते डिजिटल-फर्स्ट एंटरप्राइजपर्यंत हा संपूर्ण प्रवास लक्षणीय आहे.

## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस संमिश्र राहील. कामावर लक्ष केंद्रित करा. विद्यार्थ्यांचे मित्रांसोबत संबंध वाढू शकतात. नवीन जबाबदाजया यशस्वीपणे पार पाडाल. तुमच्याबद्दल लोक मत्सर करू शकतात.

**वृषभ :** आजचा दिवस खूप चांगला जाईल. पैशांसंबंधी चांगली बातमी मिळेल. सर्व कामे पूर्ण होतील. एखाद्या खास व्यक्तीची भेट होऊ शकते. सहकाजयांची मदत मिळेल. जीवनसाथीसोबत चांगला वेळ घालवाल.

**मिथुन :** आज तुमचे महत्त्वाचे काम वेळीच पूर्ण करण्याचा प्रयत्न करा, नाहीतर पश्चातापाची वेळ येईल. सभ्यपणे वागा आणि राग टाळा. उपजीविकेच्या क्षेत्रात, नोकरीसाठी लोकांचा संघर्ष वाढू शकतो.

**कर्क :** आजचा दिवस ठीक राहील, मनात उत्साह राहील. कामाच्या ठिकाणी दबाव वाढू शकतो. त्यामुळे संयम ठेवा. सहकाजयांची मदत मिळेल. विद्यार्थ्यांसाठी चांगला दिवस आहे.

**सिंह :** तुमच्या कुटुंबात काही शुभ कार्यक्रम घडतील. पण जीवनात अनावश्यक मतभेद निर्माण होऊ शकतात. काही महत्त्वाच्या कामात विलंब झाल्यास तुम्ही नाराज व्हाल. राजकीय महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील.

**कन्या :** आजचा दिवस पूर्वीपेक्षा चांगला राहील. कुटुंबासोबत फिरायला जाऊ शकता. नवीन लोकांसोबत भेटीगाठी होतील. दिवस फारच आनंदात जाईल. नशिबाची साथ मिळेल.

**तुळ :** कामाच्या ठिकाणी, तुमच्या कनिष्ठ आणि वरिष्ठांशी सहमती दर्शवत राहा. विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे. तुमचे मन इकडे तिकडे भटकू देऊ नका. महत्त्वाच्या कामाची जबाबदारी मिळू शकते.

**वृश्चिक :** आज, काही महत्त्वाच्या कामात यश मिळाल्याने तुमचे मनोबल वाढेल. कोणतेही पाऊल उचलताना तुमच्या शहाणपणाने आणि विवेकबुद्धीने विचार करून निर्णय घ्या.


**धनु :** आज तुम्हाला नको असलेल्या प्रवासाला जावे लागू शकते. प्रिय व्यक्तीपासून दूर राहिल्यामुळे तुम्ही अस्वस्थ व्हाल. व्यवसायात अनोळखी व्यक्तीवर जास्त विश्वास ठेवू नका.

**मकर :** आजचा दिवस फारच व्यस्त असणार असेल. आज आवश्यक कामे पूर्ण होतील, खर्चावर नियंत्रण ठेवा. व्यावसायिकांना लाभ होईल. विद्यार्थ्यांसाठी चांगला दिवस आहे. वैवाहिक जीवन सुखमय राहील.

**कुंभ :** नोकरीत बदलीची शक्यता आहे. संयमी वर्तन ठेवा. राजकारणाशी संबंधित लोकांना विशेष यश आणि आदर मिळेल. मित्रांसोबत तुमचे वर्तन संयमीत ठेवा आणि रागावर नियंत्रण ठेवा.

**मीन :** वृश्चिक राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस उत्तम राहील. काम वेळेत पूर्ण होईल. वैवाहिक जीवनात गोडवा राहील. विद्यार्थ्यांना यश मिळेल. आरोग्य चांगले राहील.

## शब्दकोडे क्रमांक २१५०



**आडवे शब्द :-**
१) पाच दिवे तबकात ठेऊन ओवाळणे
५) कारस्थानी, दुष्ट
७) मालाचे येणे व जाणे
११) कवने रचणारा
१३) वसन
१५) धपाटा, चापट
१६) लवण
१७) वलुकामय जमीन
१९) सामान्य
२१) पंख
२२) बळकट
२४) संगीतातील एक राग
२६) चांदणी
२९) वेदना, खटका
३०) संगीतातील लकेर
३१) नासलेला
३३) घर, वस्ती
३५) शोभणारा
३८) अंत:करण
३९) धर्मराजाने युद्धक्षेत्रावर उचारेलेले द्विअर्थी वचन
४१) फेफरे
४२) संताप
४३) निवडणुकीनंतरचा लोकमताचा घेतलेला अंदाज ओपिनियन पोल(म)
४५) सारखा
४७) चष्मा
४८) वितरण
४९) भुतांचा राजा
५०) अभिप्राय
५३) पूर्णपणे (खोटे), स्पष्टपणे
५५) इच्छा पूर्ण होण्याकरता देवाशी केलेले नवसादि प्रकार
५८) श्वसनेंद्रिय
५९) उथळ, मोठी वाटी
६०) मान्यतेचा एक शब्द
६१) निवड न करता, एकंदरीने सर्व
६३) वक्र
६५) कीव, दया
६७) केस कापणे
७०) ललाट
७१) शुष्कता
७३) घरधनीण यजमानाची पत्नी
७६) खाटीक
७७) पोपट
७८) चिंतन
७९) एक बारीक धान्य

**उभे शब्द :-**
२) नोकर
३) आवाज
४) तीन आठवडे
५) काळी मैना- एक बोरफळ
६) प्रतिकूल मत, समीक्षा
७) विहीर
८) कप्तान
९) बिना मसाल्याची आमटी
१०) रिकामटेकड्यांची गप्पा मारण्याची जागा
१२) मृत्यू, वेळ
१४) धोबी
१६) धुणे
१७) वाळूची जमीन
१८) कडक
१९) वस्तू
२०) पाठविलेला
२१) टपाल
२३) मोठी कळशी
२५) घर
२७) राजयक्ष्मा-एक आजार
२८) ध्वनी
३०) तारका ३२) तल्लीनता, एकरुपता
३३) कमी व जास्त होणे
३४) कमळ
३६) जपजाप्य
३७) डोळ्यावरील त्वचा
३९) नीच, दुष्ट माणूस
४०) चणचण
४१) वस्तुसंग्रहालय
४४) जुगाराचा एक प्रकार
४६) मळलेला
४९) गावाची हद्द
५१) पुत्र, मुलगा
५२) प्रयत्न
५४) अर्धांगवायू
५६) सरदाराचा हुद्दा किंवा मान
५७) एकट्याने, एकत्र
५९) एकटा, फुलांचा खच
६०) पुण्यश्लोक अहिल्याबाईंचे आडनाव
६२) गाडीचे छत
६४) कुराणातील वचने
६५) बांबू
६६) उपवासाचे तांदूळ
६८) नेत्र
६९) करुणा
७२) चानी
७४) लोक
७५) झोप

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## स्टेशन फैल मधून किमती भावाच्या दुचाकीची चोरी

महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. २९जून

रसवंतीसमोर उभी करुन ठेवलेली एम. एच. 32, ए. एफ. 7849 दुचाकी अज्ञात चोरटयांनी चोरून नेली, ही घटना स्टेशन फैल येथे घडली, मिळालेल्या माहितीनुसार, स्वप्नील राऊत रा. गणेशनगर हा काही कामानिमित्त स्टेशन फैल येथे गेला होता, त्याने आपली दुचाकी स्टेशन फैल येथील रसवंतीसमोर उभी केली होती, त्यानंतर तो काम आटोपून परत आल्यानंतर गाडीची पाहणी केली असता त्याला दुचाकी आढळून आली नाही, अज्ञात चोरटयांनी दुचाकी लंपास केली, दुचाकी चोरीला गेल्याचे लक्षत आल्याने स्वप्नील राऊत यांनी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# शासकीय शाळांचा दर्जा व गुणवत्ता टिकविण्यासाठी आदर्श शाळांची निर्मिती- पालकमंत्री डॉ.भोयर

महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. २९ जून

खासगी शाळांच्या तुलनेत राज्यातील ग्रामीण भागातील शाळांची परिस्थिती पाहता शाळांचा दर्जा व गुणवत्ता टिकविण्यासाठी राज्यातील प्रत्येक तालुक्यात आदर्श शाळांची निर्मित करण्यात आली आहे. या आदर्श शाळांमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ होऊन विद्यार्थ्यांना शासकीय शाळेत प्रवेशासाठी आवड निर्माण होईल, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले.

जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये आज शैक्षणिक सत्राला सुरुवात झाली. जिल्ह्यातील १०० शाळांमध्ये शासकीय अधिकारी व पदाधिकारी यांच्याहस्ते पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे फुल देऊन स्वागत करण्यासाठी शाळा प्रवेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. साटोडा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा येथे आयोजित शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमास पालकमंत्री डॉ.भोयर उपस्थित होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी पराग सोमन, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी डॉ. मंगेश घोगरे, शिक्षणाधिकारी धर्मपाल कुमरे, गटविकास अधिकारी श्री. लोखंडे, साटोडा उपसरपंच प्रिती शिंदे, कृषि उत्पन्न बाजार समिती वर्धाचे सभापती अतिम गावंडे, डॉ. अरविंद वंजारी, डॉ. विपीन राऊत, उपमुख्याद्यापक रविंद्र पावडे आदी उपस्थित होते.केद्र शासनाच्यावतीने पीएमश्री व राज्य शासनाच्यावतीने सीएमश्री शाळा योजना सुरु करण्यात आली आहे. योजनेंतर्गत दर्जेदार अत्याधुनिक शाळांची निर्मिती करण्यात येत असुन आधुनिक शिक्षणाच्या सोईसुविधा निर्माण करण्यात येत आहे. जिल्ह्यातील आठही तालुक्यात प्रत्येकी एक अशा आदर्श शाळा तयार करण्यात येत आहे. साटोडा येथील शाळेला आदर्श शाळा तयार करण्यासाठी ५२ लाख रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला असल्याचे डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले. यातून लवकरच शाळा बांधकाम व डिजिटायजेशनची कामे हाती घेण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील कमी होत चाललेली पटसंख्या वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांनी गावातील शाळेत प्रवेश घ्यावा, यासाठी गावकऱ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.



### विद्यार्थ्यांनी गावातील शाळेतच प्रवास घ्यावा -जिल्हाधिकारी

ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, त्यांना चांगल्या वातावरणात उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी प्रशासनाच्यावतीने प्रयत्न करण्यात येत आहे. त्यामुळे गावातील विद्यार्थ्यांनी शहरातील शाळेत प्रवेश न घेता गावातील शाळेतच प्रवेश घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी केले.

### पालकमंत्र्यांनी केले विद्यार्थ्यांचे स्वागत

विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लागावी यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. उत्तम व सुंदर शाळा तयार करण्यत येत असून जिल्ह्यातील ४५ हजार विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व पाठ्यपुस्तके वितरीत करण्यात आले असल्याचे यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन म्हणाले. यावेळी शाळेतील प्रत्येक नवागत विद्यार्थ्यांचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी फुल देऊन स्वागत केले.कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांना पाठ्य पुस्तकांच्या संचाचे वितरण करण्यात आले. तत्पुर्वी प्रवेशोत्सवानिमित्त सर्वप्रथम ग्रामपंचायत कार्यालय येथून पुस्तक दिंडी काढण्यात आली. पुस्तक दिंडीमध्ये शाळेतील नवागत विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात सहभागी झाले. शाळा प्रवेशोत्सवाचा कार्यक्रम संपुर्ण जिल्हाभर घेण्यात आला. अनेक ठिकाणी लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळेत उपस्थित होते.


# गजानन महाराजांच्या चरणी अर्पण होणार लाडू साहित्य

**साहित्य वाहतूकीकरीता चेतन गद्रे यांची अनाकलनीय मदत**
**२०१९ पासून आजतागायत अविरत घडत आहे सत्कार्य**

महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. २९ जून

शेगाव येथील श्री गजानन महाराज मंदिरात भक्तांना दररोज प्रसाद म्हणून वितरीत केल्या जाणा-या बुंदी लाडूसाठी लागणारे साहित्य गुरू पौर्णिमानिमित्त गुरु दक्षिणा म्हणून पाठविण्याचा संकल्प येथील श्री संत गजानन महाराज गुरू पौर्णिमा उत्सव समितीने सन २०१९ पासून सुरुवात केली,

या साहित्यासाठी श्री संत गजानन महाराज गुरू पौर्णिमा उत्सव समितीने शहरात तीस संकलन केंद्राची निर्मिती केली आहे, अवघ्या नऊ दिवसाच्या कालावधीत (१ जुलै ते ९ जुलै पर्यंत ) या केंद्रावर प्रसादासाठी भाविकांना लाडू साहित्य जमा करता येणार आहे, मुख्य संकलन केंद्रामध्ये प्रशांत महल्ले, श्रीकांत प्रधान, राजहंस राऊत, प्रशांत उमक, प्रशांत कातरकर, देविदास लेंडे, या भाविकांशी संपर्क साधण्याचे आवाहन गुरूपौर्णिमा उत्सव समितीने केले आहे,



भाविकांनी आपल्या घराजवळील अधिकृत संकलन केंद्रात १ जुलैपासून ८ जुलै पर्यंत लाडू साहित्य गोळा करावे, जे साहित्य गोळा करतील अशा भक्तांचा सामूहिक मेळावा १२ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता मुख्य संकलन केंद्र शांती भवन येथे होणार आहे, त्यात शेगाव येथून प्राप्त होणा-या प्रसादाचे वितरण होणार आहे, यावेळी भाविकांमधून ईश्वर चिठ्ठीने निवड झालेल्या गजानन महाराज भक्त गणास महाराजांच्या पादुका व इतर साहित्य भेट म्हणून दिल्या जाणार असल्याचे उत्सव समितीचे प्रमुख प्रशांत महल्ले, श्रीकांत प्रधान, व राजहंस राऊत, सह प्रशांत उमक यांनी माहिती दिली आहे.

या यज्ञात सहभागी व्हावे असे आवाहन श्री प्रशांत महल्ले, श्री अनंत बोबडे, श्रीकांत गाडवे, स्मिता वानखेडे, प्रशांत मोरे, निलीमा वरफडे, सर्वेश जोशी, जिवन शिरसाले,विनोद आणपान,मनीष तेलरांधे, राजेश कुकडे , प्रमोद इंगळे,मिरा वैद्य, वैभव बोरकुटे, निखील बाकडे,रुपाली गौळकर, निखील बाकडे,रंजना श्रीवास्तव, प्रशांत उमक,अनिल चन्नावार,अक्षय श्रीरंगावार, बंटी खंगार, प्रशांत कातरकर, रुपेश सावरकर, वैष्णवी मोटघरे, प्रकाश अग्रवाल, संजय चौधरी, पुष्पा पहुने आदिंनी केले आहे.

### अज्ञात इसमाचा मृतदेह आढळला

**गिरड,:** रात्री घरून निघून गेलेल्या व्यक्तीचा सकाळी शेतातील विहिरीत मृतदेह आढळला, ही घटना सुकाळी शेतशिवारातील उघडकीस आली, अभिमान पवार वय ५५ रा. हिवरा असे मृताचे नाव आहे.

## गुमगाव येथे युवकाची आत्महत्या

महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. २९ जून

युवक शेतक-याने घरी गळफास लावून आत्महत्या केली, ही घटना आर्वी पोलिस ठाण्याच्या हददीतील गुमगाव येथे उघडकीस आली, अक्षय शेषराव कुसराम (२४) असे मृतकाचे नाव आहे, माहितीनुसार, मृतक अक्षय त्याचे वडील आणि मोठा भाऊ यांच्यासोबत राहत होता, तो त्यांच्यासोबत शेती करायचा, काही दिवसांपासून तो खूप अस्वस्थ होता, तो शेतात कामाला जात नव्हता, तो विचारात होता, त्याच्या वडिलांनी त्याला विचारले असता तो म्हणाला, मला विचित्र स्वप्ने पडत आहेत, म्हणूनच मला खूप भीती वाटत आहे, वडिलांनी त्याला घरी आराम करण्याचा सल्ला दिला, २७ जून रोजी सकाळी आई आणि वडील शेतात कामाला गेले होते, मोठा भाऊ काही कामासाठी गावी गेला होता, त्याच दिवशी संध्याकाळी अक्षयने घरी गळफास घेतला, त्याच दिवशी संध्याकाळी अक्षयने घरी गळफास घेतला, ही बातमी कळताच गावात एकच खळबळ उडाली, त्याच्या आत्महत्येचे कारण समजू शकले नाही.

## सामाजिक न्याय दिवस साजरा

**हिंगणघाट, :** नांदगाव येथील माध्यमिक विद्यालय येथे छत्रपती शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिन तसेच स्पर्धा आयोजित करून साजरी करण्यात आली, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एल. जी. सोनटक्के होते, तसेच कार्यक्रमाला समाज कल्याण विभागाचे कर्मचारी ज्योत्सना जांभूळकर, ज्ञानेश्वर बेलाडे उपस्थित होते, संचालन व्ही. जी. वरभे यांनी केले तर आभार एच. डी. बुचे यांनी मानले.

# काटोल वर्धा मार्गावरील बसचालक व वाहकाचा मनमानी कारभार

## कारवाई करण्याची शिवसेना (उबाठा) पक्षाची मागणी

महासागर प्रतिनिधी
आर्वी, दि. २९ जून

काटोल-वर्धा मार्गावर धावणा-या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील बसच्या चालक व वाहकांच्या मनमानी कारभारामुळे प्रवाशांना गैरसोय सामोरे जावे लागत आहे, या चालक व वाहकांवर वरिष्ठांनी कारवाई करुन प्रवाशांना न्याय द्यावा, अशी मागणी ( शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षातर्फे निवेदनातून करण्यात आली आहे,

कारंजा (घा), कन्नमवारग्राम, बांगडापुरमार्गे काटोल ते वर्धा फेरीवर असणारे चालक व वाहक नियमांचे उल्लंघन करीत असल्याचे दिसून येते, बस थांब्यावर न थांबता सरळ निघून जात असल्याने प्रवाशांची धावपळ उडत आहे, एखाद्या प्रवाशाला वेळेवर पोहोचवावे, असते आणि बस न थांबल्यास त्याला गैरसोयीचा सामना करावा लागतो, हात दाखविल्यानंतरही बस न थांबविता सुसाट बस न थांबविता सुसाट निघून जात असल्याने बराच वेळ बसची वाट पाहत असलेल्या पुन्हा ताटकळत उभे रहावे लागत आहे, असा अनुभव वेळोवेळी वर्धा-काटोलबसच्या माध्यमातून प्रवाशांना येत आहे, कन्नमवारग्राम व बांगडापूर ही गावे जंगलव्याप्त असून गावाजवळ बस येऊनही चालक थांबवत नाही, संबंधित चालक व वाहकांच्या मनमानी कारभाराची परिवहन महामंडळाच्या वरिष्ठ अधिका-यांनी दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे )पक्षाचे तालुका संघटक सम्राटसिंग ठाकूर, रोशन वरठी, बाबाराव वाघमारे यांनी केली आहे.

## अपघात प्रकरणी चौकशीअंती गुन्हा दाखल

**अपघातात दोन युवकांचा मृत्यू**

महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. २९ जून

अल्लीपूरकडे परत जात असताना असलेल्या दुचाकीने ट्रकला समोरासमोर धडक दिली, त्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला, हा अपघात यवतमाळ-वर्धा हायवे रोडवरील शिरपूर (होरे) ते रत्नापूर दरम्यान १६ जून रोजी घडला, या प्रकरणी देवळी पोलिस ठाण्यात शुक्रवार, २७ जून रोजी चौकशीअंती गुन्हा दाखल करण्यात आला,

प्रफुल्ल गणेश किटे (३८) व त्याचा मित्र समीर सरेंडे (२५) दोन्ही रा. अल्लीपूर अशी मृतक युवकांची नावे आहेत, मृतक किटे व त्याचा मित्र समीर रेंडे हे दोघेही १६ जून रोजी एम. एच. ३२, एबी ६४१६ क्रमांकाच्या दुचाकीने वाहनाने कळंब येथून दुचाकीने यवतमाळ-वर्धा हायवे रोडने गिरोलीमार्गे अल्लीपूरकडे जात होते, दरम्यान, मृतक किटे याने त्याच्या ताब्यातील दुचाकी चुकीच्या मार्गाने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून वर्धेकडून यवतमाळकडे जाणा-या आर. जे. २७. जी. सी. ६९८३ क्रमांकाच्या ट्रकला समोरुन धडक दिली, यात मृतक प्रफुल्ल व गाडीवर बसलेला त्यांचा मित्र संदीप दोघेही गंभीर जखमी झाल्याने मृत्यू पावले, या प्रकरणी देवळी पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली.

### क्षुल्लक कारणावरुन एकावर चाकूहल्ला

**वर्धा:** नजीकच्या बोरगाव (मेघे) भागातील शिखबेडा परिसरात जुन्या वादाचा वचपा काढण्यासाठी एकावर थेट चाकूहल्ला करून जखमी करण्यात आले, ही घटना १५ रोजी घडली, मोन मुकदरसिंग भोतनसिंग बावरी असे जखमीचे नाव आहे, घटनेवेळी तो परिसरातील रहिवासी मित्र व तळेगाव येथून आलेल्या नातलगासोबत बोलत उभा होता, त्याच ठिकाणावर रनबिरसिंग कालूसिंग भादा रा. शिख बेडा बोरगाव (मेघे) हा आला व त्याने जुन्या वादातून जवळ असलेल्या चाकूने हल्ला केला, एक वार हातावर करण्यात आला, एका हातावर सपासप वार करण्यात आले, तर दुसरा वार डोळयाजवळील भागाजवळ लागला, यात मोन मुकदरसिंग जखमी झाला, या प्रकरणी पोलिस स्टेशनला रणबिर सिंग विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

आजचा वाढदिवस
दै. महासागर
परिवारातर्फे शुभेच्छा


प्रिया मानकर


मिलिंद रामटेके


हाजी खलील खतीब


शुभम झाडे


वल्लभ जोशी


गौतम गजभिये


प्रविण वैद्य


सुनील तळवेकर


सारंग सबाणे

# डॉक्टर्स डे : जिद्द आणि सर्मपणाचे एक उदाहरण

ज्यांच्या हातात स्कॅलपेल आहे, पण मनात करूणा आहे. ज्याचं ध्येय केवळ उपचार नाही, तर जिवन वाचवणं आहे... असे देवदूत म्हणजे डॉक्टर! आठवा तो कोरोनाचा भयानक काळ, जेव्हा लोक घरात बंद होते आणि डॉक्टर स्वतःच्या जीवाची पर्वा न करता रात्रंदिवस रुग्णांवर उपचार करुन त्यांचे प्राण वाचवत होते, डॉक्टरांचे हे योगदान खरच कौतुकास्पदच आहे. डॉक्टर्स रुग्णांना आपले कुटुंब मानतात आणि शेवटच्या क्षणापर्यंत त्यांचे प्राण वाचवण्याचा प्रयत्न करतात. जर तुम्हाला धर्माचे पालन करायचे असेल तर डॉक्टरांकडून शिका, तो धर्मात कोणाचाही जीव घेत नाही तर जीव वाचवतो. 'मुखवट्या मागेःकाळजीवाहकाची काळजी घेणे'; 2025 च्या डॉक्टर्स डे ची थीम डॉक्टरांच्या कल्याणाची कबूली देण्याची आणि त्यांना पाठींबा देण्याची गरज यावर भर देते. हे ओळखून की रुग्णांप्रती समर्पण असूनही त्यांना काळजी आणि लक्ष देण्याची देखील आवश्यकता आहे.

राष्ट्रीय डॉक्टर्स दिन दरवर्षी 1 जुलै रोजी साजरा केला जातो. प्रसिद्ध डॉक्टर, शिक्षणतज्ञ आणि बंगालचे दुसरे मुख्यमंत्री डॉ. बिधानचंद्र रॉय यांच्या जयंती निमीत्य हा दिवस साजरा करण्यात येतो. हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असलेल्या डॉक्टरांचे योगदान मान्य करण्यासाठी आणि त्यांचे आभार मानण्यासाठी साजरा

केला जातो. डॉ. बिधानचंद्र रॉय यांना आदरांजली वाहण्यासाठी 1991 मध्ये भारतात पहिल्यांदा डॉक्टर्स डे साजरा करण्यात आला. तब्बल 14 वर्षे बंगालचे मुख्यमंत्री म्हणून कार्यरत असलेले डॉ. बिधानचंद्र रॉय ह्यांचे आरोग्य सेवेत मोठे योगदान आहे. त्यांचा जन्म 1 जुलै 1882 रोजी पाटणा, बिहार येथे झाला व त्यांचे निधन देखील 1 जुलै 1962 मध्ये झाले होते. जाधवपुर राजयक्ष्मा हॉस्पिटल, महिला आणि मुलांसाठी चित्तरंजन सेवा सदन, कमला नेहरू मेमोरियल हॉस्पिटल, व्हिक्टोरिया कॉलेज आणि चित्तरंजन कॅन्सर हॉस्पिटल सुरु करण्यात त्यांनी महत्तवाची भुमिका बजावली.

डॉ. बिधानचंद्र रॉय ह्यांनी कलकत्ता येथून वैद्यकीय पदवी पुर्ण किली आणि नंतर लंडनमध्ये एमआरसीपी आणि एफआरसीपी पदवी प्राप्त केली आणि त्याच वर्षी त्यांनी भारतात वैद्यकीय कारकीर्दीची सुरुवात केली. ते एक स्वातंत्र्यसैनिक होते कारण त्यांनी महात्मा गांधीनी केलेल्या चळवळींमध्ये भाग घेतला होता आणि उपोसणात सुद्धा त्यांची काळजी सुद्धा घेतली होती. स्वातंत्र्यानंतर ते भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नेते झाले आणि नंतर ते पश्चिम बंगालचे

मुख्यमंत्री होते. फेब्रुवारी 1661 मध्ये त्यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.त्यांचा आदर आणि श्रद्धांजली अर्पण म्हणून शासनाने डॉ.बी.सी. रॉय राष्ट्रीय पुरस्कार त्यांच्या स्मरणार्थ 1976 मध्ये सुरु केला. हा दिवस साजरा करण्याचा उद्देश डॉक्टरांचे योगदान, त्यांच्या कार्याबद्दल लोकांमध्ये जागरुकता निर्माण करणे होय. जगात डॉक्टरांचा खुप आदर केला जातो, भारतात सुद्धा त्यांची पुजा केली जाते. तसे, कोणत्याही मनुष्याची तुलना देवाशी करणे योग्य नाही. परंतू डॉक्टरांनी आपल्या कामाद्वारे हा पदवी प्राप्त केली आहे. तसे मृत्यू हा देवाच्या हातात आहे, परंतू देवाने डॉक्टर बनवून एखाद्या व्यक्तीला वाचवण्याचा अधिकार नक्कीच दिला आहे असे म्हणने वावगे ठरणार नाही. वेगवेगळ्या देशांमध्ये वेगवेगळ्या दिवशी हा दिन साजरा केला जात असल्याने हा दिवस साजरा करण्याचा इतिहासही आपला स्वतःच आहे. 1 जुलै रोजी भारतात, 30 मार्च अमेरिकेमध्ये आणि 27 फेब्रुवारीला व्हिएतनाममध्ये डॉक्टर्स दिन साजरा केला जातो.डॉक्टर सर्वांना गंभीर परिस्थितीत उपचार देतात, ते आपले जीवनदाते आहेत. मात्र काहीवेळा शोकमग्न नातेवाईकांकडून भावना अनावर झाल्यास डॉक्टरांवर प्राणघातक हल्ले होण्याच्या घटना घडतात, त्याचे समर्थन नक्कीच करता येत नाही. अशा घटना निंदणीय आहेत.

जो आपल्या जीवाची बाजी लावून दुसऱ्याच्या प्राणाचे रक्षण करतो, त्याच्या जीवीताची हानी होईल असे कृत्य कोणीही करू नये. 9 ऑगस्ट 2024 रोजी कोलकत्याच्या आर.जी. कार मेडीकल कॉलेज आणि हॉस्पीटलमधील एका महिला प्रशिक्षणार्थी डॉक्टर मोमीता रॉय हीचेवर आपल्या सेवेने लाखो लोकांचे जिवन सुंदर करणाऱ्या सर्व डॉक्टरांना राष्ट्रीय डॉक्टर्स दिनाच्या अनंत शुभेच्छा.

**डॉ.विजय बाबर, वर्धा**
**मो.नं. 9423118806**

### जाहीर नोटीस

सर्व आम जनतेस सदर जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकार दिपा पुरुषोत्तम रावलानी, रा. आर्वी, ता. आर्वी, जि. वर्धा यांनी मौजा रामदरा, तळेगाव(श्या. पं.) ता. आष्टी, जि. वर्धा येथील ग्रामपंचायत तळेगाव कक्षेतील घर मालमत्ता क्र. १२३९/१ ही घर मालमत्ता विक्रीचा सौदा गितेश मधुकर काकडे, रा. तळेगाव (श्या. पं.) ता. आष्टी, जि. वर्धा, यांचेशी सौदा पक्का केलेला आहे, सदर घरावर कुणाचेही हक्क, हितसंबंध, व्यवहार, तारण अथवा कुठल्याही प्रकारचे देणे, घेणे व बोझ्झा असल्यास अथवा कुठलाही उजर अथवा आक्षेप असल्यास सदर जाहीर नोटीसपासून ३ दिवसाचे आत आमचे पक्षकाराशी प्रत्यक्ष संपर्क साधून कळवावे, यानंतर मात्र कुणाचाही कुठलाही आक्षेप ऐकला जाणार नाही, व आमचे पक्षकार निकोप विक्री नोंदविण्यास पात्र असतील, तसेच सदर घर मालमत्तेबाबत कुणीही गितेश मधुकर काकडे, रा. तळेगाव (श्या. पं) ता. आष्टी, जि. वर्धा, यांचेशी कुठल्याही प्रकारे सौदा मुळीच करू नये, याची दखल घ्यावी, सबब सदर जाहीर नोटीसद्वारे कळवित आहोत.

ठिकाण : आर्वी
दि. ३०/०६/२०२५

दिपा पुरुषोत्तम रावलानी,
रा. आर्वी,
मो. नं. ७०५७०१२४४४

ॲड. संजय एस. तिरभाने
मोबाईल नं. ९१५८२४०२०७

### चौकशीची जाहीर नोटीस

जा. क्र. /न्याय/८/७/२०२५
दि. २३/०६/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, वर्धा
द्वारा राजेश नरहरशेट्टीवार यांची ईमारत, दुसरा माळा, हिरो शोरूमच्या मागे, मोहन नगर, वर्धा

फेरफार अहवाल अर्ज क्रमांक - १५०/२०२५ कलम - २२

अर्जदार - श्री. जयंत विठ्ठलराव वसू

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक -
साई लिलाशाहजी संस्थान वर्धा नोंदणी क्रमांक ई- १००० (वर्धा)

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, वर्धा विभाग वर्धा हे वर नमूद केलेल्या फेरफार अहवाल/अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत :-१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ?आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?**(अ) जंगम मिळकत** : --- निरंक **(ब) स्थावर मिळकत** - संस्थान निर्माणाकरिता घेतलेल्या स्थावर मालमत्तेची नोदणी करीता

**मालमत्तेचे वर्णन (मालमत्ता पत्रकानुसार ) :**
मौजा कारला ता. जि. वर्धा र. स. डी. व र. डी. वर्धा, ता. जि. वर्धा ग्रा. पं., पिपरी मेघे च्या हद्दीतील शिट नंबर १ भूखंड, क्रमांक २३ यांची एकूण आराजी १३५२.२९ चौ. मीटर विकत घेतली आहे.

जागेच्या क्षेत्रफळ १३५२.२९ चौ. मी. असून यांची चर्तुसीमा खालीलप्रमाणे आहे.

**पुर्वेस :**-सिमेंट रोड
**उत्तरेस :**- पांधन रस्ता
**भूखंडाची किंमत** - १६,८७,८००
**पश्चिमेस :**-प्रभाकर नगराळे व ज्ञानेश्वर ठाकरे यांचे मकान. **दक्षिणेस :**- विमल नगराळे यांचे मकान.वर्णनाचा भूखंड

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून ३० दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल, अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

हि नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त वर्धा यांचे शिक्यानिशी आज दिनांक २३ /०६/ २०२५ रोजी दिली.

**ठिकाण : वर्धा**
दिनांक : ३०/०६/२०२५

शिक्का

अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
वर्धा विभाग वर्धा

: आरएनआय रजिष्ट्रेशन क्रमांक :
६६०३२/१९९७
महासागर
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट.नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, परमार कॉम्पलेस हवालदारपूरा वर्धा - ४४२००१ येथे प्रकाशित केले आहे.
संपादक- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, मुख्य कार्यालय मो.नं. ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ स्थानिक संपादक नरेंद्र देशमुख मो.९०११०५८३७२ (पी.बी.आय. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.

# घड्याळासाठी २२३ कोटी रुपये!

एखाद्या घड्याळाची किंमत किती असेल? पाच हजार, दहा हजार, फार फार तर काही लाख रुपये. मात्र स्वीत्झर्लंडमधल्या लिलावात एका घड्याळाला २२३ कोटी रुपयांची किंमत मिळाली. मध्यंतरी स्वीत्झर्लंडमध्ये हा लिलाव पार पडला. त्यावेळी एका घड्याळाला ३१ दशलक्ष स्वीस फ्रँक म्हणजे जवळपास २२३ कोटी रुपये किंमत मिळाली. घड्याळ्याच्या किंमतीबद्दल कळल्यानंतर कोणाचेही डोळे पांढरे होतील. या घड्याळाच्या लिलावाची प्रकि'या अवघ्या पाच मिनिटात पार पडली. आता ही रक्कम दान करण्यात येणार आहे. याआधी २०१७ मध्ये डायटोना रोलेक्स घड्याळ १२७ कोटी रुपयांचा विकलं गेलं होतं. हे आजवरचे सर्वात महागडं घड्याळ होतं. हे घड्याळ पाटेक फिलिप कंपनीचं असून ओन्ली वॉच असं त्याचं नाव आहे. या घड्याळाला २.५ ते तीन दशलक्ष स्वीस फ्रँक मिळतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. पण त्यापेक्षाही खूप जास्त किंमत मिळाली. पाटेक फिलिप कंपनीचं हे घड्याळ इतर घड्याळांपेक्षा खूप वेगळं आहे. म्हणूनच या घड्याळाला एवढी किंमत मिळाली.




**एक धाव जनजागृतीसाठी**

इंग्लंडमधल्या ब्रिस्टल शहरात रहाणाऱ्या निक बटर नावाच्या व्यक्तीने नवा विक्रम केला आहे. निक जगातल्या १९६ देशांमधल्या मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी झाला आहे. अशी कामगिरी करणारा तो जगातला पहिलाच माणूस आहे. ३० वर्षांचा निक ग्रीसची राजधानी अथेन्समधल्या मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी झाला होता. निक बँकेत काम करायचा. मित्र केविन वेबरकडून निकला काही तरी जगावेगळं करण्याची प्रेरणा मिळाली. त्याच्या या मित्राला प्रोस्टेट ग्रंथींचा कॅन्सर होता. या जगात सगळंच अशाश्वत आहे, असं वाटल्यानंतर निकने आपल्या पद्धतीने आयुष्य जगायचं ठरवलं. तो समाजकार्यासाठी मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होतो. या धावेच्या माध्यमातून त्याने भारतीय चलनात जवळपास एक कोटी ७९ लाख रुपयांचा निधी जमा केला आहे. तो ही रक्कम कॅन्सरपीडितांना देणार आहे. यासोबतच तो प्रोस्टेट कॅन्सरबाबत जागरूकता निर्माण करतो आहे. हा विश्वविक्रम करताना त्याला बऱ्याच अडचणींना सामोरं जावं लागलं. त्याला कुत्रं चावलं. एकदा अपघातही झाला. मात्र या सर्व परिस्थितीला सामोरं जात त्याने मॅरेथॉनमध्ये धावण्याचा विक्रम पूर्ण केला.

**नाकातून काढला दात**

कोणाच्या नाकात दात वाढू शकतो का? या प्रश्नाचं उत्तर 'नाही' असंच द्यावं लागेल. मात्र या जगात काहीही घडू शकतं. चीनमधल्या ३० वर्षांच्या झांग बिन्सेंगच्या नाकातून दात काढण्यात आला आहे. श्वोस घ्यायला त्रास होऊ लागल्यानंतर झांग डॉक्टरांकडे गेला. यानंतर त्याची क्ष-किरण चाचणी करण्यात आली. या चाचणीतून धक्कादायक बाब समोर आली. त्याच्या नाकात दात असल्याचं स्पष्ट झालं. यामुळे डॉक्टरही चक्रावून गेले. या दाताची लांबी जवळपास एक सेंटीमीटर होती. गेल्या २० वर्षांपासून त्याच्या नाकात दात आहे. मात्र गेल्या तीन महिन्यांपासून त्याला श्वास घ्यायला त्रास होत होता. त्याची हुंगण्याची क्षमताही कमी झाली होती. याच कारणामुळे झांगने डॉक्टरांचा सल्ला घ्यायचं ठरवलं. दहा वर्षांचा असताना पडल्यामुळे झांगचा दात तुटला आणि नाकात जाऊन बसला. हा दात इथेच रूजला. आता २० वर्षांनी त्याला त्रास जाणवू लागला. डॉक्टरांनी अर्धा तास शस्त्रकि'या केल्यानंतर नाकातला हा दात काढला.

# कॅलिडोस्कोप

## पाण्यासाठी मधली सुट्टी

पाणी म्हणजे जीवन. निरोगी रहाण्यासाठी भरपूर पाणी प्यायला हवं. भरपूर पाणी प्यायल्यामुळे शरीरातले विषारी घटक मुत्रावाटे बाहेर पडतात. आपली त्वचा तजेलदार दिसू लागते. पण आपण पुरेसं पाणी पित नाही. पाणी पिण्याकडे आपलं दुर्लक्षच होतं. लहानपणापासूनच पाणी पिण्याची सवय लागली तर पुढे आरोग्य उत्तम राहू शकतं. म्हणूनच केरळ सरकारने अनोखा उपक'म सुरू केला



आहे. इथल्या शाळांमध्ये 'वॉटर बेल' वाजवली जाते. वॉटर बेल वाजली की मुलांना वॉटर ब्रेक मिळतो. ब'क मिळताच मुलांनी पाणी प्यायचं. राज्य सरकारने सरकारी शाळांमध्ये हा उपक'म सुरू केला आहे. शाळेच्या वेळेत तीन वेळा ही बेल वाजवली जाते. आता आपल्याला पाणी प्यायचं आहे, याची जाणीव मुलांना करून देण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. सकाळी १०.३५, दुपारी १२ आणि दोन वाजता घंटा वाजवली जाते. मग १५ ते २० मिनिटांमध्ये मुलं पाणी पिऊ शकतात. केरळ सरकारच्या या उपक्रमातून प्रेरणा घेऊन कर्नाटक आणि तमिळनाडू सरकारनेही अशा प्रकारचा उपक्रम राबवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. केरळ सरकारचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे.

# मुलीनेच लावले आईचे लग्न!

उत्तर प्रदेशातील अलीगढमधील महिला जावयासोबत पळून गेल्याची घटना ताजी असताना अजून एक तशीच घटना घडली आहे. बस्ती जिल्ह्यातील बंडा क्षेत्रात राहणार्याय एका महिलेच्या पतीचे तीन वर्षांपूर्वी निधन झाले. तिला तीन मुले आणि एक मुलगी आहे. लग्नाचे वय झाले म्हणून तिने नातेवाइकांना लेकीसाठी मुलगा शोधायला सांगितला. वीस वर्षाच्या लेकीसाठी २३ वर्षीय शेतकरी तरुण जोडीदार म्हणून निवडण्यात आला. लग्नाची तारीख ठरणे बाकी होते. दोन्ही घरात सनईचौघड्याची तयारी सुरू झाली. अशात लेकीच्या आईचे लग्नाच्या तयारीनिमित्त भावी जावयाशी फोनवर बोलणे सुरू झाले.

जावई लेकीपेक्षा आईशी तास न तास गप्पा मारत होता. लेकीच्याही काही गोष्टी लक्षात आल्या. मुलगी म्हणाली, माझे लग्न ठरल्यानंतर आईच्या स्वभावात बदल दिसत होता. आई अनेक वेळा लपून छपून फोनवर बोलताना दिसायची. होणारा जावई गावात अनेक वेळा ये-जा करायचा. पण तो कधीही त्या तरुणीला भेटला नाही. त्यामुळे तिला काही तरी गडबड असल्याची शंका आली. त्यानंतर तिने त्या तरुणावर पाळत ठेवली. तेव्हा आई जावयाशी तासन् तास बोलत असल्याचे समोर आले. मग तिने तरुणाला फोन करून विचारले. त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. पण नंतर आईनेच आपण जावयाच्या प्रेमात असल्याची कबुली दिली. शेवटी लेकीने मोठा निर्णय घेतला. समाजात बदनामी होऊ नये म्हणून तिने एका मंदिरात आपल्या होणार्यां नवर्या्चे लग्न स्वत:च्याच आईशी लावून दिले.



# ...म्हणून उंची मोजतात संध्याकाळी



वजन मोजायचे असेल तर ते सकाळी उठल्यावर लघवी झाल्यानंतर मोजायला हवे. तसेच उंची संध्याकाळी मोजायला हवी. तज्ज्ञांच्या मते प्रत्येक गोष्टीमागे काही कारणे असतात. एअर होस्टेस किंवा लष्करात भरती होताना त्यांची उंची मोजण्याची वेळ बहुतेक संध्याकाळी असते. हा योगायोग नाही, तर त्यामागे एक वैज्ञानिक कारण आहे.


दिवसाच्या वेगवेगळ्या वेळी आपली उंची थोडी बदलत राहते. खरेतर दिवसभराच्या कामामुळे आणि गुरुत्वाकर्षणाच्या प्रभावामुळे आपला पाठीचा कणा थोडा आकुंचन आणि प्रसरण पावत असतो. सकाळी उठताना शरीराला विश्रांती मिळालेली असते. त्यावेळी पाठीच्या कण्यामध्ये थोडी लवचिकता येते आणि उंची थोडी जास्त भरते. आपण सकाळी उठतो तेव्हा आपल्या इंटरव्हर्टेब्रल डिस्क्स म्हणजेच पाठीच्या मणक्यांमधली जागा थोडी वाढलेली असते. त्यामुळे शरीर थोडे उंच दिसते. दिवस जातो तसे गुरुत्वाकर्षण शरीरावर परिणाम करते आणि या डिस्क्स आकुंचन पावू लागतात, ज्यामुळे उंचीमध्ये एक ते दीड सेंटीमीटरचा फरक होऊ शकतो.

डॉक्टर आणि फिटनेस तज्ज्ञांच्या मते सकाळी आणि संध्याकाळी उंचीमध्ये थोडा फरक असणे सामान्य आहे. म्हणूनच उंची मोजण्यासाठी दुपार किंवा संध्याकाळ सर्वोत्तम वेळ मानली जाते.

विमान वाहतूक उद्योग आणि संरक्षण दलांमध्ये उंचीचे ठरावीक निकष आहेत. सकाळी उंची मोजली तर ती कृत्रिमरित्या जास्त असू शकते आणि उमेदवार पात्र ठरू शकतो. पण प्रत्यक्ष आणि कायमची उंची जाणून घेण्यासाठी ती संध्याकाळी मोजली जाते.

# रद्दीतून उघडले नशीब

घर साफ करताना एक व्यक्तीला वडिलांची ३५ वर्षे जुनी कागदपत्रे सापडली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या कागदपत्रांना तो रद्दी समजत होता. पण प्रत्यक्षात त्या कागदपत्रांची किंमत कोट्यवधींची होती.



त्या व्यक्तीच्या म्हणण्यानुसार, त्याच्या वडिलांनी ९० च्या दशकात जेएसडब्ल्यू स्टीलचे काही शेअर्स खरेदी केले होते. त्या शेअर्सची किंमत आज कोट्यवधी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. त्या शेअर्सचीच ही सर्टिफिकेट्स आहेत. आजकाल ही पोस्ट इंटरनेटवर बरीच व्हायरल झाली आहे. त्यावर युजर्सच्या प्रतिक्रिया रंजक आहेत.

या व्यक्तीच्या वडिलांनी १९९० मध्ये जेएसडब्ल्यू स्टीलचे शेअर्स सुमारे १ लाख रुपयांना खरेदी केले होते. ३० वर्षे सुरक्षित ठेवल्यानंतर, आज त्यांची एकूण किंमत सुमारे ८० कोटी रुपये झाली आहे. ही बातमी प्रथम गुंतवणूकदार सौरव दत्ता यांनी एक्स (पूर्वी ट्विटर) वर शेअर केली. ही पोस्ट पाहून लोकांनी 'सोशल मीडिया'वर कमेंट्सचा पाऊस पाडला. काहींनी याला 'जनरेशनल वेल्थ' म्हटले, तर काहींनी याला 'लीगसी क्रिएशन' म्हटले. अनेक यूजर्सनी, 'कोणी ९० च्या दशकात १ लाख रुपये गुंतवू शकले असतील तर ते कुटुंब आधीच श्रीमंत होते,असेही लिहिले आहे . एक यूजर लिहितो, आता ती व्यक्ती आरामात निवृत्त होऊ शकते आणि जीवनाचा आनंद घेऊ शकते.

त्याची इच्छा असेल तर तो व्यवसाय देखील सुरू करू शकतो. दुसर्या यूजरने म्हटले, स्टॉक स्प्लिट्स, बोनस आणि डिव्हिडंडची ही खरी जादू आहे. ती कालांतराने अब्जावधींमध्ये बदलते. एकाने, कंपनीची मूलभूत तत्त्वे मजबूत असतील तर विक्रीची घाई करू नका, असा सल्लाही दिला आहे.

# सर्वात छोटा इंजिनिअर



इंजिनिअरींगची पदवी मिळवणं हे सोपं काम नाही. बरीच मेहनत करून प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर इंजिनिअरींगला प्रवेश मिळतो. ती जाडजूड पुस्तकं वाचता वाचता, कठीण प्रोजेक्ट्स पूर्ण करता करता नाकी नऊ येतात. बारावीनंतर इंजिनिअरींगला प्रवेश घेता येतो. पण बेल्जियमच्या अवघ्या नऊ वर्षांच्या लॉरेन्स सिमन्सने इंजिनिअरींगला प्रवेश घेतला आहे. तो जगातला इंजिनिअरींचा सर्वात लहान वयाचा विद्यार्थी असल्याचं बोललं जात आहे. त्याला डिसेंबरमध्ये इंजिनिअरींगची पदवी मिळेल. तो लॉरेन्स इंडोवन युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजीमधून शिक्षण घेत आहे. लॉरेन्सचा आयक्यू १४५ आहे. त्यामुळे शिक्षकांनी शिकवलेलं त्याच्या डोक्यात अगदी सहज शिरतं. लॉरेन्सच्या हुशारीबद्दल आपल्याला सासू-सासर्यां कडून कळल्याचं त्याची आई लेडिया सांगते. वयाची दहा वर्षं पूर्ण होण्याआधीच इंजिनिअरींगची पदवी मिळवणार्यात लॉरेन्सचं कौतुक करावं तेवढं कमीच आहे. लॉरेन्सची बुद्धिमत्ता हा निसर्गाचा एक चमत्कारच म्हटला पाहिजे.

# दगड नव्हे मासा...

या पृथ्वीतलावर विषारी सजीवांची सं'या बरीच जास्त आहे. साप, विंचू असे सजीव खूप धोकादायक असतात. त्यांचं विष शरीरात भिनत जातं. या प्राण्यांच्या विषावर उतारा आहे. पण जगातला अत्यंत विषारी मासा माणसाचा जीव घेऊ शकतो. हा मासा 'स्टोन फिश' या नावाने ओळखला जातो. हा मासा दगडासारखा दिसत असल्यामुळे पटकन कोणाच्याही लक्षात येत नाही. या माशावर कोणाचा पाय पडला तर शरीरातून मोठ्या प्रमाणावर विष बाहेर पडतं. या विषावर पाय पडल्यास पाय कापण्यावाचून दुसरा पर्याय उरत नाही. थोड्याशा दुर्लक्षामुळे माणसाचा जीवही जाऊ शकतो. स्टोन फिशवर पाय पडल्यावर अवघ्या ०.५ सेकंदांमध्ये त्याच्या शरीरातून विष बाहेर पडतं. म्हणजे डोळ्यांची उघडझाप व्हायच्या आतच हा मासा विष बाहेर टाकतो. सर्वसाधारणपणे माशाची ठराविक रचना असते. त्याला कल्ले असतात. पण हा मासा दगडासारखा दिसतो. हा मासा आहे यावर कोणाचाही पटकन विश्वास बसणार नाही. हा मासा खूपच भयानक दिसतो. या स्टोन फिशपासून सांभाळून रहायला हवं.



# राजीनाम्याचं अनोखं कारण!



आजकाल 'सोशल मीडिया'वर एक अनोखे राजीनामा पत्र वेगाने व्हायरल होत आहे. सहसा लोक नोकरी सोडण्यासाठी वेगवेगळी कारणे सांगतात. काहींना आरोग्य समस्या असतात. काहींना कौटुंबिक कारणे असतात, तर काही करिअर बदलण्याचे कारण देतात. पण एका व्यक्तीने दिलेल्या कारणामुळे संपूर्ण इंटरनेटवर हास्याचे वादळ उठले आहे. ऑफिसमध्ये न येण्याचे कारण इतके अनोखे आहे की असे कारण 'एचआर'च्या स्वप्नातही येणार नाही!

एका व्यक्तीने त्याच्या बॉसला राजीनामा पत्र लिहिले आहे. पण हे पत्र सामान्य नाही. या व्यक्तीने राजीनामा पत्रात लिहिले आहे, 'साहेब, मी उद्यापासून ऑफिसला येणार नाही. कारण माझ्या शेतजमिनीतून हायवे बांधला गेला आहे'. या 'ईमेल'ने सोशल मीडियावर खूप हास्य निर्माण केले. त्यावर अनेक मजेदार कॉमेंट्सही आल्या आहेत. एका युजरने लिहीले, भावाने आयुष्यात एक मोठा निर्णय घेतला आहे, नोकरी सोडून व्यापारी होण्याची वेळ आली आहे. दुसरा युजर म्हणतो, हायवे बांधला गेला नाही, तर नशिबाचा एक्सप्रेसवे उघडला आहे. आणखी एक युजर लिहीतो, भावाचे नशिब उघडले आहे.




लोक या पत्राला 'रेजिग्नेशन ऑफ इयर' म्हणत आहेत. खरे तर या बातमीत दुःख आणि आनंद दोन्ही लपलेले आहेत. कारण हायवे म्हणजे सरकारने त्यांची जमीन घेतली आहे. पण त्यांना आता भरपाई म्हणून भरपूर पैसे मिळतील. याशिवाय उर्वरित जमीन हायवेच्या कडेला येणार आहे. त्यामुळे जमिनीचे भाव चांगलेच वाढतील. म्हणजेच आता ऑफिसला जाण्याची गरज नाही. ही पोस्ट व्हायरल झाल्यापासून, ती एक कोटींहून अधिक लोकांनी पाहिली आहे, तर अनेकांनी ती पोस्ट लाईक केली आहे.

# महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाने जागतिक स्तरावर ओळख निर्माण करावी : सरन्यायाधीश भूषण गवई



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

अनेक अडचणींवर मात करुन महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाचा खडतर प्रवास असून डिजिटल तंत्रज्ञानासारख्या नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यापीठाने जागतिक पातळीवर अभिमानास्पद कामगिरी करावी. येथे अद्ययावत सुविधा उपलब्ध असून यापुढील काळात उत्तम शैक्षणिक कामगिरी बजावण्यासह विधी क्षेत्रासाठी प्रतिभावंत विद्यार्थी घडवण्याची जबाबदारी विद्यापीठाची आहे. विद्यापीठाने आपल्या गुणवत्तेच्या माध्यमातून जागतिक स्तरावर ओळख निर्माण करावी, असा आशावाद देशाचे सरन्यायाधीश आणि विद्यापीठाचे कुलपती भूषण गवई यांनी व्यक्त केला. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते रविवारी नागपूरमधील महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठातील नव्या प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मंचावर केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, न्या. दीपंकर दत्ता, न्या. प्रसन्ना वराळे, माजी न्यायमूर्ती विकास सिरपूरकर, न्या. भारती डांगरे न्या. अनिल किलोर उपस्थित होते.

### ज्ञानशक्तीला संपदेत रूपांतर करा : केंद्रीय मंत्री गडकरी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हे विद्यापीठ आणि अद्ययावत सुविधांनी सुसज्ज अशी वास्तू उभी चांगल्या अध्ययन सुविधांमुळे विद्यापीठाची गुणात्मक वाढ होईल. ज्ञानाचे अद्ययावतीकरण महत्त्वाचे असून त्याचे उत्तम उदाहरण या विद्यापीठाच्या माध्यमातून दिले जाईल अशी आशा आहे. ज्ञान ही मोठी शक्ती असून तिचे संपदेत रूपांतर करणे गरजेचे आहे. डिजिटल तंत्रज्ञानासारख्या नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यापीठाने जागतिक पातळीवर अभिमानास्पद कामगिरी करावी, असे मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

### आर्टिफिशिअल इंटेलिजन्स वापर करावा : मुख्यमंत्री फडणवीस

जगातील चौथी अर्थव्यवस्था होताना विविध व्यावसायिक आणि गुंतवणूकविषयक प्रकरणांचा निपटारा गतीने होणे आवश्यक आहे. त्यामुळे गुंतवणुकीस मदत होऊ शकेल. भारतातील संविधान सर्वोत्कृष्ट असून एक शाश्वत मूल्य म्हणून आपल्या संविधानाने आदर्श प्रस्थापित केला आहे. बदलत्या जगातील आव्हानांचा सामना करण्यासाठी विद्यार्थ्यांना या विद्यापीठाशिवाय दुसरे स्थळ नाही आपल्यासमोर सायबर क्राईम, सायबर ब्रिचेसचे आव्हान आहे तर आर्टिफिशिअल इंटेलिजन्स आपल्यासाठी संधी आहे. या सर्व तंत्रज्ञानाच्या वापराने विधी क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांनी पार पाडावी, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### नागपुरात प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन ; ग्रंथालयाचे भूमिपूजन

सरन्यायाधीश गवई म्हणाले की, नागपूरमध्ये महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या निर्मितीत आलेल्या अडचणीसाठी नोकरशाहीतील लालिफताशाही वरचढ ठरली होती. काही वेळा विकासकाम करताना ही लालिफताशाही अडथळा ठरत असल्याचे सरन्यायाधीश म्हणाले. २०१६ साली नागपूरमधील विधी विद्यापीठाचे भूमीपूजन झाले. विद्यापीठाच्या उभारणीसाठी जमीन शोधण्यात अनेक अडचणी आल्या. यात नोकरशाहीनेही अडथळे टाकण्याचे प्रयत्न केले. शेवटी उच्च न्यायालयाने याबाबत आदेश पारित केले. जमीन निश्चित झाल्यावर निधीबाबत अनेक समस्यांचा सामना करावा लागवा, असे सरन्यायाधीश म्हणाले. सुमारे दशकभराच्या संघर्षमय प्रवासानंतर विधी विद्यापीठाच्या विकासाचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा परिपूर्ण वापर येथे करण्यात आला असून सौरऊर्जा व इतर प्रगत सुविधांमुळे ही इमारत पर्यावरणपूरक झाली आहे. येथे परिपूर्ण पायाभूत सुविधांची निर्मिती झाली असल्याचे ते म्हणाले. कुठल्याही शिक्षण क्षेत्राची निवड केली तरी त्यात जागतिक स्तरावर कीर्ती व प्रतिभा संपन्न योगदान देण्याचा प्रयत्न करावा, असा सल्ला त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दिला. प्रास्ताविक विद्यापीठाचे कुलगुरू विजेंदर कुमार यांनी केले तर आभार कुलसचिव रागिनी खुबाळकर यांनी मानले.

# अस्थी विसर्जनासाठी गेलेल्या दोघांचा मृत्यू



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :

मुंबईतील हाजी अलीजवळ लोटस जेट्टी येथे मोठी दुर्घटना घडली. आईच्या अस्थिविसर्जनासाठी समुद्रात उतरलेल्या संतोष विश्वेश्वर (५१) आणि त्यांचा मित्र कुणाल कोकाटे (४५) यांचा बुडून मृत्यू झाला. त्यांच्यासोबत असलेले संजय सरवणकर (५८) यांना वाचवण्यात यश आले असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. ही घटना काल (२८ जून) संध्याकाळी घडली. त्यावेळी समुद्राला भरती होती आणि हे तिघे अस्थिविसर्जनासाठी पाण्यात उतरले होते.

काल संध्याकाळी संतोष विश्वेश्वर त्यांच्या आईच्या अस्थिविसर्जनासाठी हाजी अली येथील लोटस जेट्टी येथे गेले होते. त्यांच्यासोबत त्यांचे मित्र कुणाल कोकाटे आणि संजय सरवणकर होते. गेल्या पाच दिवसांपासून मुंबईच्या समुद्रात हायटाईड असल्याने उंच लाटा उसळत होत्या. तेथे उपस्थित असलेल्या पोलिसांनी तिघांनाही समुद्रात जास्त पुढे न जाण्याचे आवाहन केले होते. कारण समुद्राला मोठी भरती होती. पण तिघांनीही आपण पालिका अधिकारी असल्याचे सांगत अस्थिविसर्जनासाठी पाण्यात उतरण्याचा निर्णय घेतला.

मात्र या तिघांनाही पाण्याचा अंदाज आला नाही. त्यात भरतीच्या लाटांमुळे हे तिघेही समुद्रात ओढले गेले. ही बाब लक्षात येताच, तेथे उपस्थित असलेले पोलीस आणि स्थानिक मच्छीमार यांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. या तिघांनाही पाण्याबाहेर काढून त्वरित नायर रुग्णालयात दाखल करण्यात आले.

यानंतर रुग्णालयातील डॉक्टरांनी संतोष विश्वेश्वर आणि कुणाल कोकाटे या दोघांना मृत घोषित केले. तर संजय सरवणकर यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगितले.

# दहावीतील विद्यार्थिनीचे कारने अपहरण

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

दहावीतील एका विद्यार्थिनीचे कारने अपहरण केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली. या प्रकरणी सदर पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे. सुमित उर्फ साहील चंदेल (२६) रा. कोंढाळी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. न्यायालयाच्या आदेशाने त्याची कारागृहात रवानगी करण्यात आली.

आरोपी सुमित हा वाहन चालक असून खाजगी वाहन चालवितो. त्याला आई आणि तीन भाऊ आहेत. पीडित विद्यार्थिनीच्या वडिलांनी दुसरा घरठाव केल्याने ती काका जवळ राहते. आरोपी आणि पीडित विद्यार्थिनी दूरचे नातेवाईक आहेत. एप्रिल महिन्यात आरोपीच्या भावाचे लग्न होते. पीडित मुलगी लग्नाला गेली होती. तेव्हा तिची सुमितसोबत ओळख झाली. सुमितने तिचा मोबाईल नंबर घेतला. तेव्हापासून त्यांच्यात व्हॉट्सॲप चॅटग सुरू होती.

दरम्यान, सुमित तिच्याशी मोबाईलवर बोलायचा. तीन दिवस बाहेर घालवू असे पीडितेला म्हटले. २१ जूनला सकाळी फोन केला आणि बाहेर जाण्याची योजना आखली. त्यांचे संभाषण पीडितेच्या वडिलांनी ऐकले. यावरून वडील तिच्यावर रागावले. यानंतर त्या मुलाशी कुठल्याही प्रकारचा संपर्क ठेवू नको, असे तिला बजावून सांगितले. त्यावर पीडितेने सुमितशी प्रेम करीत असून त्याच्याशी लग्न करणार असल्याचे म्हणाली. यावरून बापलेकीत वाद झाला. ठरल्याप्रमाणे सुमित तिला घ्यायला गड्डीगोदाम परिसरात आला. पीडितासुद्धा पोहोचली. मात्र, तिने जाण्यास नकार दिला. यावर सुमितने धमकी दिली आणि तिला कारमध्ये बसवून मनीषनगरच्या निर्जन परिसरात घेऊन गेला.

कारमध्येच पीडितेवर बळजबरीने अत्याचार केला. त्याच्या तावडीतून ती कशीबशी सुटली आणि जीव मुठीत घेऊन पळाली. रस्त्यात दिसलेल्या लोकांना मोबाईल मागितला आणि आत्याला फोन करून सारा प्रकार सांगितला. आत्या तिला घ्यायला गेली. त्यानंतर पीडितेने पोलिस ठाणे गाठले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता वरिष्ठ पोलिस निरीक्षक मनीष ठाकरे यांनी गुन्हा दाखल करण्यात आदेश दिले. गुन्हा दाखल होताच आरोपीला अटक करण्यात आली.

सहायक पोलिस निरीक्षक संदीया सोमनकर यांनी सखोल चौकशी केली. घटनास्थळी पाहणी केली. कपडे जप्त केले. सीसीटीव्ही फुटेज तपासले. पीडितेची वैद्यकीय तपासणी केली. न्यायालयाच्या आदेशाने आरोपीची कारागृहात रवानगी करण्यात आली.

# हिंगोलीत ठाकरे गटाकडून हिंदी सक्तीच्या अध्यादेशाची होळी



■ महासागर प्रतिनिधी, हिंगोली, दि. २९ :

राज्य शासनाने इयत्ता पहिली पासून हिंदी विषयाच्या सक्तीच्या अध्यादेशाची हिंगोलीत ठाकरे गटाकडून रविवारी ता. २९ होळी करण्यात आली. यावेळी सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली असून शेतकऱ्यांबद्दल अपमानास्पद वक्तव्य करणाऱ्या माजीमंत्री बबनराव लोणीकर यांच्या छायाचित्राला जोडे मारून त्यांचा निषेध केला. राज्यात शासनाने इयत्ता पहिली पासून हिंदी विषय सक्तीचा करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार अध्यादेश देखील काढण्यात आला आहे. मात्र शासनाच्या या निर्णयाला ठाकरे गटासह इतर पक्षांनी तिव्र विरोध केला आहे. या मुद्यावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने ता. ५ जुलै रोजी मोर्चा काढण्याची तयारीही चालवली आहे. हिंदीच्या मुद्यावरून राज्यातील राजकिय वातावरण चांगलेच तापले आहे. दरम्यान, आज हिंगोली येथील महात्मा गांधी चौकात ठाकरे गटाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शासनाने हिंदी विषय सक्तीचा करण्याच्या अध्यादेशाची होळी केली.

# सुनेला मारण्याचा प्रयत्न

## पतीसह ६ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २९ :

लग्नात चांदीची भांडी दिली नाही, असे सांगत सासरच्या व्यक्तींनी हुंड्यासाठी विवाहितेचा गळा दाबून खुनाचा प्रयत्न केल्याची घटना वडगाव शेरी परिसरात घडली. या प्रकरणी पती, सासू, सासऱ्यांसह एकूण ६ आरोपीविरुद्ध चंदननगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

याप्रकरणी एका २४ वर्षीय तरुणीने आरोपीविरोधात चंदननगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. तिने दिलेल्या तक्रारीनुसार, पती प्रणील निकुडे (३२), सासरे उदय ( ६०), सासू वैशाली (५५), दीर प्रतीक (३०, सर्व रा. वडगाव शेरी), चुलत दीर प्रमोद, चुलत सासरे माणिक (रा. कल्याणीनगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. तक्रारदार २४ वर्षीय तरुणीचा आरोपी प्रणील निकुडे याच्याशी ऑक्टोबर २०२३ मध्ये थाटामाटात विवाह झाला होता. विवाहानंतर हुंड्यात चांदीच्या काही वस्तू दिल्या नाही. आई-वडिलांकडून पैसे घेऊन ये, असे पती प्रणीलने तिला वेळोवेळी सांगितले. त्यानंतर पती प्रणील, सासरे, उदय, सासू वैशाली, दीर प्रतीक, प्रमोद, चुलत सासरे माणिक यांनी तिला सतत टोमणे मारून शारीरिक आणि मानसिक छळ सुरू केला. दरम्यान, पुणे आणि परिसरात गेल्या काही महिन्यांपासून महिलांच्या छळाच्या घटनांत मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याने यासाठी काहीतरी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सामाजिक संघटनांनी केली आहे.

# मनोज जरांगेंची मोठी घोषणा

## २९ ऑगस्टला समाजबांधवांसह मुंबईत धडकणार



■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २९ :

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा रणशिंग फुंकले असून, मुंबईत मंत्रालयावर थेट धडक देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. २७ ऑगस्ट रोजी जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी येथून या आंदोलनाची मुहूर्तमेढ रोवली जाणार आहे. दोन दिवसांत मुंबई गाठून २९ ऑगस्ट रोजी तेथे शांततेत आंदोलन होणार आहे. रविवारी आंतरवालीत पार पडलेल्या मराठा समाजाच्या बैठकीनंतर मनोज जरांगे यांनी आंदोलनाची घोषणा केली.

मराठा आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी आज आंतरवाली सराटीत बैठक घेण्यात आली. या बैठकीनंतर बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी मुंबई आंदोलनाची रुपरेषा जाहीर केली. मराठा आरक्षणासाठी आता वाशीबिशी काही नाही तर, थेट मंत्रालय गाठायचे असल्याचे ते म्हणाले. मनोज जरांगेंनी सरकारकडे मराठा कुणबी एक असल्याचा जीआर काढण्यासह सात मागण्या केल्या आहेत.

### नेमके काय म्हणाले मनोज जरांगे?

तुम्हा सगळ्यांना मानावे लागेल. आपल्याला सतत नावे ठेवली गेली, फूट पाडण्याचे प्रयत्न केले. पण, तुम्ही कोणी फुटला नाहीत. आता आपल्याला रणभूमीत लढायचे असून विजयही मिळवायचा आहे. रणभूमीची अशी तयारी करा की, विजय आपल्याला मिळवायचा आहे. आपल्याला कोणी थांबवू शकत नाही, असे जरांगे यांनी म्हटले. आपल्याला मैदान गाजवायचे असून गुलाल पण आपल्याच अंगावर घ्यायचा आहे.

# हिंदीच्या मुद्द्यावर मोर्चाची वेळच येऊ नये असा आमचा प्रयत्न : अजित पवार



■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २९ :

हिंदीच्या मुद्द्यावर मोर्चाची वेळच येऊ नये, असा आमचा प्रयत्न आहे. चर्चेतून चांगला मार्ग निघू शकतो, असे वक्तव्य उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे. तर आज आमची कॅबिनेट आहे त्यामध्ये आम्ही या विषयावर चर्चा करु, असे अजित पवारांनी म्हटले आहे.

अजित पवार पुढे बोलताना म्हणाले की, कोणतीही आघाडी किंवा युती असेल तर थोडाफार मतप्रवाह वेगळा असू शकतो, पण राज्याच्या हिताचे काय आहे जनतेच्या हिताचे काय, भवितव्याच्या दृष्टीने काय महत्त्वाचे आहे हे पाहणं महत्त्वाचे असते. त्यावर चर्चा करायची असते, चर्चेतून मार्ग निघतो.

अजित पवार म्हणाले की, ठाकरे बंधूंनी एकत्र यावे की नाही हा त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे. ह्यात आपण नाक खुपसायचे काहीच कारण नाही. आपण त्यांना वेगळे व्हा असे सांगितले नव्हते. काय करावे हा त्यांना अधिकार आहे, ते स्वतःबद्दल निर्णय घेतील.

अजित पवार म्हणाले की, सगळ्याच पालकांना आपल्या मुलांना कुठली भाषा यावी हे वाटत असते. तरीदेखील मराठी ही आपली मातृभाषा आहे. कुणी नोकरी, कामासाठी इथे आले असेल तर त्यांच्या मुलांना मराठी आली पाहिजे म्हणून आपण इंग्रजी माध्यमांना मराठी भाषा कंपलसरी केली आहे. तोच आपला त्या मागचा दृष्टीकोण आहे. अजित पवार म्हणाले की, प्रत्येकाचे आपल्या मातृभाषेवर प्रेम आणि अपार श्रद्धा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मधल्या काळात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून दिली. गेली अनेक वर्षे ही आपल्या सर्वांची मागणी होती ती मोदी सरकारने पूर्ण केली. इंग्रजी शाळेत शिकणाऱ्यांना पहिलीपासून मराठी, इंग्रजीचे शिक्षण घ्यावे आणि पाचवीपासून हिंदीचे शिक्षण घ्यावे.

# जातीने नव्हे गुणांनी मोठा असलेला समाज निर्माण व्हावा : नितीन गडकरी




■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २९ :

कोणतीही व्यक्ती जात-पात, धमार्ने मोठी नसते, तर तिच्या गुणांनी मोठी होत असते. आपल्याला समाजातील आर्थिक, सामाजिक विषमता दूर करून जातीने नव्हे तर गुणांनी मोठा असलेला समाज निर्माण करायचा आहे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग नितीन गडकरी यांनी आज (रविवार, दि. २९ जून २०२५) केले.

राजर्षी शाहू महाराज जयंती व सामाजिक न्याय दिनाच्या निमित्ताने विवेक विचार मंच, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि सहयोगी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषद आयोजित करण्यात आली. त्यावेळी नितीन गडकरी बोलत होते. इंदोरा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्वेन्शन सेंटर येथे आयोजित कार्यक्रमाला पद्मश्री डॉ. नामदेवराव कांबळे, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे अध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम, सुनील किटकरू आदींची प्रमुख उपस्थिती होती.

नितीन गडकरी म्हणाले, भारतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उपेक्षित समाजासाठी जीवन समर्पित केले. सामाजिक न्यायाच्या आधारावर हा समाज सुखी झाला पाहिजे, असे बाबासाहेब म्हणायचे. त्यांच्या संघषार्चा काळ लक्षात घेतला तर त्यावेळी उपासमारी, गरिबी, अत्याचार, अन्याय मोठ्या प्रमाणात होते. अश्या परिस्थितीत त्यांनी दलित, शोषित, पीडित समाजाच्या कल्याणासाठी कार्य केले. नितीन गडकरी म्हणाले, आपण संत, महापुरुषांची जात नव्हे, त्यांचे काम बघतो. अनेक डॉक्टर, वकील दलीत समाजातील आहेत. आपण त्यांच्याकडे जाताना जात बघत नाही. कार्य, कर्तृत्व आणि नेतृत्व हे गुणांमुळे आकाराला येत असते. सामाजिक न्याय, आर्थिक समता प्रस्थापित व्हावी हे बाबासाहेबांना अपेक्षित होते. त्यासाठी समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचून काम करावे लागेल.

